
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २७ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५१ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे

### शेअर बाजार सपाट पातळीवर बंद

**मुंबई** : शेअर बाजारांत गुरुवारी चढ-उतार दिसून आला. बाजारातील आजच्या अस्थिरतेत मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी सपाट पातळीवर बंद झाले. निर्देशांक ७८,४७२ वर बंद झाला. निफ्टी २२ अंकांनी वाढून २३,७५० वर स्थिरावला. क्षेत्रीय आघाडीवरील ऑटो, एनर्जी, फार्मा, रियल्टी, पीएसयू बँक निर्देशांकांत खरेदी दिसून आली. एफएमसीजी, मीडिया शेअर्समध्ये विक्री झाली. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप सपाट पातळीवर बंद झाले. कोणताही नवीन ट्रिगर नसणे आणि वर्षाअखेरच्या सुट्यांमुळे आज शेअर बाजारात कमी प्रमाणात व्यवहार दिसून आला. परिणामी, सेन्सेक्स आणि निफ्टी सपाट झाले. ■



# अर्थव्यवस्थेचा 'सरदार' हरपला!

## माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे निधन, ९२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**नवी दिल्ली, दि. २६ डिसेंबर-**


देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. श्वासोश्वास घेण्यासाठी त्रास होत असल्याने त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होते. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारताच्या उदारमतवादी धोरणाचे जनक असलेल्या मनमोहन सिंह यांच्या निधनानंतर जगभर हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. मनमोहन सिंह हे गेल्या काही वर्षांपासून राजकारणापासून दूर होते. आता त्यांचं निधन झालं आहे. १९९१ मध्ये देश आर्थिक संकटाशी सामना करत असताना त्यावेळचे अर्थमंत्री मनमोहन सिंह यांनी देशाची बाजारपेठ जगासाठी खुली केली. त्यांनी खासगीकरण-उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा मार्ग अवलंबला आणि देशाची अर्थव्यवस्था ही रुळावर आणली.

सन २००४मध्ये ज्यावेळी यूपीए सरकारने बहुमत गाठलं त्यावेळी डॉ.मनमोहन सिंह पहिल्यांदा पंतप्रधान बनले. २००८ मध्ये अमेरिकेतील मंदीमुळे जगभरात मंदी निर्माण झाली. पण मनमोहन सिंहांच्या धोरणांमुळे भारताला त्याचा कोणताही फटका बसला नाही. त्यानंतर २००९मध्ये ते दुसऱ्यांदा पंतप्रधान बनले.

### ● डॉ. मनमोहन सिंह यांची कारकीर्द

डॉ. मनमोहन सिंह यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पाकिस्तानमधील गाह या गावी झाला. १९४७ साली फाळणीदरम्यान विस्थापित होऊन सिंह कुटुंब भारतात आले. त्यानंतर पंजाब विद्यापीठातून त्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतलं. डॉ. मनमोहन सिंह यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट केली. सन १९६६ ते १९६९ या काळात मनमोहन सिंह यांनी संयुक्त राष्ट्रात काम केलं. नंतरच्या काळात ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात सल्लागार म्हणून रुजू झाले. १९७२ ते १९७६ या काळात भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून त्यांनी काम केलं. १९८२ ते १९८५ या काळात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून काम केलं. त्यानंतर १९८५ ते १९८७ या काळात त्यांनी नियोजन आयोगाचे अध्यक्षपदावर काम केलं. सन १९९१ सालाच्या आर्थिक संकटकाळी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्याकडून मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रीपदी निवड करण्यात आली. अर्थमंत्री म्हणून मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करण्यात आलं. भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यात त्यांनी मोठी भूमिका पार पाडली. सन १९९६ साली मनमोहन सिंह हे राज्यसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००४ साली यूपीएची सत्ता आल्यानंतर डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाचे १३ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
२००४ ते २०१४ या काळात त्यांनी दोन वेळा पंतप्रधान म्हणून काम केलं.
एप्रिल २०२४ साली त्यांनी राज्यसभेतून निवृत्ती घेतली.



## राष्ट्रपतींच्या हस्ते १७ मुलांना राष्ट्रीय बालपुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली** : कला, संस्कृती, क्रीडा आणि नवोपक्रमासारख्या विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी आणि असामान्य धाडस दाखवणाऱ्या १७ मुलांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव केला.

प्रतिभावंत युवकांचा सन्मान ठेवून प्रोत्साहन करण्याचे महत्त्व द्रौपदी मुर्मू यांनी अधोरेखित केले. बालकांची प्रतिभा ओळखून त्यांना संधी देणे हा नेहमी आपल्या परंपरेचा भाग राहिला आहे. प्रत्येक बालकाला आपल्या प्रतिभेची जाणीव होईल, हे सुनिश्चित करण्यासाठी ही परंपरा पुढे बळकट करण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या. १४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील सात मुले, दहा मुलींना पदक, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. त्यापैकी १४ वर्षीय लेखिका केया हटकर अपंगत्व, कला आणि तिच्या उत्कृष्टतेसाठी ओळखली जाते.

## १५ वाघांना छत्तीसगड, राजस्थान व ओडिशात पाठवणार

### मध्यप्रदेश सरकारचा निर्णय

**भोपाळ, २६ डिसेंबर**

मध्यप्रदेशातील १५ वाघांचे राजस्थान, छत्तीसगड आणि ओडिशात स्थानांतरण करा, असा आदेश मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दिला, अशी माहिती अधिकाऱ्याने गुरुवारी दिली.

केंद्र सरकारकडून परवानगी घेतल्यानंतर १२ वाघिणी आणि तीन वाघ तीन राज्यांत पाठवावे, असे या आदेशात नमूद असल्याचे अधिकाऱ्यांने सांगितले. या वाघांना हस्तांतरित करण्याबाबतच्या कालमर्यादेचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

या प्रक्रियेंतर्गत बांधवगढ, पेंच आणि कान्हा व्याघ्रप्रकल्पातील वाघांचे स्थानांतरण केले जाणार आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. छत्तीसगडमध्ये सहा वाघिणी आणि दोन वाघ, राजस्थानात चार वाघिणी आणि ओडिशात दोन वाघिणी पाठवल्या जाणार आहेत. स्थानांतरणाची ही प्रक्रिया पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीत पार पाडली जावी आणि स्थानांतरण प्रक्रियेदरम्यान वाघांना कोणताही धोका निर्माण होणार नाही, हे सुनिश्चित केले जावे, असा निर्देश यादव यांनी दिला आहे.

ज्या राज्यांमध्ये वाघांचे स्थानांतरण केले जाईल, ती राज्ये याचा संपूर्ण खर्च उचलतील. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण आणि भारतीय वन्यजीव संस्थेने जारी केलेल्या 'स्टेटस ऑफ टायगर्स : को-प्रेडेटर्स ॲण्ड प्रे इन इंडिया-२०२२' अहवालानुसार, मध्यप्रदेशात देशातील सर्वाधिक ७८५ वाघ आहेत. त्यानंतर ५६३ वाघांसह कर्नाटक दुसऱ्या, तर ५६० वाघांसह उत्तराखंड तिसऱ्या क्रमांकावर आहे.



## पोलिसांनी गँगस्टरच्या ३ साथीदारांना पकडले

**चंदीगड** : पंजाब पोलिसांनी गुरुवारी जालंधरमध्ये एका छोट्या चकमकीनंतर गुडांच्या तीन साथीदारांना अटक केली. गुंडांनी गोळीबार केल्यानंतर प्रत्युत्तरात पोलिसांनी गोळीबार केला. यात एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सहा शस्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केल्याने अमली पदार्थांची तस्करी, शस्त्रांचा व्यापार आणि खंडणी रॅकेटमध्ये गुंतलेल्या टोळीच्या नेटवर्कला मोठा धक्का बसला आहे. गुंडांनी गोळीबार केल्यानंतर प्रत्युत्तरात पोलिसांनी गोळीबार केला.

## पाकिस्तान-अफगाण संघर्ष चिघळला!

### १५ हजार तालिबानी मीर अली सीमेकडे

◆ **काबुल, २६ डिसेंबर**

पाकिस्तानी लष्कराने मंगळवारी अफगाणिस्तानच्या पूर्व भागात केलेल्या हवाई हल्ल्याला सडेतोड प्रत्युत्तर देण्याचा निर्धार करीत अफगाणिस्तानने १५ हजार तालिबानी सैनिकांना मीर अली सीमेकडे पाठवले आहे.

काबुल आणि हेरातमधून सुमारे १५ हजार तालिबानी सैनिक खैबर पख्तुनख्वाच्या मीर अली सीमेकडे रवाना झाले आहेत. अफगाणिस्तानवर हवाई हल्ला करणाऱ्या पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असे तालिबानच्या प्रवक्त्याने स्पष्ट केले.

तेहरिक-ए-तालिबानने नुकतेच वझिरीस्तानच्या माकिन भागात केलेल्या हल्ल्यात ३० पाकिस्तानी सैनिक ठार झाले होते. याला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानने हवाई हल्ला केला. या हल्ल्यात ४६ जण ठार झाले असून, याची गंभीर दखल तालिबान सरकारने घेतली आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

## श्रींचे मंदिर ३१ डिसेंबरला रात्रभर राहणार खुले

**शेगाव, २६ डिसेंबर-**

मार्गशीर्ष महिन्यातील चौथा गुरुवार, एकादशी, ख्रिसमसनिमित्त मुंबई, पुण्यासह विदर्भ, मराठवाड्यातील अन्य ठिकाणच्या शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांना असणाऱ्या सलग सुट्यांमुळे 'विदर्भाची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगावला श्रींच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी उसळली आहे.

दरवर्षी शेगावला नाताळच्या सुट्यांमध्ये श्रींच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविकांचा मोठा ओढा असतो. शेगावी येणाऱ्या सर्व रेल्वे, एसटी बसेसदेखील 'हाऊसफुल्ल' येत आहेत. त्यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रींच्या दर्शनासाठी भाविकांना सरासरी तीन तासांचा, तर श्रीमुख दर्शनासाठी २० मिनिटांचा अवधी लागत आहे.

श्री संस्थानकडून भाविकांसाठी पहाटे ४ वाजतापासून श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून, मंदिरात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसाद, भाविकांसाठी संस्थानच्या वतीने श्रींच्या दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, पारायण मंडप, श्रींची गादी तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे. संस्थानच्या भक्तनिवासात भाविकांची नियमानुसार राहण्याची व्यवस्था सुरू आहे. भक्तांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी श्रींचे सेवेकरी सेवा देण्यास तत्पर आहेत.



## आप-काँग्रेसमध्ये फूट

### इंडिया आघाडीचे तुकडे अटळ

**नवी दिल्ली, २६ डिसेंबर-**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आम आदमी पार्टी आणि काँग्रेस यांच्यात जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहे. आपवर आरोप करणारे अजय माकन यांच्यावर काँग्रेसने २४ तासांत कारवाई केली नाही, तर काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर काढण्यासाठी आघाडीतील अन्य घटक पक्षांशी चर्चा करण्याचा इशारा आपने दिला आहे.

काँग्रेस नेते अजय माकन यांनी बुधवारी एका पत्रपरिषदेत, लोकसभा निवडणुकीत आपशी आघाडी करण्याचा काँग्रेसचा निर्णय मोठी चूक असल्याचा दावा करीत, अरविंद केजरीवाल राष्ट्रविरोधी असल्याचा आरोप केला होता. माकन यांच्या आरोपामुळे आप नेते खवळले. मुख्यमंत्री आतिशी आणि राज्यसभा सदस्य संजयसिंह यांनी आज माकन आणि काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. विधानसभा निवडणुकीत काँग्रेस भाजपासोबत उभी आहे, भाजपाला फायदा पोहोचेल, अशी



भूमिका घेत आहे. त्यानुसार माकन बोलत आहे, भाजपाच्या सांगण्यावरून आप नेत्यांवर आरोप करीत आहे. बुधवारी तर त्यांनी सर्व मर्यादा ओलांडल्या. अरविंद केजरीवाल यांना राष्ट्रविरोधी म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. केजरीवाल राष्ट्रविरोधी असतील, तर दिल्लीच्या जनतेसाठी ते पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराची व्यवस्था कसे करीत आहे, असा सवाल संजयसिंह यांनी केला.

**अन्यथा, काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर काढू**

या मर्यादाहीन वर्तनासाठी काँग्रेसने २४ तासांत अजय माकन यांच्यावर कारवाई करावी. काँग्रेसने तसे केले नाही, तर काँग्रेसला इंडिया आघाडीतून काढण्याची मागणी आघाडीतील अन्य घटकपक्षांकडे आम्हाला करावी लागेल, असा इशारा संजयसिंह यांनी दिला.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सोलापूर महापालिकेच्या वतीने थोर संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने थोर संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात थोर संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस सहायक आयुक्त गिरीष पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उद्यान प्रमुख किरण जगदाळे,सिद्धू तिमिगार, अशोक खडके, अ. रहेमान पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात संत गाडगेबाबा महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षका रजनी राऊळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक निलोफर सय्यद, महेश वालावलकर, रियाज आतार, हिरा गोरे, अमोल दस, हर्षद चिंचनसुरे, भगवान गायकवाड, सचिन जाधवर, नितीन अंकुश, आषिकेश लोखंडे, भालचंद्र साखरे, नासिर खान, सचिन साखरे, नईम मुचाले, शुभम गायकवाड, सायली ढोले आदी उपस्थित होते.

### शिक्षकेतर अधिवेशनाला राज्यातून सात हजार कर्मचारी उपस्थित राहणार

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाचे ५२ वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवार दि. १९ जानेवारी रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे होणार असून या अधिवेशनाला राज्यातून सुमारे ७ हजार शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहणार असल्याची माहिती महामंडळाचे सहकार्यवाह शिवाजी खांडेकर, अध्यक्ष अनिल माने, महामंडळाचे माजी उपाध्यक्ष श्रीशैल तळवार यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात दिली आहे. अहमदनगर नेवासा येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात झालेल्या महामंडळाच्या कार्यकारिणीच्या सभेत राज्य अधिवेशन घेण्याची घोषणा करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनाला राज्यातील ३६ जिल्ह्यातून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून शासनास आपल्या संघटनाची एकजूट दाखवावी असे आवाहन शिक्षकेतर महामंडळाचे सहकार्यवाह शिवाजी खांडेकर सर कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, अनिल माने, पूणे विभागाचे सचिव गोवर्धन पांडुळे यांनी केली आहे.

### गटई कामगारांना मिळणार पत्र्याचे स्टॉल

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसाय करणाऱ्या गटई कामगांराना १०० टक्के अनुदानावर पत्र्यांचे स्टॉल वाटप करण्यासाठी दि. ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करावेत. इच्छुक लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले. लाभार्थ्यांना अशा राहणार अटी : अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी व अनुसूचित जातीचा असावा. अर्जदाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी ४० हजार रुपये व शहरी भागासाठी ५० हजार रुपयापेक्षा अधिक नसावे.(यासाठी तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला आवश्यक राहिल), अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे, अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा महानगर पालिका यांनी त्यास भाडयाने, कराराने, खरेदीने अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती स्वमालकीची असल्यास भाडेचिठ्ठी, कराराची प्रत किंवा खरेदीखताची साक्षांकित प्रत सादर करावी.



### महापालिकेच्या वतीने पेन्शनर्स डे साजरा

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

महापालिकेच्या वतीने पेन्शनर्स डे साजरा करण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेच्या सेवानिवृत कर्मचारी, अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. १७ डिसेंबर रोजी मनपाच्या वतीने साजरा केला जातो. महापालिकेतील कौन्सिल हॉल येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महानगरपालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी व सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित यांच्या हस्ते मनपाच्या सेवानिवृत्त झालेल्या सेवकांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, डॉ. अरुणधती हराळकर, पेन्शनर संघटना अध्यक्ष माऊली पवार, कार्याध्यक्ष ए. ए. पठाण,सचिव रुउफ बागवान,नाना शिर्के, अनिल विपत,सोलापूर जिल्हा पेन्शनर असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष सदाशिव उंब्रजकर,पेन्शनर संघटनेचे कार्याध्यक्ष ए. ए.पठाण, सचिव रुउफ बागवान, एस.एस. रंगदाळ,उपअभियंता व्ही.एस कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात १३ थुंकी नमुने १९ छातीचे एक्स-रे ४१ रक्ता नमुने असे एकूण ५१ ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. देगाव नागरी आरोग्य केंद्राच्या अंतर्गत झालेला हा कार्यक्रमात डॉ.सागर चुंगी, वैद्यकीय अधिकारी देगाव, रुपेश गायकवाड, नारायणकर, माने, देगाव नागरिक आरोग्य केंद्रातील पीएचएन पवार,एन एम अशा सेविका प्रयोगशाळा तंत्रज्ञान हे उपस्थित होते. संघटनेतील सर्व पेन्शनर धारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डब्ल्यूआयटीमध्ये आजपासून आविष्कार २०२४

## विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने 'आविष्कार २०२४' विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव २७ आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय येथे भव्य स्वरूपात साजरा होणार आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांपासून संशोधकांपर्यंत विविध स्तरांवरील प्रकल्पांचे सादरीकरण होणार असून, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधनाची झलक पाहण्याची संधी संशोधनप्रेमींना मिळणार आहे.

'आविष्कार २०२४' या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ २७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. प्रकाश महानवर असणार आहेत. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी विभागप्रमुख प्रा. प्रवीण सप्तर्षी हे प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करणार




आहेत, तर माजी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा हे उपस्थित राहतील.याप्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे अध्यक्ष शेठ अरविंद दोशी, मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त श्री भूषण शहा, श्री वैभव गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्यासह अविष्कार २०२४ समन्वयक डॉ. सतीश काशीद, डॉ. रश्मी दीक्षित आदि उपस्थित राहणार आहेत. हा महोत्सव केवळ प्रकल्पांचे प्रदर्शन नसून, संशोधन व तंत्रज्ञान क्षेत्रात नवनवीन कल्पनांचा शोध घेण्यासाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ ठरणार आहे. सहभागी संशोधकांसाठी प्रकल्प सादर करण्याची आणि त्यांच्या संशोधनावर आधारित चर्चा घडवून आणण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या महोत्सवात विविध विषयांवरील प्रकल्पांची मांडणी केली जाणार असून त्यातून विद्यार्थ्यांना संशोधनात रुची होण्यास मदत होणार आहे. प्राध्यापकांनी केलेल्या मार्गदर्शन कौशल्याचा विद्यार्थ्यांना भविष्यात मोठी संधी मिळणार आहे. 'आविष्कार २०२४' मध्ये पदवी, पदव्युत्तर आणि पीच. डी. स्तरावरील ४०० हुन अधिक विद्यार्थ्यांचे संशोधन सादर होणार आहेत. या माध्यमातून संशोधन आणि नवकल्पनांची ओळख साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. या महोत्सवाला संशोधन क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन मिळणार असून सहभागी संशोधकांना त्यांच्याकडून प्रेरणा मिळेल. प्रकल्पांचे सादरीकरण, चर्चासत्रे आणि प्रदर्शन या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाला नवी दिशा मिळेल. सोलापूर आणि परिसरातील संशोधनप्रेमींनी या महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून विज्ञान व तंत्रज्ञानातील आधुनिक संशोधनाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात रुची असणाऱ्या सर्वांसाठी हा महोत्सव एक अनोखी संधी ठरणार आहे.



# विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन कौशल्य विकसित करावे : डॉ गीता जोशी

## हि. ने. वाचनालय जन्मशताब्दीनिमित्त निबंध स्पर्धा

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांनी वृत्तपत्रे, चरित्रे, आत्मचरित्रे, कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने अशा साहित्यप्रकारचे वाचन करावे. वाचन, लेखन कौशल्य विकसित करावे, असे आवाहन लेखिका गीता जोशी यांनी केले. हिराचंद नेमचंद वाचनालयाने प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षास्थानी शिक्षणाधिकारी सचिन जगताप होते. यावेळी दत्ता गायकवाड, नरसिंग मेंगजी, नितीन वैद्य उपस्थित होते.

यावेळी परिक्षक मनिषा शहा व क्षितीजा गाताडे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी स्वागत केले. डॉ. नभा काकडे यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. श्रीकांत कामतकर यांनी मानले. तर सूत्रसंचालन मंजुषा गाडगीळ यांनी केले.

### वालचंदची बेलपवार, मल्लिकार्जुनची विभुते प्रथम

**११ वी ते १२ वी गट :** पुष्पांजली सुनिल बेलपवार (वालचंद कॉलेज), वैष्णवी नागनाथ थोरात (सेवासदन ज्युनियर), श्रुती रेवणसिध्दप्पा चडचण (हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स), मानसी संतोष गायकवाड (सेवासदन ज्युनियर), सृजल श्रीधर चौडे (हिराचंद नेमचंद), सलोनी उमेश चव्हाण (शरदचंद्र पवार महाविद्यालय), सुशांत पाडुरंग निकंबे (रावजी सखाराम हायस्कूल). **८ वी ते १0वी :** ऐश्वर्या बनसिध्द विभुते (श्री मल्लिकार्जुन हायस्कूल), दीपा अंबादास साखरे, सायुज्य ओंकार मोडक (ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर), अल्फिया अजीज बाणेवाले(एसव्हीसीएस, भवानी पेठ), गौरी रणदीप शिंगटे(सेवासदन प्रशाला), भावना भालचंद्र पगडयाल (बिटल प्रशाला), केतकी पंढरीनाथ कवडे (बी. एफ. दमाणी प्रशाला).



# कृषीकन्यांनी दिली शेतकऱ्यांना फळबागांची माहिती

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

ग्रामीण व कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नीत लोकमंगल कृषी महाविदयालय, वडाळा येथील अंतिम वर्षातील कृषीकन्यांनी तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील शेतकऱ्यांना रासायनिक खते फळ झाडांना किती व कोणत्या प्रमाणात द्यायचे याविषयी प्रात्यक्षित मार्गदर्शन केले.

या प्रात्यक्षिका दरम्यान शेतकऱ्यांसमोर रासायनिक खते झाडांना देण्यात आली. खते हे झाडाच्या वाढीसाठी आवश्यक पोषक अन्नद्रव्यांची पूर्तता करण्यास व उत्पादन क्षमता वाढवण्यास मदत करतात याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यामुळे शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले. यामुळे येथील शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून प्रात्यक्षिकाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रासायनिक खतांचा फळबागांच्या वाढी साठीचे उपयोग समजावून सांगण्यात आले .याबाबत कृषी कन्या लक्ष्मी रमेश शिवशरण, सुवर्णा गंगाधर पिटेकर, स्नेहल नाना शिंदे, श्वेता रेवणसिध्द वळसंगे, अमृता चंद्रकांत लोखंडे, अस्मिता सुधाकर सुभेदार यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, प्रा. प्रज्ञा कुदळे, व प्रा. संजय सिरसट यांचे मार्गदर्शन लाभले.

# तामलवाडी येथे मोठे बसस्थानक उभारावे

## माजी उपसभापती शिंदे यांची थेट गडकरींकडे मागणी

## मागणीचा विचार न झाल्यास २५ जानेवारीपासून

## ग्रामस्थांसह उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी हे गाव जवळपास १० हजार लोकसंख्येचे असून, याठिकाणी जुने बसस्थानक होते. हे बसस्थानक महामार्ग झाल्यापासून पाडले असून, त्या ठिकाणी अद्यापही बसस्थानक उभे राहिले नसल्याने स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी आणि महिलांना ऊन, पावसातच महामार्गाच्या लगत उभे राहावे लागत आहे. यामुळे या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नव्याने बसशेड उभे



करावे, अशी मागणी तुळजापूर पंचायत समितीचे उपसभापती दत्तात्रय शिंदे यांनी एका निवेदनाद्वारे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. दरम्यान, या मागणीचा विचार नाही केल्यास येत्या २५ जानेवारीपासून या महामार्गावर ग्रामस्थांसह उपोषण करणार असल्याचा इशाराही शिंदे यांनी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नॅशनल हायवे क्र. ५२ सन २०१८ ला सुरू झाल्यापासून तामलवाडी व परिसरातील प्रवाशांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. धुळे-सोलापूर महामार्गावर साईडला उभारूनच गावातील प्रवाशांना रस्त्यावर उभारून एस. टी. बसची वाट पहावी लागते. महामार्ग बनविताना मोठे बसस्थानक पाडून दोन्ही साईडच्या सर्व्हिस रोडला लहान ४ माणसे उभारतील असे शेड उभे केले आहेत. परंतु तामलवाडी येथील सव्हिस रोड अरूंद असल्यामुळे एस. टी बस २०१८ ते आजतागायत एकदाही या सर्व्हिस रोडणे आलेली नाही. या गावातून सोलापूर-तुळजापूर व इतर ठिकाणी जाण्यासाठी जवळपास हजाराच्या वर प्रवासी बांधव दिवसभर जा-ये करतात. या गावात पिंपळा, देवकुरूळी, गंगेवाडी, गंजेवाडी, वडगाव, होनसळ व येथील मिनी एम आयडीसीतील अनेक नागरिकांची बससाठी नेहमी गर्दी असते.

या सर्व गोष्टीचा आपण विचार करून इतर रोडप्रमाणे उदा. तुळजापूर, लातुर, नांदेड इत्यादी रस्त्यालगत मोठ्या गावात जशी बसस्थानके आहेत. त्याप्रमाणे तामलवाडीच्या मुख्य रस्त्यावर पुलाच्या कडेला दोन्ही बाजुस बसस्थानके उभा करावीत. गावातील अपूर्ण राहिलेला सर्व्हिस रोड ओढ्यापासून पुढेपर्यंत पुर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेला आदेश द्यावेत. अन्यथा दत्तात्रय शिंदे हे तामलवाडी येथे रस्त्यावर दि.२५ जानेवारी २०२५ पासून ग्राम स्थांसह बेमुदत उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला आहे. या निवेदनाच्या प्रती धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार राणाजगजितसिंह पाटील आदींना दिल्या आहेत.

### आज स्पॉट पाहणी करणार

सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील तामलवाडी येथील दोन्ही बाजूला उभारलेले बसशेड, सर्व्हिस रोडची मी स्वत: शुक्रवार, दि. २७ डिसेंबर रोजी स्थानिक तक्रारदार माजी उपसभापती शिंदे आणि नागरिकांना घेवून पाहणी करणार असून, सर्वांशी चर्चा करूनच या बसशेडबाबत तोडगा काढणार आहे.

**- राकेश जावडे, महामार्ग प्रकल्प संचालक, सोलापूर**






# नान्नज येथील एचसीसी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## 'स्वप्नपूर्ती' ने सारेच गहिवरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला जय वार्धक्याकडे झुकलेल्या वडिलांच्या आग्रहाखातर मोठ्या पगाराची नोकरी सोडून शेती करण्यासाठी गावाकडे येतो. पण, निसर्गाकडून होत असलेल्या अन्यायामुळे शेती नुकसानीत येते. दुसरीकडे त्याचा इंजिनिअर असलेल्या वर्गमित्राची आर्थिक परिस्थिती सुधारते. जयच्या घरी दिवाळीचा सण होत नाही तर मित्राच्या घरी मात्र दिवाळीची धामधूम असते. हा शहाणा शेती करण्यासाठी आलाय,असे गावकरी टोमणे मारतात. पण, पितृ वचनाची पूर्तता करण्यासाठी नोकरीवर पाणी सोडलेल्या जयचा आत्मविश्वास खचत नाही उलट पारंपरिक शेती ऐवजी तो आधुनिक शेतीची कास धरतो.परिस्थिती बदलते. घरात वैभव नांदते. अन् वडिलांची स्वप्नपूर्ती होते. विद्यार्थ्यांनी या नाटकात जीव ओतून केलेल्या सादरीकरणामुळे सारेच गहिवरले

नान्नज येथील हिंदुस्थानी कॉन्वेंट स्कूल (एच. सी.सी) चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. दोन दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर केले. नान्नजच्या सरपंच राणी टोणपे, संस्थेचे चेअरमन व सोलापूर महानगरपालिकेचे माजी उपायुक्त अनिल विपत, सेक्रेटरी वनिता मकेनझी, संस्थेचे मॉडेटर स्टीवन डेविड, सेक्रेटरी प्रफुल काळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. रेवरंड इम्यानुअल म्हेत्रे, तालुक्याचे केंद्रप्रमुख पीरसाब चौधरी, शाळेचे खजिनदार फिलिप नदवी, शाळेचे मुख्याद्यापक एस्तेर विनायकुमार, उप - मुख्यध्यापक स्नेहल मसीह, समन्वयक विश्वास भास्कर, संस्थेचे मॉडरेटर स्टीवन सी डेव्हिड, सेक्रेटरी प्रफुल कपूर्व उपस्थित होते. वेस्टर्न डान्स, ख्रिस्त जन्मोत्सव नाटिका , रिबन डान्स, एज्युकेशनल थीम डान्स, रेट्रो डान्स, हॉरर डान्स ,शेतकरी नृत्य, शेतकरी जीवनावर आधारित स्वप्नपूर्ती नाटक तसेच देशभक्ती गाण्यावर नृत्य, तबला वादन असे विविध बहारदार कार्यक्रम सादर केले. त्यानंतर बक्षीस वितरण समारंभ पार पडला. सूत्रसंचालन अजिता आखाडे, नागमणी पंदलेकर यांनी केले. सूत्रसंचालन उषा लोंढे व प्राजक्ता भालेराव यांनी केले. आभार मंजुषा लामकाने यांनी मानले. येल्लो हाऊसचे लीडर रवी मालतुमकर तसेच येल्लो हाऊस व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका कलाशिक्षक सोमनाथ कलशेट्टी व सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

### भास्कर यांनी केले जीवाचे रान!

स्वप्नपूर्ती या नाटकातून कितीही मोठे झाला तर वडिलांचे वचन मोडू नका, पारंपरिक शेती ऐवजी आधुनिक शेती केली तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात.आणि आत्म विश्वास ठेवून वाटचाल केली तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते, हे संदेश दिले.या नाटकाने पालकांची मने जिंकली त्यासाठी महिनाभर शाळेचे समन्वयक विश्वास भास्कर यांनी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन नान्नज येथील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन जीवाचे रान करून नाटकाची तयारी केली.



# निवृत्त प्राचार्य व प्राध्यापक राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. वाहूळ

## डॉ जे. एम. मंत्री यांची सचिवपदी निवड

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

निवृत्त प्राचार्य व प्राध्यापकांच्या असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूएटेड टीचर्स संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच शिवदारे महाविद्यालयात घेण्यात आले. यावेळी नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली त्यामध्ये अध्यक्षपदी डॉ. एम.ए. वाहुळ उपाध्यक्ष म्हणून प्रा. ए.बी. पाटील तर सचिवपदी डॉ. जे.एम. मंत्री, कोषाध्यक्ष प्रा. एस. बी. नाफडे सहसचिव म्हणून डॉ. रवींद्र बीडकर यांची निवड जाहीर करण्यात आली.

संघटनेच्या पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे राज्यातील प्रतिनिधी समाधान व्यक्त केले नूतन कार्यकारणीतील सदस्य म्हणून डॉ. शिवराज बिराजदार, प्रा. कुमुद गोरे, खर्डेकर, डॉ. व्ही. एन. उतकर, डॉ. पी. डब्ल्यू देवतारे अमरावती डॉ आर एस गुप्ता जळगाव डॉ ए व्ही परणीटकर नांदेड डॉ आर जी बीडकर सोलापूर डॉ.एम.जी. गायकवाड नाशिक डॉ संभाजी पाटील कोल्हापूर यांची निवड करण्यात आली. बैठकीत आर्थिक निर्णय, सभासदांकडून कौतुक

अँक्यूसॅट संघटनेच्या नूतन कार्यकारिणीची निवड होताच तातडीने पहिली बैठक घेण्यात आली बैठकीत हायकोर्टात याचिका दाखल करण्यासाठी घेण्यात आलेल्या वेतन पुनर्स्थापना लढा निधी रुपये रुपये दहा हजार पैकी ३ हजार ५०० तर ग्रॅच्युइटी उपादानची रक्कम मिळावी म्हणून घेण्यात आलेल्या रुपये सात लढा निधी पैकी रुपये २ हजार सभासदांना परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे नूतन अध्यक्ष डॉ वाहुळ यांनी सांगितले. वर्गणी स्वरूपात घेतलेली रक्कम बहुदा कोणती संघटना परत करत नाही परंतु नूतन कार्यकारिणीने रक्कम परत करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल अधिवेशनासाठी उपस्थित असलेल्या राज्यातील प्रतिनिधींनी पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कौशल्य, आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज राहा

## पंतप्रधान मोदी यांचे युवकांना आवाहन

◆ **नवी दिल्ली, २६ डिसेंबर**

राष्ट्राच्या विकासात देशातील युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट करीत, युवकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंगसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानात सज्ज राहावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.

केंद्र सरकारचे युवाकेंद्रित धोरण विशद करताना, झपाट्याने होणारे बदल आत्मसात करण्याची गरज आहे आणि विविध क्षेत्रांमध्ये निर्माण झालेल्या आव्हाने स्वीकारणे आवश्यक झाले असल्याचे नरेंद्र मोदी यांनी वीर बाल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

हे युग आता मशिनच्या पलीकडे मशिन लर्निंगपर्यंत गेले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र सध्या केंद्रस्थानी आहे आणि हे ॲप्लिकेशन्स पारंपरिक सॉफ्टवेअरची जागा घेत आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपल्या तरुणांचे भविष्य तयार करणे अत्यावश्यक आहे. सरकार तरुणांच्या प्रतिभेला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी कटिबद्ध आहे, असे मोदी यांनी सांगितले.

यावेळी मोदी यांनी गुरू गोविंदसिंग यांचे पुत्र साहिबजाद्यांच्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण केले, ज्यांनी मुघल साम्राज्याच्या दडपशाहीला शरण जाण्यापेक्षा अतुट धैय आणि विश्वास निवडला. ३०० वर्षांपूर्वी २६ डिसेंबर रोजी साहिबजाद्यांनी कोवळ्या वयातही अतुलनीय शौर्य दाखवत आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांनी प्रत्येक प्रलोभन नाकारले आणि विचारही केला जाऊ शकणार नाही, असा छळ सहन केला. देशाचे ध्येय सर्वोच्च आहे, हे त्यांनी दाखवून दिले, असे सांगताना मोदी यांनी तरुणांनी त्यांच्या वारशातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.


राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे गुरुवारी आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात लहान मुलांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

### राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्यांसोबत संवाद

नरेंद्र मोदी यांनी यावेळी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्यांसोबत संवाद साधला. कला, संस्कृती, शौर्य, संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण यासारख्या क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी करणाऱ्या १४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील १७ मुलांना यावेळी पुरस्काराने गौरवण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# संभलमधील ‘मृत्यू कुप’चे उत्खनन सुरू



◆ **संभल, २६ डिसेंबर**

उत्तरप्रदेशच्या संभल जिल्ह्यातील प्रशासनाने गुरुवारी कोट पूर्वी येथील प्राचीन ‘मृत्यू कूप’चे उत्खनन आणि नूतनीकरण सुरू केले. हा उपक्रम धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेल्या विहिरी शोधून त्या पुनर्संचयित करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे.

ही विहीर अनेक वर्षांपासून अशीच पडून होती आणि त्यात घाण साचलेली होती. आता ती साफ करण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही विहीर केवळ ऐतिहासिक खूणच नाही, तर एक पवित्र ठिकाण देखील आहे. या विहिरीत स्नान केल्याने मोक्ष मिळू शकतो, असा भाविकांचा विश्वास आहे. या विहिरीचा संबंध प्रदेशाच्या आध्यात्मिकतेशी खोलवर रुजलेला आहे. स्थानिक लोक या विहिरीच्या पौराणिक महत्त्वाचा आदर करतात.

अत्यंत प्राचीन असलेल्या मृत्यू कुपच्या उत्खननाला गुरुवारी नगर पालिकेच्या सहकार्याने सुरुवात झाली. ही विहीर प्रचंड लोकप्रिय आहे आणि तिच्या नूतनीकरणामुळे आमचा विश्वास आणखी दृढ होईल. या महत्त्वाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळाच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाचे खूप सहकार्य आहे, असे नगरसेवक गगन वार्ष्णेय यांनी सांगितले. मृत्यू कुपचे उत्खनन आणि नूतनीकरणामुळे संभलच्या धार्मिक पर्यटनाच्या संधींना चालना मिळेल, असा अधिकाऱ्यांचा दावा आहे. ही विहीर जामा मशिदीच्या अगदी जवळ आहे. ◂(वृत्तसंस्था)

# हरयाणा गोळीबारात २ ठार

◆ **यमुनानगर, २६ डिसेंबर**

यमुनानगर येथील एका गावात गुरुवारी काही अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी गोळीबार केला. यात दोन जणांचा मृत्यू झाला असून, एक जण जखमी झाला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. तिघे जण जिममधून बाहेर आले आणि त्यांच्या वाहनात बसणार होते, तेवढ्यात चार ते पाच मुखवटाधारी हल्लेखोर मोटरसायकलवरून तेथे आले आणि त्यांच्यावर गोळीबार केला.

ही घटना लखासिंग खेडी येथे घडली. यात दोघांचा मृत्यू झाला असून, एकाची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली. घटनेनंतर हल्लेखोर फरार झाले असून, चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही हत्या करण्यामागचा हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेशात आता ख्रिस्तींवर हल्ले, १७ घरे जाळली

### ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला धर्मांधांचा धुमाकूळ

◆ **ढाका, २६ डिसेंबर**

बांगलादेशमध्ये शेख हसीना सरकार सत्तेतून पायउतार झाल्यापासून धर्मांध देशातील अल्पसंख्यक समाजाला लक्ष्य केले जात आहे. मागील अनेक दिवसांपासून हिंदू बांधवांवर अत्याचार सुरू आहेत. याची जगभराने दखल घेतली असतानाच आता बांगलादेशमधील ख्रिस्ती बांधवांनाही लक्ष्य केले जात आहे. ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला बंदरबन जिल्ह्यातील चितगावमध्ये धर्मांधांनी ख्रिस्ती बांधवांची १७ घरे जाळल्याचे वृत्त ‘द डेली स्टार’ने दिले.



चितगाव हिल ट्रॅक्ट परिसरात वास्तव्यास असणारे ख्रिस्ती ख्रिसमसच्या निमित्ताने चर्चमध्ये प्रार्थना करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या घरांना आगी लावण्यात आल्याचे पीडितांचे म्हणणे आहे. या घटनेत त्यांचे १५ लाखांपेक्षा अधिक टक्यांचे (बांगलादेशी चलन) नुकसान झाल्याचे ख्रिश्चन समुदायाने म्हटले आहे. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी बुधवारी दुपारपर्यंत जाळपोळप्रकरणी कोणतीही औपचारिक तक्रार नोंदवण्यात आली नव्हती, मात्र तक्रार आल्यास कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

बंदरबन येथील लामा सरायच्या एसपी गार्डनमध्ये त्रिपुरातील ख्रिस्ती सुमदायाची १९ कुटुंबे वास्तव्यास होती. ही बाग शेख हसीना सरकारमधील वरिष्ठ अधिकारी बेनझीर अहमद यांची आहे. ५ ऑगस्टनंतर बेनझीर अहमद आणि त्यांच्या कुटुंबीयांनी हा परिसर सोडला. यानंतर त्रिपुरा समाजातील १९ कुटुंबे येथे वास्तव्यास आहेत. मंगळवारी सायंकाळी नाताळच्या पूर्वसंध्येला सर्वजण शेजारच्या चर्चमध्ये प्रार्थना करण्यासाठी होते. यावेळी परिसरात कोणीच नव्हते याचा फायदा घेत १७ घरे पेटवून देण्यात आली.

### मिळत होत्या जीवे मारण्याचा धमक्या

पीडित कुटुंबातील सदस्य गंगामणा त्रिपुरा यांनी सांगितले की, त्यांना १७ नोव्हेंबरपासून परिसर रिकामा करण्यास सांगितले जात आहे. येथे राहण्यासाठी ते मोठ्या रकमेची मागणी करात होते. या प्रकरणी १५ पोलिसात तक्रारही केली होती; परंतु पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. आता घरच आगीत भस्मसात झाल्याने ख्रिस्ती बांधवांची १७ कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. ◂(वृत्तसंस्था)


सोलापूर : सोलापुर भेटीत तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना अमृतसरसारख्या असणाऱ्या तलावामध्ये आमचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर आहे, असे सांगून त्यांना चांदीची मूर्ती भेट देत असताना माजी आमदार विश्वनाथ चाकोते. यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व सुशीलकुमार शिंदे.

## चित्रपट वार्ता

### प्राईम व्हिडीओने हटवला ‘सिंघम अगेन’

**मुंबई** : २०२४ च्या दिवाळीत रिलीज झालेला ‘सिंघम अगेन’ सिनेमा चांगलाच चर्चेत राहिला. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच छाप सोडली. अजय देवगणसोबत यात रणवीरसिंह, अक्षय कुमार, करीना कपूर, दीपिका पदुकोण अशी तगडी स्टारकास्ट होती. रोहित शेट्टीने ‘सिंघम अगेन’ दिग्दर्शित केला होता. हा सिनेमा काहीच दिवसांपूर्वी प्राईम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाला होता. मात्र, अचानक हा सिनेमा प्राईमवरून हटवण्यात आला आहे. हा सिनेमा प्रेक्षक रेंटवर बघू शकत होते. परंतु अचानक तो प्राईम व्हिडीओवरून गायब झाला. याविषयी प्राईमकडून कोणतेही स्पष्टीकरण अद्याप देण्यात आले नाही.





### ‘नो एन्ट्री’च्या सिक्वलमध्ये नवे हिरो-हिरोईन



**मुंबई** : २००५ साली आलेल्या ‘नो एन्ट्री’ या चित्रपटाची चांगलीच चर्चा झाली होती. हा एक विनोदपट होता. त्यात सलमान खान, अनिल कपूर, बिपाशा बासू या दिग्गज अभिनेत्यांनी खळखळून हसवले होते. आता या चित्रपटाच्या पुढच्या भागाची घोषणा करण्यात आली आहे. दुसऱ्या भागात मात्र सलमान, अनिल कपूर, फरदीन खान हे कलाकार नसतील. या चित्रपटात कलाकारांची नवी फळी दिसणार आहे. या चित्रपटाचे निर्माते बोनी कपूर यांनीच याबाबत माहिती दिली. माहितीनुसार, या चित्रपटात वरुण धवन, दिलजित दोसांझ आणि अर्जुन कपूर यासारखे बडे चेहरे दिसणार आहेत. या चित्रपटाला अनीस बज्मी दिग्दर्शित करतील. अभिनेत्री कोण असेल, हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे.

### मुक्या प्राण्यासाठी धावली जया भट्टाचार्य

**मुंबई** : माणसांची क्रूरता एवढी वाढली आहे की, आता प्राण्यांवरही बलात्कारासारखे जघन्य गुन्हे घडत आहेत. मुंबईला लागून असलेल्या नायगावमध्ये दीड महिन्याच्या कुत्र्यावर बलात्कार झाल्याची घटना नुकतीच समोर आली. यासंदर्भात अभिनेत्री जया भट्टाचार्यने आवाज उठवला आहे. जया म्हणाली, गेल्या गुरुवारी नायगाव येथील एका तरुणीचा फोन आला. तिने सांगितले की, तिमरी गावातील एका चाळीत २४ वर्षीय तरुण दीड महिन्याच्या कुत्र्यावर सलग तीन दिवस बलात्कार करीत आहे. तरुणाचे असे घृणास्पद वर्तन पाहून तिने सर्वप्रथम तिच्या आईकडे तक्रार केली. मुलाच्या आईने स्वतःच्या मुलाला पाठीशी घातले आणि म्हणाली, तुला काय हवे ते कर. मी माझ्या मुलाला मतिमंद म्हणवून त्याची सुटका करीन. आता जया भट्टाचार्यने त्या तरुणीसह पोलिस स्थानकात तक्रार नोंदवली असून, त्या कुत्र्यालाही नराधमाच्या तडाख्यातून सोडवले आहे.



### कार्तिक-करणमधील दुरावा मिटला

**मुंबई** : कार्तिकसाठी २०२४ हे वर्ष अतिशय यशस्वी ठरले. त्याच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. विशेष म्हणजे, आता तो करण जोहरसोबतही काम करणार आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या ‘तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी’ या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात हे दोघे सोबत आहेत. २०२१ मध्ये ‘दोस्ताना २’च्या चित्रीकरणादरम्यान दोघांमध्ये मतभेद झाले होते, ज्यामुळे कार्तिकला त्या चित्रपटातून बाहेर पडावे लागले. नंतर ते मेलबर्न फिल्म फेस्टिव्हलमध्ये एकत्र झळकले आणि त्याच वेळी दोघांमधील वाद मिटल्याचे स्पष्ट झाले.



# ‘‘समंजस पालकत्व‘‘ समाजात रुजणे आवश्यक : बोंडे

**पुणे, दि. २६ डिसेंबर-**

सध्याच्या धकाधकीच्या काळात पालक व पाल्य यांतील सुसंवाद कमी होत चालला आहे आणि त्यामुळे पालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, यासाठी रामचंद्र जोशी यांनी लिहिलेले ‘‘समंजस पालकत्व‘‘ हे पुस्तक यावर उपयोगी ठरू शकेल, असे प्रतिपादन निवृत्त शिक्षण सहसंचालक म. वि. बोंडे यांनी या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी केले.

यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. प्रशांत महाराज देहूकर, लेखक जोशी, एकविरा प्रकाशनचे सुहास कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी बोंडे पुढे म्हणाले की, विविध संतांची वचनांचा उपयोग करुन पाल्यांना संस्कार शिकवण्याची गरज आहे, मात्र शिकवताना आपल्यातील पालक दूर ठेवला पाहिजे. समस्या सोडवण्यासाठी पाल्यांबरोबर मैत्री करावी लागेल. पुस्तकाचे लेखक रामचंद्र जोशी यांनी पुस्तकामागची संकल्पना सांगितली. एकवीरा प्रकाशनच्या वतीने सुहास कुलकर्णी यांनी प्रकाशक व लेखक यांच्या संबंधांबाबत आणि या पुस्तकाची उपयुक्तता यावर भाष्य केले. कार्यक्रमात पुस्तकाला सहाय्यभूत झालेल्या मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. विजय बोत्रे यांनी सूत्रसंचालन केले तर राधिका जोशी यांनी आभार मानले.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची शिक्षण सुधारणा विषयक त्रिसूत्री

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दिनांक २६ डिसेंबर-**

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (दि.२६) दुसऱ्यांदा मंत्रीपदाची जबाबदारी हाती घेत असून त्यांनी शिक्षण सुधारणेचा त्रिसूत्री कार्यक्रम शिक्षण विभागाला दिला आहे.



विद्यार्थी,शिक्षक आणि पालक यांच्यापर्यंत पोहोचून शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने आवश्यक गोष्टी केल्या जाणार आहेत. त्यात वाचन चळवळ वाढविणे, शिक्षकांचे प्रशिक्षण घेणे आणि पालकांना जागृत करणे यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, असे राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निर्देशानुसार राज्याच्या उच्च शिक्षण संचालक कार्यालयातर्फे एक जानेवारीपासून वाचन चळवळ वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील ४५ लाख विद्यार्थ्यांना एक पुस्तक वाचण्यास दिले जाणार आहे. केवळ ठराविक शहरांमध्येच नाही तर राज्यभरात वाचन चळवळ वाढावी, या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. हा उपक्रम केवळ एका वर्षापुरता राहणार नाही तर सातत्याने केला जाणार आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला या उपक्रमात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डॉ.शैलेंद्र देवळाणकर म्हणाले, विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांना सुद्धा आवश्यक प्रशिक्षण देण्याचे निर्देश चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. त्यानुसार राज्यातील ३० हजार शिक्षकांना सात दिवस प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठीचा आवश्यक अभ्यासक्रम तयार केला जात आहे. हे प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने दिले जाईल. त्यातून एनईपी व इतर गोष्टींच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले जातील.विद्यार्थी, शिक्षक यांच्याबरोबरच पालक हा सुद्धा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणाविषयी पब्लिक अवेअरनेस आवश्यक आहे.

# जिल्ह्यात पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण, जलपुनर्भरणाच्या विविध उपायांचा अवलंब करावा

### जलशक्ती अभियानातील केंद्रीय पथकाच्या सूचना

**सोलापूर दि.२६ डिसेंबर-**

जिल्ह्यात पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण, जलपुनर्भरणाच्या विविध उपायांचा अवलंब करणे, रिचार्ज शाफ्टसारख्या उपाययोजना आणखी वाढवणे, भुजल अधिनियम ाचे काटेकोर पालन करणे. तसेचम हानगरपालिका मार्फत नारी शक्ती से जलशक्ती अभियान व शिक्षण विभागातील शाळांनी जलशक्ती अभियानाची जागरूकता विषय कार्यक्रम घ्यावेत, अशा सूचना जलशक्ती अभियानः कॅच दी रेन या अभियानातील केंद्रीय नोडल अधिकारी राकेश कुमार मीना व केंद्रीय अधिकारी एकता धवण यांनी दिल्या.




केंद्रपुरस्कृत ‘जलशक्ती अभियानः कॅच द रेन’ अंतर्गत विविध विभागाव्दारे करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेताना त्यांनी या सूचना दिल्या. यिा बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा मृद व जलसंधारण दयासागर दामा, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा अधिकारी एम.जे. शेख जिल्हा जलसंधारण अधिकारी एस एस पारसे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारणचे श्री क्षीरसागर, जिल्हा सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.मोहन शेगर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता श्री.चौधरी, उपअभियंता व जनसंपर्क अधिकारी लाभ क्षेत्रचे श्रीमती व्हि.बी कोरे. भीमा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता एस माने आदी उपस्थित होते.

# बीडचे पालकमंत्री पद देवेंद्र फडणवीस यांनी स्विकारल्यास वाल्मिक कराडची दहशत कमी होईल : अनंत जाधव

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

बीड जिल्ह्यातील म स्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मारेकऱ्यांना तात्काळ पकडावे या मागणीसाठी सोलापुरातील मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्विकारावे अशी मागणीदेखील मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अनंत जाधव यांनी केली.

यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे दास शेळके, दिलीप कोल्हे, अम ोलबापू शिंदे, प्रताप चव्हाण, अनंत जाधव, सुनील रसाळे, श्रीकांत घाडगे, शशी थोरात, शेखर फंड, योगेश पवार ,संजय शिंदे, महेश देवकर,आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना अंनत जाधव म्हणाले, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्विकारल्यास वाल्मि क कराडची दहशत कमी होईल. ही दहशत कमी झाल्यास बीड हे बिहार मध्ये नसून महाराष्ट्रात आहे हे लक्षात येईल असेही जाधव म्हणाले. दरम्यान लवकरात लवकरच घटनेतील आरोपी तसेच मुख्य सूत्रधाराला पकडावे अशी म ागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.



## अग्रलेख...

# ऑस्ट्रेलियाचे लक्षवेधी पाऊल

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांपर्यंतच्या मुलांवर समाजमाध्यमाच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक मंजूर करण्यात आल्याच्या लक्षवेधी घटनेचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. तिथे सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे. हे जगात प्रथमच घडत असून या कायद्यामुळे ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आतील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम सर्व प्रकारच्या समाजमाध्यम प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकणार नाहीत. मुख्य म्हणजे हे विधेयक सोशल मीडिया कंपन्यांना वयोमर्यादा लागू करण्यासाठी जबाबदार धरणार आहे. वर उल्लेख केलेला वयोगट आपल्या माध्यमांचा वापर करीत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी या कंपन्यांवर असेल. हा एक क्रांतिकारी निर्णय ठरल्यास आश्चर्य वाटणार नाही. आजच्या डिजिटल जगात मुले लहान वयातच इंटरनेट वापरायला लागली आहेत. युनायटेड नेशन्सच्या आकडेवारीनुसार, जगातील प्रत्येक अर्ध्या सेकंदाला एक मूल पहिल्यांदा ऑनलाईन जगात प्रवेश करते. स्वाभाविकच दिवसागणिक समाजमाध्यम वापरकर्त्या मुलांचे प्रमाण किती मोठे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही एक प्रकारची क्रांतीच आहे, पण या ऑनलाईन क्रांतीने अनेक गंभीर आव्हानेही समोर आणली आहेत. न कळत्या वयापासूनच समाजमाध्यमाच्या गर्तेत अडकल्यामुळे त्याच्या वापराने व्यसनाधीनतेपर्यंत पोहोचल्यावर केवळ मानसिक आरोग्यच नाही, तर शारीरिक समस्याही उद्भवू शकतात, असा इशारा जगभरातील तज्ज्ञ देत आहेत. यामुळेच जगभरात समाजमाध्यम कंपन्यांच्या जबाबदाऱ्या वाढविण्याची मागणी जोर धरू लागली आहे, जी योग्य आहे. अनेक देश विशेषतः मुलांच्या ऑनलाईन सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करून नवीन कायदे करीत आहेत. आता ऑस्ट्रेलियाने या दिशेने पाऊल टाकले असले, तरी यामुळे त्यांच्यावर एकीकडे कौतुक तर दुसरीकडे टीकाही होत आहे. सदर विधेयक संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३ तर विरोधात केवळ १३ मते पडली. या विधेयकानुसार, पालकांची संमती किंवा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या सोशल मीडिया खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाणार नाही. यातील मोठी बाब म्हणजे या प्लॅटफॉर्मपासून मुलांना दूर ठेवण्यासाठी समाजमाध्यम प्लॅटफॉर्मलाच व्यवस्था करावी लागणार आहे. कायदा लागू झाल्यानंतर, बंदी कशी लागू करायची हे ठरवण्यासाठी प्लॅटफॉर्मकडे एक वर्ष असेल. या कालावधीमध्ये ते तसे करू न शकल्यास मोठा दंड भरावा लागेल. तो साधारणपणे ३२.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २७० कोटी रुपयांचा असेल. सरकारने युक्तिवाद करताना काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले असून त्यांच्यानुसार ऑस्ट्रेलियन तरुणांसाठी समाजमाध्यम हे हानिकारक ठरू शकते. आजमितीला १४ ते १७ वयोगटातील सुमारे ६६ टक्के ऑस्ट्रेलियन मुलांनी अतिशय हानिकारक ऑनलाईन सामग्री पाहिली असून यामध्ये औषधांचा चुकीचा वापर, आत्महत्या किंवा स्वतःला हानी पोहोचवून घेणाऱ्या घातक मजकुराचा समावेश आहे. हे लक्षात घेऊन ऑस्ट्रेलियन सरकारने यावर्षी समाजमाध्यमाचा वापर करण्यास योग्य अशी वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाची चाचणी सुरू केली. आपल्या मुलांवर होणाऱ्या समाजमाध्यमाच्या परिणामाची काळजी असणाऱ्या पालकांसाठी हे करणे गरजेचे असल्याचे सांगत सरकारने आपल्या निर्णयाचे समर्थन केले आहे. यावेळी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी आपण अनेक पालकांशी बोललो असल्याचे स्पष्ट केले. या चर्चेतून अनेक पालक मुलांच्या ऑनलाईन सुरक्षिततेबद्दल चिंतित असल्याचे दिसून आल्याचे मत त्यांनी माध्यमांपुढे मांडले. अर्थातच टेक कंपन्यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. खरे पाहता विधेयक मंजूर होण्यापूर्वीच त्याला तीव्र विरोध सुरू झाला होता. १०० हून अधिक ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी एक खुले पत्र लिहून आपली नाराजी आणि नापसंती सरकारपुढे मांडली होती. या पत्राद्वारे सरकारने ठरवलेली वयोमर्यादा खूप कठोर असल्याचे नमूद केले होते. या महत्त्वपूर्ण विधेयकासंदर्भात टेक कंपन्यांचे म्हणणे आहे की, वयोमर्यादा निश्चित करण्याबाबतच्या संशोधनाचे निकाल समोर येईपर्यंत सरकारने हे विधेयक मंजूर करू नये. त्यांचा असा युक्तिवाद आहे की, निकाल समोर आला नसताना उद्योग किंवा ऑस्ट्रेलियन लोक या विधेयकासाठी आवश्यक असलेले वय किंवा अशा उपाययोजनांचा परिणाम समजू शकणार नाहीत. तरुणांच्या मानसिक आरोग्यासाठी काम करणाऱ्या 'रीचआऊट' या संस्थेने या कायद्याला आक्षेप घेतला आहे. संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे ७३ टक्के तरुण मानसिक आरोग्याचे जतन करण्यासाठी समाजमाध्यमाची मदत घेतात. असे असताना घालण्यात येणाऱ्या बंदीमुळे या सुविधेमध्ये बाधा येऊ शकते. एवढेच नाही, तर अम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑस्ट्रेलियाच्या मानवाधिकार आयुक्त लॉरेन फिनले यांनीही या विधेयकावर टीका केली आहे. एकीकडे असे असताना जगातील इतर देश यासंदर्भात काय करत आहेत, याचीही माहिती घ्यायला हवी. अमेरिकेने २६ वर्षांपूर्वीच मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेसाठी कायदा केला आहे. या कायद्याचे नाव 'चिल्ड्रेन ऑनलाईन प्रायव्हसी प्रोटेक्शन अॅक्ट' असे असून या अंतर्गत १३ वर्षांखालील मुलांची माहिती गोळा करण्यापूर्वी वेबसाईट्सना पालकांची परवानगी घ्यावी लागेल, असा नियम आहे. २००० मध्ये चिल्ड्रेन्स इंटरनेट प्रोटेक्शन अॅक्ट अंतर्गत अनावश्यक सामग्रीपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी शाळा आणि ग्रंथालयांना इंटरनेट फिल्टर स्थापित करणे अनिवार्य करण्यात आले. तथापि, मुलांच्या वयाबाबत फसवणुकीची शक्यता, तसेच या प्रकारच्या कृत्याला प्रोत्साहन देणारा ठरवून या कायद्यांवर टीका केली जाते. ऑस्ट्रेलियाच्या पावलावर पाऊल ठेवत ब्रिटिश सरकारही १६ वर्षांखालील मुलांसाठी समाजमाध्यमावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ब्रिटनचे टेक्नॉलॉजी सेक्रेटरी पीटर काईल यांनी सांगितल्याप्रमाणे ऑनलाईन सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, विशेषतः मुलांसाठी जे काही लागेल ते ते केले जाण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या देशातही अशा प्रकारचा कायदा लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फ्रान्सने १५ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी शाळांमध्ये मोबाईल फोनवर बंदी घालण्याची चाचणी सुरू केली आहे. ही चाचणी यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात लागू केली जाऊ शकते. इतकेच नाही, तर फ्रान्समध्ये १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले पालकांच्या परवानगीशिवाय समाजमाध्यमाचा वापर करू शकत नाही, असाही कायदा आहे. त्याच वेळी नॉर्वेसारख्या युरोपीय देशाने समाजमाध्यमाचा वापर करण्याची वयोमर्यादा १३ वरून १५ वर्षे करण्याची घोषणा नुकतीच केली आहे. हे सगळे बघता भारतासारखा सोशल मीडियाचा प्रचंड वापर करणारा देश नेमकी कोणती भूमिका घेतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहेच; खेरीज तरुणांची सर्वाधिक संख्या असणाराही देश आहे. आपल्याकडे अगदी लहान वयापासून मुलांच्या हातात फोन दिला जातो आणि ते समाजमाध्यमावर सक्रिय होतात. महत्त्वाचे म्हणजे जगभरातील सर्वात स्वस्त इंटरनेट सेवा मिळत असल्यामुळे प्रत्येक वर्गातील मुले याचा बिनधोक वापर करताना दिसतात. स्वाभाविकच नकळत्या, कोवळ्या आणि अजाण वयात समाजमाध्यमाच्या जंजाळात अडकून, चुकीची माहिती मिळवून गैरवापर करणाऱ्यांची मोठी संख्या आणि या योगे घडलेले भीषण गुन्हे दररोज चर्चेत असतात. मुलांना ज्ञानाची गरज असते, यात शंका नाही. मात्र समाजमाध्यमावरून ही गरज भागवणारे ज्ञान मिळते की मुले चुकीच्या आणि अनावश्यक माहितीच्या महापुरात वाहवली जातात, हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे भारत सरकारही या प्रश्नाचा साकल्याने अभ्यास करून आवश्यक ती पावले उचलेल, अशी आशा वाटते.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१०)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

व्यास महर्षींनी लिहिलेला महाभारत हा ग्रंथ सर्व बाबतीत विलक्षण असा आहे. वर वर विचार करणाऱ्या आणि उथळ बुद्धीच्या माणसाला हा ग्रंथ म्हणजे कौरव आणि पांडव यांच्यातील गृहकलह किंवा धृतराष्ट्र आणि युधिष्ठिर या काका-पुतण्यांमधील वारसा हक्कासंबंधात झालेला विवाद, जो इतका विकोपाला गेला की, त्याचा सुप्रीम निवाडा कुरुक्षेत्रावर झालेल्या रक्तपातातूनच लिहावा लागला असे वाटते. या संदर्भात व्यासांनी हाच स्पष्ट संदेश दिला आहे की भरताच्या वंशजांनो! वारसदारांनो! लक्षात ठेवा! कोणत्याही धृतराष्ट्री मनोवृत्तीचा ज्याचा उल्लेख आपण या आधीच्या लेखांमध्ये 'पाकिस्तानी' वृत्ती म्हणून केला आहे, अंत हा कोणत्याही युगातील कुरुक्षेत्रावर म्हणजे युद्धभूमीवरच होत असतो. कारण कोणत्याही युगातील 'फाळणी'चा तो अपरिहार्य असा परिणाम असतो. तो तुमच्या सात्त्विक, पापभिरू, सज्जन, मानवतावादी, सर्वधर्म समान, प्रत्येकात परमेश्वराचा अंश आहे या तथाकथित दैवीगुणसंपदेने कधीही टळत नसतो किंवा टाळल्याही जात नसतो. कारण तुमची इच्छा असो वा नसो, तुमच्या 'अहिंसामयं' धर्माला ते मान्य असो वा नसो, तुमच्या सर्व संपत्तीचे, भूमीचे, स्त्रियांचे, बळजबरीने हरण करून भूतलावरील तुमचे अस्तित्वच नष्ट करण्याचा चंग जर आम्ही बांधला आहे, निश्चयच जर आम्ही केला आहे, तर तुम्हाला काय वाटते? जग काय म्हणेल? याचा विचार करण्याची आम्हाला गरजच काय? आम्ही सरळ झरळ तुमच्या विरुद्ध, तुमच्या धर्माच्या विरुद्ध 'जिहाद' पुकारणार. तुमची इच्छा असली तरी नसली तरी, तुम्ही श्रेष्ठ आर्यांचे 'वारसदार' असाल, समुद्र वलयांकित संपूर्ण पृथ्वीवर राज्य करणाऱ्या भरताचे रक्त जर तुमच्या धमन्यांमधून वाहत असेल तर या - आमच्याशी दोन हात करा, नाहीतर भरा! असा सरळ सरळ त्यांचा काफरांशी म्हणजे त्यांच्या शत्रूशी वागण्याचा त्यांच्या ऐतिहासिक वाटचालीचा इतिहास आहे. त्याच्याशी ते एकविसाव्या शतकातही ते तितकेच प्रामाणिक आहे जितके त्यांच्या आक्रमणाच्या प्रारंभ काळात होते. प्रश्न आमचा आहे. आमचे सुदैव इतकेच आहे की, भरतवंशीयांना, त्यांच्या धर्म, संस्कृतीला सावरण्यासाठी वेळो वेळी एखादी सुयोग्य नेतृत्व करणारी व्यक्ती उदयाला येते, बिघडलेला तोल सांभाळते, घसरणीला लागलेली गाडी सांवरते, तिला नीट रुळावर आणते आमचा जीवन प्रवास हा सुरळीतपणे चालू होतो. पण या जीवनप्रवासातील अनेक खाच-खळगे अपघातग्रस्त स्थळे अद्याप लक्षात घ्यायला आम्ही तयार नाही. इतिहासापासून आम्ही काही शिकलो नाही. शिकायला तयार नाही.

बांगलादेशातील जिहादी सत्ता परिवर्तन हे त्याचे ताजे उदाहरण आहे. त्यावेळी जगाने स्तिमित व्हावे या प्रकारचा पराक्रम आपल्या सेनेने केला. त्र्याण्णव हजार पाकिस्तानची सेना 'दाती तृण धरून' शरण आली. त्यावेळी 'व्याप्त काश्मीर परत द्या आणि आपली सेना परत न्या', असा जेत्याला साजेसा व्यवहार आम्ही केला नाही. कारण शत्रूशी कसा व्यवहार करावा हे आम्ही शिकलोच नाही. महाभारतकार म्हणतात, हे राजन् प्रजापालन, शत्रूचा संहार आणि राज्यातील स्त्रियांचे संरक्षण हे तुझे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी तू साम-दाम-दंड यांचा निग्रहपूर्वक वापर कर. ज्याच्या राज्यात दुष्टांना, स्वार्थी लोकांना, राज्याच्या धनाचा अपहार करणाऱ्यांना संरक्षण मिळते ते राज्य लवकरच विनाश पावते. जो राजा, आपल्या राष्ट्रातील दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांचा विनाश करीत नाही, छुपेपणाने शत्रूला मदत करणाऱ्या (आजच्या परिभाषेत 'स्लिपर सेल') राष्ट्रद्रोही लोकांचा समूळ नायनाट करीत नाही, त्याचे राज्य हे केव्हाही नष्ट होऊ शकते. हे राजन! लक्षात घे- राष्ट्रावर येणारी संकटे ही बाह्य आणि आभ्यंतर अशी दोन प्रकारची असतात. बाह्य संकटांचा परिहार हा सैन्य शक्तीने होतो तर अंतर्गत संकटांचा नाश जागृत जनशक्तीने होत असतो. गरुडाच्या पंखाप्रमाणे ज्याची ही दोन्ही पंख मजबूत आहेत त्याचेच राज्य चिरंतन होते.(शिवरायांचा आठवावा प्रताप). जो राज्याधिपती शत्रूशी शत्रूप्रमाणेच वागतो आणि मित्राशी मित्राप्रमाणे वागतो त्याचा पराभव कधीही होत नाही. कारणे- यास्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिन्स्तथा वर्तितव्य धर्मः। मायाचारो मायया वर्तितव्यः साध्वचारः साधूना प्रत्युपेयः ॥ (विदुरनीति अ.३७वा ) म्हणजे 'ज्याच्याशी जो मनुष्य जसा वागतो त्याने त्याच्याशी तसेच वागावे हा धर्म आहे. कपटाने वागणाऱ्याशी कपटाने वागावे आणि भलेपणाने वागणाराशी भलेपणाने वागावे हा धर्म आहे.'

महाभारताच्या या सैद्धांतिक आणि वैचारिक कसोटीवर भारतीय 'जनशक्तीतील' प्रत्येक घटकाने आपले कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आज आली आहे. भारतासारख्या सध्याच्या काळात जागतिक स्तरावर 'समर्थ भारत' म्हणून वाटचाल प्रारंभ करणारा देश 'अंतर्गत अराजकाच्या उंबरठ्यावर' हळूहळू येत आहे. 'निवडणुकीमधील 'होट बँके'च्या, लोकशाहीतील एक अचूक अस्त्रामुळे, आपण जे ठरवू ते घडवू शकतो याचा एक विपरीत आणि विकृत दर्प आणि अहंकार त्यांचा जागृत होऊन 'शासनापासून, मंदिर-मशिदीच्या प्रकरणातून मुस्लिम विद्यापीठातून, जमाते इस्लामीच्या निघणाऱ्या फतव्यांपासून हिंदू समाजाचा तेजोभंग करण्याचा, त्यांच्यात मानसिक भयगंड निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. हे आव्हान हिंदू समाजाला स्वीकारावेच लागेल. त्यांतून त्याची सुटका नाहीच.

सोळाव्या शतकात हे आव्हान महाराष्ट्रातील जनशक्तीने स्वीकारले आणि भारताचे 'दारुल इस्लाम' (आजच्या भाषेत 'गजवा-ए-हिंद) करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या औरंगजेबाला खुलताबाद येथे चिर विश्रांती दिली. छत्रपती संभाजी महाराजांच्या आत्म्याला शांती मिळाली. 'म्लेंच्छांचे बहुता दिसांचे माजलेले बंड नाहीसे होऊन हिंदुस्तान बळावले'- हेच स्वप्न राष्ट्रगुरू श्री समर्थांनी पाहिले होते. -स्वप्न कुणाचे पूर्ण होणार? सज्जनगडावरील समाधिस्त झालेल्या श्रीसमर्थांचे? की कबरीत विश्रांती घेणाऱ्या औरंजेबाचे?

निर्णय हिंदू समाजाला घ्यायचा आहे.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# 'सराय'च्या जगण्याची आशा पल्लवित?

चंद्रपुरातील ऐतिहासिक महत्त्व असलेली जुनी 'सराय' जवळजवळ जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे. येणाऱ्या पावसाळ्यात राहील का, अशी शंका यावी एवढी जर्जर स्थिती या १०० वर्ष ओलांडलेल्या वास्तूची झाली आहे. डागडुजी करून ती जपली जावी म्हणून काही नागरिकांचा लढा सुरू आहे. या इमारतीला संरक्षित स्मारक घोषित करणार का? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पुरातत्व विभागाच्या संचालकांना विचारला आहे. येत्या १५ जानेवारीपर्यंत त्यांना याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करायचे आहे. न्यायालयाच्या हस्तक्षेपाने आता 'सराय'च्या जगण्याची आशा पल्लवित झाली, असे म्हणता येईल. मात्र, विदर्भात अशा अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत, ज्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे आणि त्या शेवटच्या घटका मोजत आहेत.

तत्कालीन चांद्यात १९२१ मध्ये बांधण्यात आलेल्या 'ओल्ड सराय बिल्डिंग'ला तिच्या आठवणींसह जिवंत ठेवण्यासाठी काही वर्षांपूर्वी नागरिकांनी आंदोलन उभारले. उपोषणाचा इशाराही देऊन झाला. पण कुणालाच शहराच्या मध्यभागी असलेल्या या ऐतिहासिक वारशाकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. शेवटी तिचे संरक्षण व्हावे यासाठी इतिहासाचे अभ्यासक अशोकसिंग ठाकूर व मधुसूदन रुंगठा यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी सुरू आहे. या इमारतीच्या संवर्धनाबाबत संबंधित विभागांत मतभिन्नता आहे. राज्याच्या पर्यटन विकास विभागाने 'सराय'चा 'हेरिटेज'मध्ये समावेश होऊ शकत नाही, असे सांगितले. तर राज्य हेरिटेज प्राधिकरणाने तिचे संवर्धन होऊ शकते, असे मत व्यक्त केले आहे. चंद्रपूर महानगरपालिका तर या इमारतीला जमीनदोस्त करून त्या ठिकाणी वाणिज्यिक कॉम्प्लेक्स उभारण्याची योजना आखून आहे. पुरातत्व विभागाचे काय मत आहे, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



असे म्हटले जाते, इतिहास विसरून भविष्याकडे केलेली वाटचाल मोठी अवघड असते. कुठल्याही शहरात एकतरी अशी वास्तू असते जी आपल्या भूतकाळाची आठवण करून देते. बहुतांश, तो त्या नगराचा गौरवशाली इतिहास असतो. गावातले चार-दोन लोक अशा वास्तूच्या जतनासाठी शासन व प्रशासनाशी गेली अनेक वर्ष भांडताहेत. पण त्यांना 'क्यूं गडे मुडदे उखाडते हो', असे काहीसे ऐकावे लागते. असाच एक संघर्ष चंद्रपुरात गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. 'सराय' नावाच्या या वास्तूने एकेकाळी कमालीचे वैभव बघितले, पण आता ती स्वतःला कसेबसे उभे ठेवण्याचा संघर्ष अनुभवत आहे. काही वर्षांपूर्वी या वास्तूच्या जतनासाठी पत्रव्यवहार, गाठीभेटी झाल्या. विविध पक्षांतील नेतेमंडळींनीही प्रसिद्धीपत्रक काढून आपल्याला या पुरातन वास्तूबद्दल किती चिंता आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला. आश्वासनांची जोरदार बरसात झाली. पण त्या पावसात या इमारतीचे छत कोसळले. शेवटी न्यायालयात जनहित याचिका दाखल करावी लागली.

'सराय'च्या जतनाची कहाणी केवळ प्रातिनिधिक स्वरुपाची आहे. अशा अनेक वास्तू विदर्भात कुठल्यातरी जनहित याचिकेची वाट पाहात आहेत. कारण त्या शहरांतून अशा वास्तूंच्या जतनाचे सारे प्रयत्न गळून पडले असतील. वैनगंगेच्या काठावर वसलेल्या आणि विदर्भाची काशी म्हणून ओळल्या जाणाऱ्या आठव्या शतकातील 'मार्कंडा' मंदिराच्या जतनासाठीही खूप प्रयत्न करावे लागले. अजूनही तिकडे मोठ्या विकासाची अपेक्षा शिल्लक आहे. याच जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातले भोवरागड किल्ला, चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरचा गोंडकालीन किल्ला, नागपूर जिल्ह्यातील भिवापूरची पुरातन पायविहीर, भंडारा जिल्ह्यातील कैसर ए हिंद दरवाजा, ऐतिहासिक पांडे महाल, गिरजा पार्वती गुंफा, यवतमाळ जिल्ह्यातील ढाकणीचा बारव, लाडखेड येथील दक्षेश्वर मंदिर, रंगनाथ स्वामी मंदिर, बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीची गढी, चिंचखेड येथील शिव मंदिर, चिंचपूर-खामगावचे दोन पुरातन बारव, अकोला जिल्ह्यातील बाळापूरचा किल्ला, सांगोळा येथील दशानन रावण मूर्ती, मनसरचे स्तूप आणि चैत्यगृह, गोंदिया जिल्ह्यातील कामठा किल्ला अशी विदर्भातील कितीतरी ठिकाणे आहेत, जी जपली गेली पाहिजे. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. पुरातत्व विभागाच्या कायद्याने त्याकडे कुणाला बघता येत नाही आणि ज्यांनी बघावे ते ढुंकूनही पाहण्याच्या मानसिकतेत नाही!

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# दमदार बॅटिंगचा पहिला महिना

मोरेश्वर बडगे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील तीन पक्षांच्या महायुती सरकारला एक महिना पूर्ण झाला. २३ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले. पाच डिसेंबरला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोघांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र मंत्रिमंडळाचा विस्तार व्हायला १५ डिसेंबर उजाडला. खातेवाटपासाठी आणखी सात दिवस म्हणजे २१ डिसेंबरपर्यंत थांबावे लागले. बिनखात्याच्या सरकारने नागपूर अधिवेशन झेलले. जिल्ह्याचे पालकमंत्री वाटायचे आहेत. त्यासाठीही प्रचंड चढाओढ आहे. म्हणायला ४२ मंत्री. जगन्नाथाचा हा रथ सर्वांना सोबत घेऊन फडणवीस मार्ग काढताना दिसत आहेत. निकालानंतर तब्बल एक महिन्याने फडणवीस सरकार कामाला लागले. 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे सांगणारे सरकार प्रचंड बहुमत असताना असे अडखळत का चालतेय? असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविक आहे. विधानसभेच्या एकूण २८८ आमदारांपैकी २३७ आमदार सत्तेच्या पाठीशी आहेत. एकट्या भाजपाचे १३२ आमदार आहेत. बहुमतासाठी १४५ आमदार लागतात. त्यामुळे सरकारला कुठला धोका नाही. 'डबल फेव्हिकॉल'चं हे सरकार म्हणता येईल. 'ही 'टेस्ट मॅच' आम्ही चांगली खेळू' असे फडणवीस यांनी म्हटले आहे. 'राजकारणात ज्या विचारांनी आलो त्यात सत्ता हे सेवेचे माध्यम असल्याचं आम्हाला शिकवलंय. त्यामुळे सत्ता माझ्या डोक्यात जाणार नाही' असे आश्वासक उद्गार फडणवीस यांनी नागपुरात मीडियाशी बोलताना काढले. जनतेला तसा विश्वास आहे. हा विश्वास सार्थकी लागेल याची काळजी सत्ताधाऱ्यांना घ्यायची आहे.

फडणवीसांची पहिली टर्म महाराष्ट्राने पाहिली आहे. आता लोकांना 'देवराज्य' पाहायचे आहे. देवेंद्र हे सरकार कसे चालवतात, खिरापती वाटतात की रिझल्ट देतात याची त्यांच्या चाहत्यांना उत्सुकता आहे. २०१४ ते २०१९ अशी सलग पाच वर्षे फडणवीसांनी सरकार चालवून दाखवले. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते. मात्र त्यांनाही सलग पाच वर्षे राज्य करता आले नाही. मंत्रिपदाचा कुठलाही अनुभव नसताना फडणवीसांनी हा विक्रम केला. मात्र तेव्हाची गोष्ट आणि आताचा काळ यात फरक आहे. तेव्हा शिवसेनेसोबत युती होती. आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस मिळून तीन पक्षांचे सरकार आहे. विरोधी पक्ष दुबळा आहे. फडणवीस यांच्यापुढे बाहेरून फारसे कुठले आव्हान नाही. मात्र मित्रपक्षांना त्यांना 'सांभाळावे' लागेल असे दिसते. नाराजीमध्ये एकनाथ शिंदेंना गावाला जायची सवय आहे. गेल्या महिन्यात आपण ते पाहिले. अजितदादाही अधूनमधून 'नॉट रिचेबल' होतात. मित्रपक्षांना सांभाळताना फडणवीसांची कसरत होणार आहे. अजितदादांनी ओबीसी नेता छगन भुजबळ यांना यावेळी वगळले. संतप्त भुजबळांना फडणवीस कसे 'सांभाळतात' ते आता पाहायचे. विरोधकांनी बीड जिल्ह्यातील सरपंचाच्या हत्येचे प्रकरण लावून धरले आहे. अजितदादांच्या जवळचे सहकारी मंत्री धनंजय मुंडे यांना टार्गेट केले जात आहे. हा नाजूक विषय हाताळताना गृहमंत्री या नात्याने फडणवीसांचा कस लागणार आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मनोज जरांगे पाटील यांनी गेली दोन वर्षे फडणवीसांना टार्गेट केले होते. जरांगे पाटलांनी पुन्हा आंदोलनाची तयारी चालवली आहे. यावेळी पूर्वीसारखा जोर नसेल. मात्र काड्या होतील. पुढच्या चार-सहा महिन्यांत महापालिका, जिल्हा परिषद यांच्या निवडणुका लागणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका महायुती म्हणून लढल्या जातात की तिन्ही पक्ष स्वबळावर लढतात त्यावर मित्रपक्षांचा पुढचा प्रवास अवलंबून असेल. २०२९ च्या निवडणुका भाजपा स्वबळावर लढेल असे अमित शाह यांनी मागेच जाहीर केले आहे. त्यामुळे पाच वर्षांनंतर आपले भवितव्य काय? याची चिंता आतापासूनच मित्रपक्षांना सतवायला लागली असणार. तुम्ही लिहून ठेवा. २०२९ मध्ये प्रादेशिक पक्ष संपलेले असतील. भाजपा आणि काँग्रेस हेच दोन मोठे पक्ष असतील. राजकीय आघाडी सांभाळताना फडणवीसांना आर्थिक शिस्तही बिघडणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. 'लाडकी बहीण'सारख्या योजनेने महायुतीला सत्ता दिली. मात्र असल्या लोकप्रिय योजनांचे आर्थिक ओझे भविष्यात वादाचा विषय होऊ शकतो. सत्तेत आलो तर शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन भाजपाने दिले होते. ते पाळायचे तर तेही ओझे मोठे असेल. एकंदरीत साऱ्याच आघाडीवर सरकारची कसरत आहे.

महायुतीचे सरकार म्हणजे नवा प्रयोग आहे. या वेळचे सरकार एकदम ताजेतवाने आहे. ४२ जणांच्या मंत्रिमंडळात तब्बल १९ नवे चेहरे आहेत. त्यात ८ नवे चार भाजपाचे, शिंदे सेनेचे ६, तर अजितदादांच्या पक्षाचे ५ नवे चेहरे आहेत. हे ऑपरेशन करताना हायकमांडने अनेकांना नारळ दिला. बहुतेकांनी हे वास्तव स्वीकारले. मात्र ७७ वर्षांचे दादांच्या पक्षातले ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी आपली नाराजी इश्यू बनवली आहे. ओबीसींच्या अस्मितेचा विषय बनवला आहे. अजितदादा आणि छगन भुजबळ यांच्यातली कटुता जुनी आहे. त्यामुळे भुजबळ पुढे काय करतील? कुठे जातील याची जोरदार चर्चा आहे. भुजबळ अजितदादांना भेटले नाहीत. मात्र फडणवीसांना भेटले. मात्र एक लिहून ठेवा. भाजपा त्यांना जवळ करणार नाही. कारण तसे केले तर महायुतीतच नवे ताणतणाव निर्माण होतील. भाजपाला ते परवडणारे नाही. भुजबळ उद्धव ठाकरेंकडेही जाऊ शकत नाहीत. कारण ठाकरेंनी अलिकडे हिंदुत्वाचा मुद्दा उचलून धरणे सुरू केले आहे. महात्मा फुलेंचा वारसा सांगणारे भुजबळ आणि त्यांच्या समता परिषदेच्या विचारधारेत आता उद्धव बसत नाहीत. भुजबळांसाठी काँग्रेस पक्ष ही चांगली जागा ठरू शकते. या वयात भुजबळ आपली जागा कुठे शोधतात, त्याची नक्कीच उत्सुकता आहे.

सारेच विरोधी पक्ष आणि त्यांच्या नेत्यांची अवस्था भुजबळांसारखी दयनीय आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांना जमिनीवर आणून ठेवले आहे. पुढची साडे चार वर्षे आता निवडणुका नाहीत. महायुतीचे सरकार एकदम 'भूकंपप्रूफ' आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेच नव्हे तर शरद पवारांपुढेही आपला उरलासुरला पक्ष टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. शरद पवार फिरत असले तरी मनाने थकले असणार. उद्धव ठाकरे यांची 'मशाल' पेटायला तयार नाही. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे. मात्र त्याच्याकडे दमदार नेते नाहीत. ठाकरे सेनेकडे तर मतदारसंघापुरतेही नेते उरले नाहीत. मुंबईची महापालिका गेली २५ वर्षे उद्धव यांच्या शिवसेनेकडे राहिली. मुंबई महापालिका म्हणजे ठाकरे यांचा ऑक्सिजन. आज ही महापालिकाच हातातून जाण्याची भीती उद्धव यांना सतावत आहे. गप्पा मात्र स्वबळाच्या सुरू आहेत. पण स्वबळ उरले आहे कुठे? मुख्यमंत्री व्हायच्या लोभाने उद्धव हे शरद पवारांसोबत गेले. सत्तेच्या धुंदीत दिल्लीला धडक द्यायला निघाले होते. पण काय मिळाले? अडीच वर्षांत मुख्यमंत्रिपद गेले, पक्षही गेला. आता मुंबईही हातची जाणार आहे. मराठी अस्मितेला दगा देणाऱ्या सत्तेच्या लोभी नेत्याचे हेच हाल होणार. 'सेक्युलर' व्हायला निघालेल्या उद्धव यांच्यावर आता मारुती मंदिरासाठी आरती करायची वेळ आली आहे. विधानसभा निवडणुकीने उद्धव ठाकरेच नव्हे तर शरद पवार यांचेही राजकारण संपवले. हिंदुत्वाशी गद्दारी केल्याची ही शिक्षा. 'एक अकेला देवेंद्र' काय करू शकतो याची ही झलक आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### लोणार सरोवराचा ठेवा जपला पाहिजे

लोणार सरोवर हे वैज्ञानिकासाठी मोठे आकर्षण आहे. हा एक जागतिक ठेवा आहे. अलिकडे या सरोवराच्या पूर्वेकडील बाजूस मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाले आहे असे वर्तमानपत्रातील बातम्यांवरून कळते. या भागातून शेगाव ते पंढरपूर हा मार्ग जात आहे. तेथील अवजड वाहनाच्या गतीमुळे तसेच त्या भागात मोठ्या प्रमाणावर झालेल्या वृक्षतोडीमुळे कडा ढासळला आहे. वरची माती पाण्याने भरलेली असल्याने ती अस्थिर होऊन खाली सरकते असे खगोल संस्थेचे प्रमुख मयूरेश प्रभुणे यांचे म्हणणे आहे. काठावरून जाणाऱ्या महामार्गावर सतत वाहतूक चालू असते. जड वाहनांच्या कंपनामुळे तसेच एखादा मोठा वृक्ष तोडल्यास तेथील भाग ठिसूळ होतो. जमीन ढासळू लागते असेही मत प्रभुणे यांनी व्यक्त केले आहे. हवामानातील बदल, पर्यावरणातील इतर मानवी प्रभावामुळे होणारे ग्लोबल वार्मिंग तसेच नैसर्गिक घटनांची वारंवारता यामुळे भूस्खलनाची घटना घडत आहे. एकूणच लोणार सरोवर हा एक नैसर्गिक चमत्कारच आहे व तो ठेवा आपण जपला पाहिजे.


**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

### गांधीसागरची भिंत, पार्किंग आणि जाहिरात फलक

गांधीसागर तलावाचे सध्या सौंदर्यीकरण सुरू आहे. चारही बाजूंनी आकर्षक अशी भिंत तयार करण्यात आली आहे. छानसे गेटही तयार आहे. आतमध्ये काय सुरू असेल याचे जनतेत कुतूहल आहे. भिंतीलगतचा भाग आता छान मोकळा झाला आहे. तेथे फूटपाथ ठेवलेला नाही हे योग्यच आहे. कारण फेरीवाले व फुटकळ विक्रेते केव्हा आपले पोते टाकून बसतील याचा नेम नाही. पण हल्ली श्रीमंत व सुशिक्षित नागरिकांनीच काही नियम मोडणे सुरू केले आहे. प्रथम तर जागा मोकळी पाहून आपापली वाहने तेथे उभे करणे सुरू आहे. वेळीच हटकले नाही तर हळूहळू ती जागा कार पार्किंग म्हणून प्रसिद्ध होईल तसेच एका पक्षाच्या राजकीय नेत्याचे भले मोठे दोन पोस्टर्स तेथे भिंतीलाच लावले आहे. ही जर सुरुवात झाली तर विविध राजकीय पक्षाची ती 'प्रसिद्धी भिंत' म्हणून ओळखली जाईल अशी भीती आहे. संबंधित पोलिस विभाग अथवा जबाबदार अधिकारी यांनी वेळीच दखल घ्यावी व त्या भिंतीलगत काहीही अतिक्रमण उभे राहू नये यासाठी कर्तव्यतत्पर असावे असे वाटते.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा भोंगळ कारभार



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा म्हणजेच एस. टी.चा खूप भोंगळ कारभार अनुभवास आला व एस. टी. म्हणजे 'सतत त्रास' अशीच उपाधी द्यावीशी वाटते. झाले असे की एका मित्राच्या लग्नासाठी खामगावला जायचे होते. थेट रेल्वे नसल्यामुळे व दुपारी १२ वाजेपर्यंत पोहोचायचे असल्यामुळे बसने जायचे ठरवून ऑनलाईन सकाळी ८ वाजताची 'शिवशाही'ची बुकिंग केली. सकाळी आठ वाजता नागपूरहून सुटणारी बस सकाळी ११.३० वाजता खामगावला पोहोचेल असे एस. टी.च्या वेबसाईटवर दाखवण्यात आले. रविवार २२ तारखेला सकाळी ७.३० वाजता गणेशपेठ बसस्थानकावर पोहोचलो, परंतु बसची निर्धारित वेळ झाली तरी बस फलाटावर आली नाही म्हणून विचारपूस करण्यास चौकशी केंद्रावर गेलो व त्याला ऑनलाईन बुकिंग केल्याचे तिकीट दाखवले तर आश्चर्याचा धक्काच बसला. कारण तेथील कर्मचाऱ्याने तिकीट पाहून सांगितले की अशी कोणतीच बस नाही. जेव्हा खामगाव डेपोची बस येईल तेव्हाच कळेल. यावर त्याने तिकीट बघून हे असे ऑनलाईन तिकीट बुक करत जाऊ नका. कारण ती जुनी साईट आहे व टाईम टेबलप्रमाणे अशी कोणतीच बस नाही असे सांगितले. शिवशाही बसचे जास्त भाडे आकारून काढलेले तिकीट असल्याने त्याने सल्ला दिला की, ९ वाजता हिरकणी बस येईल त्याने जा किंवा लाल परीने पण जाऊ शकता. (परंतु भाडे फरक काही परत मिळणार नाही). नंतर ९.३० वाजता बुलढाण्याला जाणारी एक बस आली. चौकशी खिडकीवरील कर्मचारी त्या बसच्या कंडक्टरशी बोलला व आम्हाला त्या बुलढण्याच्या बसमध्ये बसायला सांगितले. आमचा प्रवास एकदाचा १० वाजताच्या सुमारास सुरू झाला. कोंढाळीच्या थोडे आधी कंडक्टरने तिकीट तपासल्यानंतर पुन्हा एक धक्का दिला की, तुम्ही या बसमध्ये कसे चढले, तुम्हाला कोंढाळीला उतरवतो तिथून दुसरी बस पकडा. आम्ही त्याला आठवण करून दिली की नागपूर स्थानकावर चौकशी काऊंटरच्या कर्मचाऱ्याबरोबर झालेल्या बोलण्याची, तेव्हा त्याला जाग आली व आमचा पुढील प्रवास सुरू झाला. अशा एस. टी. (सतत त्रास) देणाऱ्या महामंडळाची धास्ती निर्माण करणारी व ऑनलाईन बुकिंगला नकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या त्यांच्याच कर्मचाऱ्याचे सल्ले ऐकून नको बाबा एस. टी. म्हणायची वेळ आली.

**चैतन्य दारव्हेकर**/९८६००००२९२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त

### यशोधरा हॉस्पीटलसमोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
हैद्राबाद रोडवरील यशोधरा हॉस्पीटलसमोरून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत दत्तात्रय नरसिंह माने (वय ३६, रा. गलंदवाडी, अनगर, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी दत्तात्रय माने यांनी त्यांची एम एच १३ ईजे ६१४९ क्रमांकाची दुचाकी ही यशोधरा हॉस्पीटलसमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.

### रस्ते अपघातात औजचा शेतकऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
शेताकडे चालत जाणाऱ्या शेतकऱ्याच्या रस्ते अपघातात मृत्यू झाला. मुरलीधर मलकप्पा घंटे (वय ५०, रा. औज, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. २५ डिसेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास मुरलीधर घंटे हे औज येथून त्यांच्या स्वतःच्या शेताकडे चालत जात होते. त्यावेळी त्यांना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ते बेशुध्दावस्थेत रस्त्याच्याकडेला मिळून आले. त्यामुळे त्यांना मुलगा अनिल घंटे यांनी उपचारासाठी बेशुध्दावस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी गुरुवारी पहाटे दोनच्या सुमारास मुरलीधर घंटे यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. सुश्मिता यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### करवतीने मारल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
शहरातील बुधवार पेठेत घरगुती वादातून करवतीने मारल्याने दोघे जखमी झाले. सत्वशिला मुकींदा कदम (वय ३५, रा. रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) आणि विकास मुकींदा कदम (वय २४) अशी जखमींची नावे आहेत. २५ डिसेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास राहत्या घरी घरगुती वादातून अमोल कदम व छाया गायकवाड यांनी मिळून करवतीने छातीस मारहाण करून जखमी केले. त्यामुळे दोघांनाही उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## निधन वृत्त...

### हर्षवर्धन शहा



**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**
सकल जैन सामजाचे अध्यक्ष व श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन रतनचंद शहा- निंबर्गीकर (वय ७७) यांचे गुरुवारी (दि. २६) रोजी सकाळी ठीक ७.१० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, नातू व जावई असा परिवार आहे. प्रसिजन कॅमशाफ्टचे अध्यक्ष यतीन शहा यांचे ते चुलत बंधू होत. त्यांच्या पार्थिवावर दुपारी जुना कारंबा नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### व्यंकटेश यनंगदूल



**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**
महालक्ष्मी चौक, विडी घरकुल येथील रहिवासी व्यंकटेश यनंगदूल (वय ८४) यांचे गुरुवारी (दि.२६) रोजी सकळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सांयकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. हिरालाल यनगंदूल यांचे ते वडील होत.

### सुशीला बबलादी



**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**
सम्राट चौक येथील सुशीला देवेन्द्र बबलादी (वय ८४) यांचे गुरुवारी (दि. २६) सकाळी ठीक ७.१० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात

### विजय दासी



**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**
अक्कलकोट रोड गांधीनगर येथील रहिवासी विजय नागनाथ दासी (वय ६८) यांचे गुरुवारी ( दि. २६) पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून व नातू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दुपारी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शकुंतला कुलकर्णी



**अकलूज, दि. २६ डिसेंबर-**
अकलूज ग्रामपंचायतच्या माजी सदस्या व गौरीशंकर महिला उद्योग संस्थेच्या माजी अध्यक्षा शकुंतला रामचंद्र कुलकर्णी (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री साईबाबा सेवा ट्रस्ट व लोकमान्य गणेशोत्सव मंडळाचे सदस्य जयंत कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

### भीमाशंकर घनाते,



**अक्कलकोट, दि. २६ डिसेंबर-**
तालुक्यातील करजगी येथील बसवराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे निवृत्त प्राचार्य भीमाशंकर रघुनाथ घनाते, (वय ७८) यांचे बुधवार (दिनांक २५) रोजी सकाळी १०.२० वाजता अल्प आजाराने निधन झाले.

# आरटीओकडून ३१ पर्यंत वाहनांची तपासणी मोहीम

## मद्यधुंद चालकांवर कारवाई होणार




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
नव्या वर्षाचे स्वागत करताना देताना मद्यसेवन करून वाहन चालविणाऱ्यांविरोधात सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार २५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत शहरात वर्दळीच्या रस्त्यांसह विविध चौकात तपासणीसाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यासाठी सोलापूर शहर आणि ग्रामीण पोलिसांचीही मदत घेण्यात येत आहे.

नाताळ आणि नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी ३१ डिसेंबर हे दोन दिवस सर्वत्र जोरात साजरे करण्यात येतात. या वेळी अनेकजण मद्यसेवन करून वाहने चालवत असल्याचे दरवर्षी निदर्शनास येते. यातून अपघात, वाहतूककोंडी अशा घटनाही नित्य घडतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी यंदा पाच दिवस तपासणी मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय तिरणकर यांनी दिली.

शहरभरात तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी वर्दळीच्या चौकांमध्ये, महत्त्वाच्या रस्त्यांवर लोखंडी अडथळे टाकून नाकाबंदी करण्यात येणार आहे. या ठिकाणी आरटीओ निरीक्षकांची पथके तैनात करण्यात येणार आहेत. वाहनचालकाची अल्कोहोल मूल्यमापन तपासणी यंत्राच्या (ब्रेथ ॲनालायझर) साहाय्याने चाचणी करण्यात येणार आहे. तसेच वाहनाची कागदपत्रे, वाहनचालक परवाना, वाहननोंदणी कागदपत्रे तपासली जाणार आहेत. चाचणीमध्ये मद्यसेवन केल्याचे आढळून आल्यास वाहनचालकावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच वाहन चालवणारी व्यक्ती अल्पवयीन आढळल्यास पालकांवर कारवाई केली जाणार आहे. यामुळे पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहने चालवण्यास देऊ नये. मद्यसेवन करून वाहन चालवू नये, वाहनांचे कागदपत्र सोबत बाळगावे, नियमांचे पालन करावे, असे आवाहन तिरणकर यांनी केले आहे.

> **नाकाबंदी करून तपासणी**
> दर वर्षी नववर्षाच्या स्वागतावेळी सोलापुर शहरातील बार, मद्यालये, हॉटेल रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात येते. यंदाही रात्री उशिरापर्यंत मद्यालये सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. मोकळ्या मैदानांवर, तसेच काही ठिकाणी पार्त्यांचे आयोजन केले जाते. या सर्व ठिकाणाहून ये-जा करताना मद्यसेवन करत वाहन चालवल्यास अपघात होण्याचा धोका असल्याने ही अशी नाकाबंदी करून तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
> **- विजय तिरणकर,**
> **सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर**

## लाखाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
प्लॉटचा मालकी हक्क नसतानादेखील प्लॉट आपला असल्याचे सांगून लाख रुपयांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा ाखल करण्यात आला आहे.

याबाबत बसवराज गुरुपुत्र पाटील (वय ४९, रा. अक्कलकोट रोड, राजीव नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बसवराज उर्फ शिवप्पा पाटील (वय ७३, रा. किसान नगर, भ्रम रअंबिका मंदीराजवळ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मजरेवाडीतील कस्तुरबा नगरातील जुना सर्व्हे नं. २५२ नविन सर्व्हे नं. ५९/ब प्लॉट नं. १९६ हा बसवराज उर्फ शिवप्पा पाटील यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची मिळकत नसतानादेखील मुश्ताक अम ीनोद्दीन बेन्नीशिरूर यांना खोटे सांगून ती आपली असल्याचे सांगितले. या प्लॉटचा खरेदी विक्रिचा व्यवहार बेन्नीशिरूर यांच्या करून त्यांच्याकडून व्यवहारापोटी १ लाख रुपये इसारा पावती नोटरीने करून घेतले. म्हणून बसवराज गुरुपुत्र पाटील व मुश्ताक बेन्नीशिरूर या दोघांचीही फसवणुक केल्याप्रकरणी एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

## तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** शहरातील साईबाबा चौकात राहणाऱ्या तरूणाने विषारी पिवळा रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.

राम अंबादास इप्पानपल्ली (वय २८, रा. साईबाबा चौक, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास राम इप्पानपल्ली हा कुंभारी येथील नविन विडी घरकुल येथे बायकोला बोलावण्यास गेला होता. त्यावेळी बायको घरी परत येत नाही असे म्हणाल्यानंतर रागाच्या भरात रामने अंगणात सडा मारण्याचे विषारी औषध प्राशन केले.

**CALL FOR VENDORS/ SERVICE CONTRACTORS**

Experienced contractors are required to carry out following works at N M Wadia Charitable Hospital, Solapur.
Specialized contractors having experience in carrying out works of Networking, CCTV & Installations, Public Address system, Display, Firefighting system, HVAC, Electrical wiring & Installation, Water treatment plant and Medical gases installation, may apply with biodata explaining capabilities, infrastructure available and similar work experience, before 10th January 2025.

**Ar. Shashikant Chincholi**
**Office No. 3 & 4, 1st Floor, Shraddha Empire, Railway Lines, Solapur. Mob : 9921743257**

Jhaveri

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ३५/२०२४

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात (सौ.शेख मॅडम कोर्ट)**

**१) सौ. मेघना रामचंद्र कुलकर्णी**
वय ६८ वर्षे, धंदा घरकाम रा.१३२८१/Q /६-A, सुदर्शन देसाई कॉलनी व्यंकटाचल, कपली बिल्डींग पाठीमागे, सारस्वतपूर, धारवाड, कर्नाटक राज्य, पिन-५८०००२
**२) सौ. सवित्ता कमलाकर वैद्य**
वय ६६ वर्षे, धंदा घरकाम रा.बी-४. फाऊंटन हेड को ऑप. हौसिंग सोसायटी करिष्मा बिल्डींग समोर, कर्वेरोड, पल्याड, कोथरुड, पुणे-४११ ०३८.
**३) श्रीमती स्नेहल सतीश सोनटक्के**
वय ६५ वर्षे, धंदा सेवानिवृत्त रा.५०२, के विंग, सन युनिव्हर्स पाचवा मजला सर्व्हे नं.५१/१/३/१, नवले आय.टी. पार्क समोर नरे, पोष्ट वडगांव (बु), जि. पुणे-४११०४१.
**४) श्री. श्रीरंग बाळकृष्ण सापटणेकर**
वय ६२ वर्षे, धंदा वकीली, रा.भारतगल्ली, अक्कलकोट, जि. सोलापूर. ह.मु. कल्पवृक्ष ३/२८, समर्थ नगर, उत्तर सदर बझार, सिव्हील हॉस्पीटल जवळ, सोलापूर.
**५) प्रियदर्शन बाळकृष्ण सापटणेकर**
वय ६० वर्षे, धंदा नोकरी रा.अ-२, कृष्णा रेसिडेन्सी, टोळाचा बोळ, ५६०, दक्षिण कसबा, सोलापूर-४१३००७. सर्व आज रोजी मुक्काम अक्कलकोट.
} **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ यांनी अक्कलकोट येथील दिवाणी न्यायालयात इंडियन सक्सेशन ॲक्ट चे कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला (वारस प्रमाणपत्र) मिळणेसंबंधी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ ते ५ हे मयत बाळकृष्ण महादेव सापटणेकर हे दि.०१/०७/२०१३ रोजी मयत झाले आहेत व मीरा बाळकृष्ण सापटणेकर हे दि.३१/०८/२०१२ रोजी मयत झालेले आहेत. या दोघांच्या नावे खाली परिशिष्ठात नमूद असलेल्या विविध बँक व पोस्ट खात्यातील रकमा या वरील अर्जदारांना मिळाव्यात व या अर्जदाराव्यतिरिक्त कै. मीरा बाळकृष्ण सापटणेकर व बाळकृष्ण महादेव सापटणेकर यांना कोणीही वारस नाहीत म्हणून या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज दाखल केलेला आहे.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | खात्याचा तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पोष्ट ऑफिस अक्कलकोट बचत खाते क्र. ९८३२११६७८९ | ८२.८३१.00 |
| २. | भारतीय स्टेट बँक शाखा अक्कलकोट सेव्हींग खाते क्र. ११४१९८७३३४५ | ३३.000.00 |
| ३. | बँक ऑफ इंडिया शाखा अक्कलकोट सेव्हींग खाते क्र. ०७३८१२१००००६९३७ | २५,000.00 |
| ४. | सोलापूर जनता सहकारी बँक शाखा अक्कलकोट बचत खाते क्र.९६ | ५,000.00 |
| ५. | मीरा बाळकृष्ण सापटणेकर यांचे नाव बँक ऑफ महाराष्ट्र अक्कलकोट शाखा बचत खाते क्र. २०१३५३३ | ३,४९७.00 |
| | **एकूण रक्कम रुपये रू** | **१,४९,३२८.00** |

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना इंडियन सक्सेशन ॲक्ट चे कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास अथवा या रकमेसंदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि.०३/०२/२०२५ रोजी अक्कलकोट येथील सह. दिवाणी न्यायाधिश (सौ. शेख मॅडम) यांचे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी. आज दि२६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाने शिक्यानिशी आहे.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**हुकूमावरुन**
**दि.न्या.क. स्तर**
**अक्कलकोट**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन : पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१**
**विभागीय कार्यालय क्र.०७, डफरीन चौक, सोलापूर**

जा.क्र./वि.का.क्र.७/६८३ दिनांक २४/१२/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेकडील विभागीय कार्यालय क्र.७ सातरस्ता परिसरातील मा.माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण पुतळा परिसरात सुशोभीकरण करणे या कामाचे https://www.solapurcoroparation.gov.in या म.प.पा. वेबसाईटवर दि.२४/१२/२०२४ पासून सकाळी १०.०० पासून पाहण्यास उपलब्ध आहे व त्याची ID खालीलप्रमाणे असे.

**संकेतस्थळ अनु.क्र. - ९४४८**

सही/-
**विभागीय अधिकारी**
विभागीय कार्यालय क्र.७

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे सावळेश्वर ता. मोहोळ जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

मौजे सावळेश्वर ता. माहोळ जि. सोलापूर येथील ग.नं १८/२ पैकी यासी क्षेत्र १ हे. ४७ ही मिळकत श्रीकृष्ण विवल सुपेकर यांचे खरेदी मालकीवहीवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असलेची आमचे अशिल १. दादाराव दिगंबर टेकाळे रा. सावळेश्वर २. हरिदास श्रीमंत भक्त, रा. सावळेश्वर ३. केशव काशिनाथ भोगे रा. मोहोळ ४. नितीन किसन बटाने रा. बाळे ५. पवन किसन बटाने रा. बाळे ६. विजय किसन बटाने रा . बाळे ७. पदमाकर किसन बटाने रा. बाळे ८. योगेश विलास गाडेकर रा. सावळेश्वर यांना खात्री देवून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना विक्री करणेचे ठरवले आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचा खरेदी, गहाण, दान, लीज, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, साठेखत, नोटरी दस्त, सावकारी, दावा अशा स्वरूपाचा किंवा इतर कोणताही हक्कहितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांच्या आत खालील पत्यावर लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह नोंदवावी जर मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास पर नमूद मिळकती निर्वेध व निजोखमी असल्याचे समजून आमचे अशिल ठरल्याप्रमाणे वर नमूद मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कसलीही हरकत किंवा तक्रार आमचे अशिलावर किंवा सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २६/१२/२०२४

**अशिल**
**१. दादाराव दिगंबर टेकाळे २. हरिदास श्रीमंत भक्त,३. केशव काशिनाथ भोगे ४. नितीन किसन बटाने ५. पवन किसन बटाने ६. विजय किसन बटाने ७. पद्माकर किसन बटाने ८. योगेश विलास गाडेकर रा.सावळेश्वर ता. मोहोळ जि. सोलापूरतर्फे ॲडव्होकेट**

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. सागर अजिनाथ कन्हेरे**
**मु. पो. माढा, ता. माढा, जि. सोलापूर**
**मो. नं ७७६९८३८१८४**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि व सब डि सोलापूर ता. द. सोलापूर मधील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि व सब डि सोलापूर ता. दक्षिण सोलापूर पैकी मौजे होटगी ग्रामपंचायत गावठाण हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ९८७ यांचे एकूण क्षेत्र २२.४ चौ. मी. इतके आहे. यासी ग्रामपंचायत अ.नं. १०६९ मिळकत क्र. ९८० याचे क्षेत्र ४१४ चौ. फुट अथवा ३८.४७ चौ.मी. इतके आहे. यात १३X१८=२३४ चौ. फुटामध्ये पत्राशेड मारलेली असून १०X१८=१८० चौ. फुटाची जागा खुली आहे. याची चतुःसीमा: पूर्वस- रस्ता, दक्षिणेस ग्रामपंचायत मिळकत नं. ९७५, पश्चिमेस गावठाण रस्ता, उत्तरेस- जि. प. शाळेची जागा असून सदर मिळकत ही प्रस्तुत जाहीर नोटीसीचा विषय असून सदर मिळकतीचे मालक हे श्री. पंडित व्यंकप्पा मंजलेकर यांनी विक्रीस काढलेली असून सदर जागेच्या व्यवहाराबद्दल आमच्या अशीलांशी बोलणी झालेली असून सदर मिळकत आमच्या अशिलास कायम खूष खरेदीने देण्याचे काबुल करून आमच्या अशिलांना जाहीर नोटीसीद्वारे हरकती मागविण्यासाठी संमती दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखामी असल्याची खात्री त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे.

तथापि, यदाकदाचित उपरोक्त मिळकतीवर कोणचाही कसल्याही स्वरुपाचा बोजा, टाच, दावा अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क / हितसंबंध असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आमच्या खालील नमूद पत्त्यावर संबंधित कागदपत्रासह हरकत/नोटीस पाठवून आमच्या अशिलांची खात्री पटवून द्यावी. सदर कालवधीत कोणतीही तक्रार / हरकत प्राप्त न झाल्यास आमचे अशील व्यवहार पूर्ण करून सदर मिळकतीचे खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कसलीही तक्रार/हरकत चालणार नाही.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २६/१२/२०२४.

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**ॲड. अकील गफूर हिमोणे**
**रा. १४/अपना नगर, मजरेवाडी, होटगी रोड, सोलापूर.**
**मो. नं. ९१७५११७७२८**



# अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरात यंत्रमाग कारखान्याला आग

## ४ लूम, एअर कॉम्प्रेसरसह साहित्य जळून मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील संगमेश्वरनगर येथील एका यंत्रमाग कारखान्याला आग लागून यंत्रमागासह कच्चा पक्का माल व अन्य साहित्य आगीच्या भक्षस्थानी पडले. ४ लूम, एअर कॉम्प्रेसरसह साहित्य जळून मोठे नुकसान झाले. अग्निशामक दलाकडून एकूण १५ बंबाच्या सहाय्याने तासाभरात ही आग विझविण्यात आली.

संगमेश्वरनगर येथे अनिता दयानंद कवितके यांच्या मालकीचा यंत्रमाग कारखाना आहे. गुरुवारी पहाटे साडेपाच वाजण्याचा सुमारास या कारखान्याला आग लागली. आगीची घटना सम जताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाकडून शर्थीचे प्रयत्न करीत एकूण १५ बंबाच्या सहाय्याने सुमारे एक तासात ही आग विझविण्यात आली. या आगीत ४ लूम, कोमपलती मशीन, एअर कॉम्प्रेसर, बीम लिफ्टर, वजन काटा, तयार व कच्चा माल इत्यादी जळून मोठे नुकसान झाले. आगीचे कारण समजू शकले नाही.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस डि. सोलापूर, सब डि. व ता. मोहोळ पैकी विशेषतः मौजे वाळूज (दे.) व तालुका मोहोळ येथील व आसपासचे तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. मोहोळ पैकी मौजे वाळूज (दे.) हद्दीतील जमीन, याचा गट नंबर ४६७ याचे एकूण क्षेत्र ०४ हे. २८ आर, पो.ख. ०० हे. ०५ आर, आकार १३ रुपये ६३ पैसे. येणेप्रमाणे शेतजमीन आतील झाडझुडूप, दगडमाती, ताली वगैरे तदंगभूत वस्तुसह. ही शेतजमी श्रीपाद प्रभाकर कुलकर्णी, रा. वाळूज (दे.), ता. मोहोळ यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यांची सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावर मालकी व कब्जे वहिवाट सदरी नोंद आहे. सदरची जमीन, श्रीपाद प्रभाकर कुलकर्णी यांनी त्यांच्या कायदेशीर व प्रापंचिक गरजेपोटी आमचे अशिलास खरेदी देणेचा ठराव केलेला असून इसारादाखल रक्कम स्वीकारुन इसारपावतीचा दस्तही केलेला आहे. वरील नमूद शेतजमीन निर्वेध, निजोखमी असल्याची हमी जमीन मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपरही वरील जमिनीशी इतर कोणाचा खरेदी, साठेखत, कर्ज, गहाण, दान, लिज, बोजा, इजमेंटरी राईट इत्यादी प्रकारचा व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत त्यांनी खालील नमूद पत्त्यावर संपर्क साधून त्याबाबत कागदपत्रानिशी शहानिशाकरुन द्यावी व पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाची तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहीत धरुन तसेच कोणाचेही काहीही हरकत अथवा तक्रार नाही असे समजून वरील मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर मागाहून कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. तारीख : २६/१२/२०२४

सही/-
**ॲड. जयश्री शिवाजी घोडके -भुसारे,**
**नोटरी** (भारत सरकार)
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. मो.नं. ९३०९८१४४१८
अशिल श्री. राजकुमार व श्री. महेशकुमार व वैभव मोहन आतकरे, रा. वाळूज (दे.), ता. मोहोळ, जि. सोलापूर तर्फे ॲडव्होकेट

## जाहीर समन्स

**दिवाणी अपील नं. ०२/२०१७ नि.नं. ३४**
पुढील नेमलेली तारीख २३/०१/२०२५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात (मा.श्री. एल. एस. चव्हाण साहेब यांचे कोर्टात)**

**सुभाष हरी महाजन,** वय ६२ वर्षे, धंदा- वैद्यकीय, रा. राशीन पेठ, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर } **अपेलंट**

**- विरुद्ध -**

**१) महादेव सिताराम साबळे, मयत,**
**२) मयत वारस**
१-A) **शंकर उर्फ पप्पू माधव साबळे,** वय ५० वर्षे, धंदा- शेती, रा. बंगळवाडी, ता. परांडा, जि. धाराशिव } **रिस्पाँडंट**

ज्याअर्थी, यातील अपेलंट याने सदरचे अपील हे मे. सि.ज.ज्यु.डि. करमाळा यांचे कोर्टातील रे.मु.नं. २३३/२०१० चे न्याय निर्णयाविरुद्ध केलेले आहे. सदरचे अपिलात अपेलंट यांनी रिस्पाँडंट यांचे विरुद्ध दाद मागितलेली आहे. यातील रिस्पाँडंट नं. १-A वरील पत्त्यावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. रिस्पाँडंट नं. १-A सदर पत्त्यावर आढळून येत नाही. रिस्पाँडंट नं. १-A कायमचा पत्ता वरील पत्त्याशिवाय अर्जदाराकडे नाही.

तरी रिस्पाँडंट नं. १-A यास जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसात अथवा पुढील नेमलेली तारीख दिनांक २३/०१/२०२५ रोजी नेमलेल्या तारखेस सदर अपिलात रिस्पाँडंट नं. १-A त्यांचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता अपिलात हजर करावा.

वरील प्रमाणे रिस्पाँडंट नं. १-A अपिलात हजर न झाल्यास अपेलंटच्या अपिलातील मागणीप्रमाणे रिस्पाँडंट नं. १-A विरोधात अपेलंटच्या हक्कात अपिलाचा हुकूमनामा होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. २१/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

सही/-
**अधीक्षक**
जिल्हा न्यायालय १, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रकटीकरण

**दि. कि. अर्ज नं. १०२/२०२४ नि.नं. ५**
पुढील नेमलेली तारीख ०३/०२/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात (श्रीमती जी. एस. पाटील सो.)**

**१) अजयकुमार भगवान लोहार,** वय ३२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. उपळे (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) विजयकुमार भगवान लोहार,** वय ४२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. उपळे (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
**३) रत्नमाला भगवान लोहार,** वय ५७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. उपळे (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
**४) मंदाकिनी भगवान लोहार,** (लग्नापूर्वी) **मंदाकिनी मनोज हरिहर** (लग्नानंतर) वय ३७ वर्षे, धंदा- नोकरी, रा. मळद, ता. बारामती, जि. पुणे
**५) चंदा भगवान लोहार,** (लग्नापूर्वी) **चंदा सुनिल लाड** (लग्नानंतर) वय ३५ वर्षे, धंदा- मजुरी, रा. उपळे (दु.), ता. बार्शी, जि. सोलापूर
} **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** } **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १,२,४,५ चे वडील व अर्जदार नं. ३ चे पती मयत भगवान कृष्णाजी लोहार हे दि. ०६/१०/१९९९ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार नं. १ ते ५ हे मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचे जवळचे व कायदेशीर वारस आहेत. त्यांचेशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. अर्जदार यांना मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचे पश्चात अर्जदार हे मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून जाहीर होवून मिळणेसाठी यातील अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार नं. १ ते ५ यांचेशिवाय मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचेशी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प प्रसिद्ध झालेपासून ३० दिसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. ०३/०२/२०२५ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : २३/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

# कोन्स्टास, बुमराहने गाजवला पहिला दिवस

## ऑस्ट्रेलिया ६ बाद ३११


अर्धशतक झळकावल्यावर अभिवादन करताना सॅम कोन्स्टास

**◆ मेलबर्न, २६ डिसेंबर**

भारत-ऑस्ट्रेलियादरम्यानचा बॉक्सिंग-डे कसोटी क्रिकेट सामन्याचा पहिला दिवस कसोटी पदार्पण करणाऱ्या १९ वर्षीय सॅम कोन्स्टाससह पहिल्या फळीतील ऑस्ट्रेलियन फलंदाज व भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने (३ बळी) गाजवला. कोन्स्टास (६०), उस्मान ख्वाजा (५७) व स्टीव्ह स्मिथ (नाबाद ६८) यांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर पहिल्या डावांत ८६ षटकांत ६ बाद ३११ धावा उभारल्या.

ऑसेट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत पहिल्या फळीतील ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी, विशेषतः सॅम कोन्स्टासने पदार्पणात जबरदस्त फलंदाजी केली. कोन्स्टासने उस्मान ख्वाजासोबत डावाची दमदार सुरुवात केली आणि ८९ धावांची सलामी भागीदारी केली. सॅम कोन्स्टासने ६५ चेंडूंत ६० धावा काढल्या, यात त्याने ६ चौकार व २ षट्कार खेचलेत. पुढे उस्मान व मार्नस लॅबुशेनने

दुसऱ्या गड्यासाठी ६५ धावांची भागीदारी केली. खेळपट्टीवर जमलेल्या या जोडीला बुमराहने फोडले. केएल राहुलने यष्टिमागे उस्मानचा झेल पकडला. उस्मान ख्वाजाने १२१ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ५७ धावांची अर्धशतकी खेळ केली आणि लॅबुशेनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ६५ धावांची भागीदारी केली. त्यावेळी ऑस्ट्रेलियाने ४४.१ षटकांत २ बाद १५४ धावांचा टप्पा गाठला होता.

पुढे लॅबुशेन व स्टीव्ह स्मिथने भारतीय गोलंदाजांना भंडावून सोडले व आपल्या संघाची धावसंख्या वाढवली. अखेर लॅबुशेनने वॉशिंग्टन सुंदरच्या चेंडूवर मिड-ऑनवर कोहलीकडे झेल सोपविला. लॅबुशेनने १४५ चेंडूंचा सामना करत ७ चौकारांच्या मदतीने ७२ धावांची खेळी केली व संघाला अडीचशे धावांच्या जवळपास आणले. लॅबुशेन बादझाल्यावर सामन्याची सूत्रे स्टीव्ह स्मिथने आपल्या हाती घेतले, परंतु त्याला साथ द्यावयास आलेले फलंदाज भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर टिकाव धरू शकले नाहीत. बुमराहने ट्रॅव्हिस हेड (०) व मिचेल मार्श (४) या दोघांनाही लवकरच तंबूत परत पाठवले. ॲलेक्स कॅरीने थोडी फार झुंज दिली, परंतु तोही आकाश दीपच्या भेदक माऱ्याला बळी पडला. ॲलेक्सने ४१ चेंडूंत ३१ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथ व कर्णधार पॅट कमिन्सने दिवस अखेर पर्यंत फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात ८६ षटकांत ६ बाद ३११ धावांपर्यंत मजल मारून दिली. खेळ थांबला तेव्हा स्टीव्ह स्मिथने १११ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारांच्या मदतीने नाबाद ६८ धावांची खेळी केली, तर पॅट कमिन्सने १७ चेंडंत नाबाद ८ धावा केल्या.

भारताकडून जसप्रीत बुमराहने पहिल्या दिवशी तीन बळी टिपण्यात यशस्वी झाला. आकाश दीप, रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदरने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले. ◀(वृत्तसंस्था)


उस्मान ख्वाजाला बाद केल्याचा आनंद साजरा करताना जसप्रीत बुमराह (३ बळी)

# गत दोन-तीन डावांत पुरेसा शिस्तबद्ध खेळलो नाही : कोहली

**◆ मेलबर्न, २६ डिसेंबर**

बॉर्डर-गावस्कर पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या तीन सामन्यात आपल्या गत दोन-तीन डावांमध्ये मी शिस्तबद्धपणे खेळलो नाही, अशी कबुली भारतीय सुपरस्टार विराट कोहलीने गुरुवारी दिली. मालिकेतील उर्वरित दोन सामन्यात फटकेबाजी करण्यापूर्वी खेळपट्टीवर बराच वेळ घेण्याची माझी योजना आहे, असेही तो म्हणाला.



३६ वर्षीय कोहलीने या मालिकेत ५, १०० नाबाद, ७, ११ आणि ३ धावा केल्या आहेत.

या मालिकेदरम्यान मी बहुतांश बाद हे ऑफ-स्टम्प बाहेरील चेंडू खेळताना झालो. २०१४ च्या इंग्लंड दौऱ्यातही मी असाच संघर्ष करत होतो, अशी आठवणही त्याने सांगितली. पर्थमधील शतकानंतर कोहलीची बॅट शांत झाली आहे.

गत दोन-तीन डावांत मला हवे तसे खेळता आले नाही. मला खेळपट्टीवर टिकून राहण्याइतपत शिस्तबबद्ध राहता आले नाही. कसोटी क्रिकेटमध्ये हेच आव्हान आहे, असे तो म्हणाला.

आम्ही येथे खेळलो होतो त्यापेक्षा या खेळपट्ट्या साहजिकच जास्त चैतन्यपूर्ण आहे व येथे एक वेगळा दृष्टिकोन आवश्यक आहे, असे तो म्हणाला.

बॉक्सिंग-डे कसोटीच्या पहिल्या दिवशी कोहलीने ऑस्ट्रेलियाचा पदार्पणवीर सॅम कोन्स्टास याची भेट घेतली. कोन्स्टासने ६५ चेंडूत ६० धावा केल्या.

आम्ही मेलबर्न क्रिकेट मैदानावर काही खरोखर चांगले क्रिकेट खेळलो आहे. गत वेळी आम्ही जिंकलो, आदल्या वर्षीही आम्ही जिंकलो. आता ही मालिकासुद्धा जिंकू, असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

सिडनी येथे अखेरचा कसोटी सामना खेळण्यापूर्वी आम्हाला येथे एक मजबूत कसोटी सामना खेळायचा आहे, असेही तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### खो-खो विश्वचषकाचा सदिच्छादूत टायगर श्रॉफ



**नवी दिल्ली** : खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाने (केकेएफआय) अभिनेता टायगर श्रॉफ याची आगामी १३ ते १९ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या खो-खो विश्वचषक २०२५ स्पर्धेसाठी सह-सदिच्छादूत म्हणून निवड केली आहे. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात मुख्य सदिच्छादूत सलमान खानसोबत टायगर श्रॉफचीही उपस्थिती असणार आहे. ही ऐतिहासिक जागतिक खो-खो स्पर्धा भारताच्या लाडक्या खेळाचे सार दर्शवेल, असे केकेएफआयने म्हटले आहे. तंदुरुस्तीचे कट्टर समर्थक, टायगर श्रॉफने यावेळी निरोगी जीवनशैली व खेळांच्या भूमिकेवर भर दिला. तंदुरुस्ती हे कोणाच्याही आयुष्यातील अंतिम ध्येय असले पाहिजे, आणि ते साध्य करण्यासाठी खेळ हे सर्वात मोठे साधन आहे. खो-खो हे तंदुरुस्ती, धोरण आणि चैतन्य यांचे परिपूर्ण मिश्रण आहे. मला आशा आहे की लोकांना ते स्वीकारण्यासाठी प्रेरित करावे लागेल, असे टायगर श्रॉफ म्हणाला. खो-खो विश्वचषकात २४ देशांतील २१ पुरुष आणि २० महिला संघ सहभागी होणार आहेत.

### पश्चिम बंगाल संतोष करंडकाच्या उपांत्य फेरीत

**हैदराबाद** : पश्चिम बंगालने गुरुवारी डेक्कन एरिना येथे झालेल्या सामन्यात ओडिशाचा ३-१ असा पराभव केला आणि प्रतिष्ठेच्या संतोष करंडक २०२४-२५ च्या ७८ व्या राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. राकेश ओरमने २५व्या मिनिटाला गोल करून ओडिशाची सुरुवात चांगली केली. मात्र मध्यंतरानंतर पश्चिम बंगालने जोरदार मुसंडी मारली आणि आपला विजय निश्चित केला. रॉबी हंसदाने एक आणि बदली खेळाडू मानोतोस माजीने दोन गोल नोंदवून आपल्या पश्चिम बंगाल संघाला ५२व्यांदा उपांत्य फेरीत प्रवेश मिळवून दिला. हंसदाचा हा या मोहिमेतील नववा गोल ठरला. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत पश्चिम बंगालने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. या मोसमात संतोष करंडकात बंगालचा संघ मुसंडी मारणारा दुसरा संघ ठरला. राकेश ओरमने २५ व्या मिनिटाला दिवसाचा पहिला गोल करून ओडिशाला आघाडी मिळवून दिली, परंतु त्यानंतर ओडिशाचा खेळ ढेपाळला.

### विजयवीर सिद्धूचे सुवर्णलक्ष्य

**नवी दिल्ली** : पंजाबचा नेमबाज विजयवीर सिद्धूने येथे सुरू असलेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत गुरुवारी पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल प्रकारातील सुवर्णपदक जिंकले. दोन ऑलिम्पिकपटूंच्या लढाईत विजयवीरने बाजी मारली. डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज येथे अंतिम फेरीत पॅरिस ऑलिम्पिकपटू विजयवीरने रिओ ऑलिम्पिकपटू गुरप्रीत सिंगचा २८-२५ असा पराभव केला. हवाई दलाचा शिवम शुक्ला याने या स्पर्धेत २३ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. विजयवीरने पात्रता फेरीत ५८१ गुणांची नोंद केली. त्याने सहा जणांच्या मालिकेत उत्तर प्रदेशच्या अंकुर गोयलने ५८५ गुण, तर गुरप्रीतने केवळ ५७५ गुणांसह सहावे स्थान मिळवले. तथापि, अंतिम फेरीत विजयवीर दुसऱ्या मालिकेपासून अचूक लक्ष्य भेदले व सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

### राष्ट्रीय अश्वारोहण स्पर्धेत इनारा, फ्रेया, हुसैनला सुवर्ण

**नवी दिल्ली** : ॲमेच्युअर रायडर्स क्लब, मुंबईच्या इनारा मेहता लुथरिया, फ्रेया ठक्कर व हेडन हुसैनने येथे झालेल्या विविध सांघिक प्रकारात राष्ट्रीय अश्वारोहण स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. इनाराची कामगिरी उत्कृष्ट ठरली. तिने निर्दोष फेरी मारून पंच व प्रेक्षकांची प्रशंसा मिळवली. ही उल्लेखनीय कामगिरी इनाराची अपवादात्मक प्रतिभा आणि समर्पण अधोरेखित करते. ड्रेसेज टीम, सब ज्युनियर श्रेणीमध्ये स्पर्धा करताना इनाराने उत्कृष्ट कामगिरी केली. तिने ७८.६३ टक्के गुण मिळवले, त्यानंतर तिची सहकारी अनन्याने ७३.३५ टक्के, सुभने फर्स्टेंटांझने ७४.२० टक्के गुण मिळवले. त्यांच्या संघाने सरासरी २२६.१८ टक्के गुण मिळवत सुवर्ण जिंकले. द्वितीय क्रमांकावर असलेल्या संघाचा सरासरी गुणसंख्या २१०.२४ टक्के आणि तिसऱ्या क्रमांकावरील संघाची गुणसंख्या २०६.२६ टक्के होती.

### कामरान गुलामचे अर्धशतक डॅन पॅटरसनचे ५ बळी

**सेंच्युरिअन** : येथे गुरुवारपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रारंभ झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात कामरान गुलामच्या अर्धशतकाच्या बळावर पाकिस्तानने पहिल्या डावात ५७.३ षटकांत सर्वबाद २११ धावांपर्यंत मजल मारली. दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेने २२ षटकांत ३ बाद ८२ धावा काढल्या. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून पाकिस्तानला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले आणि पहिल्याच दिवशी २११ धावांत गुंडाळले. कामराननने तेवढी ७१ चेंडूंत ८ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ५४ धावांची खेळी केली.

# पोलिसांच्या राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत आश्विनी गाजरे यांना सलग दुसऱ्यांदा कांस्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

दिल्ली येथे झालेल्या आखिल भारतीय पोलीस आर्चरी चॅम्पीयनशिप स्पर्धेत सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील महिला पोलीस नाईक आश्विनी दिलीप गाजरे यांनी कंम्पाउंड सांघिक प्रकारात कांस्य पदक संपादिले.

पोलिसांच्या राष्ट्रीय स्पर्धेत महिलांमध्ये सोलापूरला ग्रामीण पोलीस दलाचे हे दुसरे पदक आहे. भारोत्तोलन मध्ये त्यांना पहिले पदक कास्य पदक मिळाले होते.

त्या ग्रामीण पोलिस मुख्यालयात नेमणुकीला आहेत. मूळच्या अरण (ता माढा) येथील आहेत. इयत्ता पाचवीपासून आर्चरीचे सराव सुरु आहे. सात शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवून त्यांनी एक सुवर्ण व सहा रौप्य पदक पटकाविली आहेत. बुलढाणाचे प्रशिक्षक चंद्रकांत इलग यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे जिल्हा पोलीस आधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.



# समाज कल्याण दिव्यांग स्पर्धेत भैरुरतन दमाणी अंधशाळेची २२ पदकांची कमाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ संचलित भैरुरतन दमाणी अंधशाळेने ॲथलेटिक्स १०, बुद्धिबळ, पासिंग द बॉल १, गोळा फेक ३, पोहणे, लांब उडी २ अशा विविध मैदानी क्रीडा प्रकारात शाळेच्या विद्यार्थ्यांनी २२ बक्षिसे मिळवली. यात १० सुवर्ण, ७ रौप्य व ५ कांस्य अशी २२ पदकांची कमाई केली.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा समाज कल्याण विभागातर्फे झालेल्या या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत या स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. त्याचबरोबर शाळेला क्रीडा स्पर्धेचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या विजयी चमूचे शाळेच्या अध्यक्षा जानवी माखीजा, सचिव संतोष भंडारी व मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक रंजन पंचवाडकर, राजकुमार पाटील, केतकी रानडे (धामणकर), गीतांजली यादव, व्यंकट कदम, संतोष गवांडकर, भास्कर शिखरे, अर्चना करकमकर व स्वाती कामाने यांचे मार्गदर्शन लाभले.

# सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने रविवारी स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने रविवारी (ता. २९) जिल्हा जलतरण स्पर्धा आयोजित केले आहेत. अशोक चौकातील श्री मार्कंडेय जलतरण तलावात सकाळी ८ ३० वाजता या स्पर्धांना सुरुवात होईल. पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त दिपाली काळे आणि महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राहतील. सकाळी ९ वा. प्रत्यक्ष स्पर्धांना सुरुवात होईल. ५०मी आणि १००मी फ्री स्टाईल या प्रकारात वयोगट ६ ते १६ मुले व मुली त्याचबरोबर खुला गट पुरुष व महिला असे स्पर्धा होतील. स्पर्धा संपल्यानंतर लगेच मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळा आयोजित केलेला आहे. सदर स्पर्धा सर्व हौशी जलतरण विद्यार्थ्यांकरिता असून ही स्पर्धा विनामूल्य असेल. अधिक माहिती किंवा नाव नोंदणी करिता संयोजक निरज कटकुर ( मो. ९५९५८७०९३८) यांच्याशी संपर्क करावा.


सोलापूर : सनराईज प्री-प्रायमरी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष इलियास शेख, मुख्याध्यापिका झहुरिया शेख यांच्या उपस्थितीत झाले. क्रीडा शिक्षक अब्दुल्ला चौधरी, अम्रीन शेख व नदीम सनदी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धा सप्ताहात होणार आहेत.



# शर्वरी गुरव व वैष्णवी चव्हाण आदर्श खेळाडू पुरस्काराने सन्मानित

## जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स माशाळनगर कराटे क्लासचा वर्धापनदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर संचलित शाखा माशाळनगर कराटे क्लासचा चौथा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, उद्योगपती यशवंत इंगळे, सोलापूर महापालिका माजी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, ग्रॅन्डमास्टर युवराज गायकवाड, वसुंधरा कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मारुती घटेवाड, प्रा. डॉ. धनंजय मौगले, प्राध्यापक बापू राऊत, राजलक्ष्मी कन्स्ट्रक्शनचे शिवशंकर पाटणकर, टेक्निकल डायरेक्टर किशोर चंदनशिवे, भास्कर देडे, सम्राट गायकवाड, नागेश कांबळे, संदिप गायकवाड आदींच्या उपस्थिती हा सोहळा झाला.

यावेळी सोलापूर जिल्हा क्रीडा आदर्श विद्यार्थी पुरस्कार शर्वरी विकास गुरव व वैष्णवी चंद्रकांत चव्हाण यांना मान्यवराच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच जीत कुने डो मार्शल आर्टचे जिल्हा, राज्य स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख तथा माशाळे नगर कराटे क्लासचे प्रमुख अभिजीत गायकवाड, सुनील बरगोदीया, निलकंठ स्वामी, लेडीज कोच सत्यभामा गायकवाड, वैभवी दळवी, किमया सपाटे, शिशुपाल चंदनशिवे, विश्वजीत गायकवाड आदी उपस्थित होते

# श्रीराम ट्रान्सपोर्ट संघास विजेतेपद

## सूर्या कॉर्पोरेट चषक क्रिकेट स्पर्धा : लाभक्षेत्र विकास महामंडळ संघ उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २६ डिसेंबर-**

नेहरुनगर येथील शासकीय मैदानावर सुर्या ग्रुपने आयोजित केलेल्या आणि सन्मित्र डेव्हलपर्स प्रायोजक असलेल्या सूर्या कॉर्पोरेट चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद श्रीराम ट्रान्सपोर्ट संघाने पटकावले.

बुधवारी झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी लाभक्षेत्र विकास महामंडळ संघाचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना लाभक्षेत्र संघाने निर्धारित आठ षटकांत ३ बाद ७६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल श्रीराम ट्रान्सपोर्ट संघाने ६.४ षटकात ३ बाद ७७ धावा करून सामना जिंकला. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात पहिला उपांत्यल सामना लाभक्षेत्र विकास महामंडळ विरुद्ध एचडीबी फायनान्स यांच्यात झाला. लाभक्षेत्रने आठ षटकात २ बाद १०० धावा केल्या. एचडीबी संघाला आठ षटकात केवळ ५५ धावांपर्यंतच मजल मारता आली. लाभक्षेत्रने हा सामना ४५ धावांनी जिंकला. दुसरा उपान्त्य सामना श्रीराम ट्रान्सपोर्ट विरुद्ध महावितरण यांच्यात झाला. श्रीराम ट्रान्सपोर्ट संघाने आठ षटकात ३ बाद ११३ धावा काढल्या तर म




हावितरण संघाने आठ षटकात ७ बाद ६३ धावा काढल्या. यात श्रीराम ट्रान्सपोर्टने ५० धावांनी विजय मिळवला.स्पर्धेचे बक्षीस वितरण पत्रकार प्रशांत जोशी, सन्मित्र डेव्हलपरचे अनिकेत कलशेट्टी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रसिद्ध मधुमेह तज्ञ डॉ. भास्कर पाटील, सेवानिवृत्त तालुका क्रिडाधिकारी सत्येन जाधव, मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, सुर्या ग्रुपचे संस्थापक राजकुमार सुरवसे, श्रीकांत जाधव, प्रोजेक्ट मॅनेजर मनी भूषण, रवींद्र नाशिककर, सतीश सुरवसे यावेळी उपस्थित होते. या स्पर्धे साठी संजय सुरवसे, आप्पा रामदासी, दत्ता शिंदे, मनीष काळे, काशिनाथ औरसंग, विजय कोणापुरे, नितीन यांनी परिश्रम घेतले. पंच म्हणून लक्ष्मण कावळे, स्वप्निल इंगळे, गुणलेखक म्हणून प्रसाद सावंतलू तर समालोचक म्हणून जयराज मडिवाळ यांनी काम केले

### शेख मालिकावीर; सोनवणे सामनावीर

वैयक्तिक पारितोषिके विजेते : मालिकावीर : आरीफ शेख. सामनावीर : राहुल सोनवणे, फलंदाज : राहुल सोनवणे, गोलंदाज : आरीफ शेख. यांना चषक देऊन सन्मानित केले.



# नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २६ डिसेंबर-**

येथील नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या वार्षिक क्रीडा सप्ताहास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

याचे उद्घाटन क्रीडा भारती सोलापूरचे सचिव राजेश कळमणकर यांच्या हस्ते क्रीडाज्योत पेटवून सोहळ्याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षाताई विभुते, स्कुल व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्रि. प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा उपस्थित होते.

या कार्यक्रमास अतिथी म्हणून स्कुलचे माजी विद्यार्थी ओम अवस्थी आंतरराष्ट्रीय डायव्हिंग सुवर्णपदक विजेता, आंतरराष्ट्रीय कराटे रौप्य पदक विजेती आर्या यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. लाभली. स्कुलच्या प्राचार्या रुपाली हजारे यांनी वार्षिक क्रीडा अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन स्कुलचे विद्यार्थी अनुश्री कराळे, श्रीशा तिकटे, आयुष लोया, पार्थ सोनी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव, रेवती शिंदे आदी परिश्रम घेत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सांगोला महाविद्यालयात अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. २६ डिसेंबर-**

सांगोला महाविद्यालयात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. अटल बिहारी वाजपेयी हे भारताचे १० वे पंतप्रधान आणि एक हिंदी कवी होते. यासोबतच त्यांनी जनसंघाचे संस्थापक सदस्य, भारतीय जनसंघाचे अध्यक्ष, जनता पक्षाचे संस्थापक सदस्य व ११ व्या लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते म्हणूनही जबाबदारी पार पाडली. पंतप्रधानपदी असताना देशाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे कार्यही त्यांनी केले. त्यांच्या अणुचाचणी पोखरण दोनमधील योगदान, कारगील युद्धादरम्यानची मुत्सद्देगिरी, चीन व पाकिस्तान सोबत शांतता चर्चेसाठी केलेला पुढाकार, सुवर्ण चतुर्भुज योजनामधील त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा असे मत प्रा. डॉ. अमोल पवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. ए. एम. पवार, भाऊसो गायकवाड, अमर केदार यांनी केले.



### नागपुरात आ. अभिजीत पाटील यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन

**श्रीपूर, दि. २६ डिसेंबर-**

महा डिजिटल मीडिया असोसिएशन २०२५ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन नागपूर येथे आ. अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थापक सचिव ॲड. अद्वैत चव्हाण, राष्ट्रीय अध्यक्ष दत्तात्रय नाईकनवरे, प्रदेशाध्यक्ष विनायकराव शिंदे, खजिनदार महादेव हरणे, सहसचिव प्रा. बाळासाहेब माघाडे, पी. ए. शुभम बोबडे उपस्थित होते. डिजिटल मीडियातील पत्रकारांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. येणाऱ्या अधिवेशन कालावधीमध्ये डिजिटल मीडियातील पत्रकारांच्या प्रश्नांचा आवाज उठवणार असेदेखील त्यांनी आश्वासन दिले. तसेच महा डिजिटल मीडिया असोसिएशनचे सर्व पदाधिकारी मुंबई मंत्रालयामध्ये संबंधित विभागाच्या मंत्र्यांना भेटून डिजिटल मीडियातील पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुंबई येथे जाणार आहेत, अशी माहिती संस्थापक ॲड. अद्वैत चव्हाण यांनी दिली.



### प्रा. गणेश करे-पाटील यांचा गौरव

**करमाळा, दि. २६ डिसेंबर-**

भारताच्या अवकाश संशोधन संस्थेतील (इस्रो) वरिष्ठ शास्त्रज्ञ अरुणकुमार सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली बारामती येथील कविवर्य मोरोपंत नाट्य मंदिरात दिशा अकॅडमी वाईच्या वतीने प्रज्ञावंत सन्मान सोहळ्यात यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. गणेश करे-पाटील यांचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. दिलीप देशमुख, प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. विजय पवार, प्रा. डॉ. प्रशांत कुलकर्णी, दिशा अकॅडमीचे अध्यक्ष नितीन कदम, व्यवस्थापकीय संचालिका प्रा. रूपाली कदम, संचालक प्रशांत सातव, प्रा. सतीश मौर्य, जीवन शिक्षण फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. जयेश पवार, सोलापूर इंग्लिश टीचर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. बाळकृष्ण लावंड, प्रा. विष्णू शिंदे, यशकल्याणी नेचर काँझरवेशन सोसायटीचे अध्यक्ष कल्याणराव साळुंके, प्रा. नितीनकुमार आनंद, प्रा. राजेंद्र दुशिंग, झरीना खान उपस्थित होते.



### सांगोल्यात श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी उत्सव भक्तिभावात

**सांगोला, दि. २६ डिसेंबर-**

श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकरांचा १११ वा पुण्यतिथी उत्सव श्रीराम मंदिर व ध्यानमंदिर, सांगोला येथे साजरा केला. यामध्ये पंढरपूर येथील हभप डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे राम म्हणता रामची होईजे या विषयावर प्रवचनमाला संपन्न झाली. तसेच सज्जनगड येथील हभप राघवेंद्रबुवा देशपांडे यांचे नारदीय कीर्तन तर हभप गुरुनाथ महाराज कोटणीस, सांगली यांचे प्रवचन त्याचबरोबर दयानंद बनकर व त्यांच्या सहकाऱ्यांचा भजन संध्या हा भावगीत, भक्तीगीत, अभंग, गौळणीचा बहारदार कार्यक्रमही झाला. शुभांगी कवठेकर यांच्या पुण्यतिथीचे कीर्तन व श्रीमहाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. कवठेकर यांना तबल्याची साथ श्रीया कुलकर्णी यांनी तर हार्मोनियम साथ शशिकांत लाटणे यांनी केली. सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले. यानंतर महाराजांची पालखी व नगरप्रदक्षिणा, शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. दुपारी ध्यानमंदिरात आरती व महाप्रसाद होऊन उत्सवाची सांगता झाली.

# लातूर जिल्ह्यातील सहलीच्या बसला अपघात

**● मंगळवेढ्याजवळील घटना; अपघातानंतर खबर न देताच चालक झाला फरार, चालकाविरूध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२६ डिसेंबर-**

लातूरहून कोल्हापूरकडे सहलीसाठी शालेय मुलाच्या निघालेल्या खाजगीबसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने सांगोला मार्गावरील काळया खडकाजवळ रस्त्याच्या बाजूला पलटी होवून बसमधील ३९ विदयार्थ्यांसह शिक्षक, चालकांना जखमी करून अपघाताची पोलिसात खबर न देताच पळून गेल्याप्रकरणी चालक गोविंद ज्ञानदेव मोरे (रा. चालबर्गा, ता. औसा) याच्याविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.



श्री गणेश विद्यालय शिवणखेड बु. (ता. चाकूर, जि. लातूर) या प्रशालेची सहल खाजगी बस (क्र. एम. एच. २४/ ए. बी. ७२८१) ही कोल्हापूरकडे जात असताना मंगळवेढ्याच्या पुढे ३ कि. मी. अंतरावरील काळ्या खडकाजवळ आल्यानंतर चालक तथा आरोपी गोविंद मोरे याने रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून बसवरील नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला नेऊन पलटी करून बसमधील विद्यार्थी व शिक्षकांना जखमी करण्यास व स्वतः जखमी होण्यास कारणीभूत ठरला. बसचे नुकसान करून अपघाताची खबर न देता पळून गेल्याचे पोलिस अंमलदार सूरज साळुंखे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. ही घटना गुरुवारी पहाटे ४.१५ वा. घडली. अपघातग्रस्त विद्यार्थ्यांना १०८ क्रमांकावर कॉल करून शासकिय ॲब्युलन्स बोलावून तात्काळ मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. सुलोचना जानकर, डॉ. प्रविण माने, डॉ. निखील जोशी, डॉ. शिरीष कुलकर्णी, प्रमोद पाटील, वैशाली शिंदे, सानिका गायकवाड, शितल कपाटे, सिद्राम चनशेट्टी, माधुरी गायकवाड, सुनिता जाधव आदी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी जीवाचे रान करीत सर्व जखमी विद्यार्थ्यांवर उपचार केले.

### उपचारानंतर सहल लातूरकडे रवाना

काही अपघातग्रस्तांचे हाड फ्रॅक्चर झाल्याचेही सांगण्यात आले. गुरुवारी सकाळी ८ वा. प्राथमिक उपचार केल्यानंतर मंगळवेढ्यातील एका खासगी बसने त्यांना लातूरकडे पाठविण्यात आले. अपघाताचे वृत्त समजताच मंगळवेढा पोलिस, शासकिय वाहनाने घटनास्थळी तात्काळ दाखल झाले.

# मोहोळ तहसीलदार कार्यालयावर निषेध मोर्चा

**तहसीलदार, पोलिस निरीक्षकांना दिले निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ डिसेंबर-**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांनी केलेल्या अवमानकारक विधानाबद्दल त्यांनी राजीनामा द्यावा, परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत द्यावी, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला शासकीय सेवेत घ्यावे, संतोष देशमुख यांच्या खुनाची एसआयटीमार्फत चौकशी करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी या मागण्यासाठी संविधान सन्मान समिती मोहोळ तालुका व सकल मराठा समाजातर्फे तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला.



मोर्चाला चैत्यभूमी पासून आरंभ करण्यात आला. मुख्य रस्त्याने घोषणा देत मोर्चा शिवाजी चौकात आला, तेथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून परत हा मोर्चा तहसील कचेरी आवारात आला. त्यावेळी बोलताना ॲड. विनोद कांबळे म्हणाले, पोलीस प्रशासन एका गरोदर महिलेला मारण्या इतपत खालच्या पातळीवर गेले नाही. मात्र पोलिसांच्या वेशात आलेल्यांनी हे सुनियोजित कृत्य केले आहे. परभणी येथे पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन राबवल्यामुळे अनर्थ घडला आहे.

ॲड. श्रीरंग लाळे म्हणाले की, स्व. संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या अंगावरील प्रत्येक काठी ही संविधानावरील केलेला हल्ला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या ब्रीदवाक्यप्रमाणे एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.

यावेळी मंगेश पांढरे, संगीता पवार, जिब्राईल शेख, पांडुरंग माने, बिलाल शेख, रमेश बारसकर यांनी मनोगत व्यक्त केली. मोर्चात डॉ. प्रमोद पाटील, मोहोळ तालुका काँग्रेसच्या कार्याध्यक्षा रतन कसबे पांडुरंग खांडेकर, पप्पू पाटील, मनोज नागणे, नाना हावळे, रियाज शेख, बाबूराव ढाणके, राजू नागटिळक, युसुफ बागवान, युवराज रणदिवे, विकी कांबळे, विकास बनसोडे, सोमनाथ पवार, जितेंद्र अष्टुळ, संतोष कसबे, प्रवीण कापुरे, सतीश कसबे, सोमेश बनसोडे, बाळू सोनवणे, दादा कापुरे, यांनी सहभाग नोंदविला. निवेदन तहसीलदार सचिन मुळीक आणि नूतन पोलीस निरीक्षक हेमंत सोडगे यांनी स्वीकारले.

# घेरडीतील समाजकार्य दिशा देणारे : प्रा. प्रबुद्धचंद्र झपके

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२६ डिसेंबर-**



घेरडी येथील ग्रामस्थांनी सांगोला लायन्स क्लब व विजयसिंह पटवर्धन लायन्स आय हॉस्पिटल सांगली यांचे संयुक्त विद्यमाने गावात सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह या धार्मिक कार्यातही मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करून समाजकार्याचा एक आदर्श निर्माण केला व तो इतरांना दिशा देणारा आहे असे प्रतिपादन लायन्सचे माजी प्रांतपाल प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी केले.

ते घेरडी येथे बोलत होते. सदर शिबिराचे उद्घाटन अखंड हरिनाम सप्ताह व्यासपीठ चालक ह.भ.प.रमेश शिवापूरकर महाराज व माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते झाले. यावेळी घेरडीचे सरपंच सुरेश देवकते, सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड, डॉ. रियाज मुल्ला, सांगोला लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेष आटपाडीकर, कॅबिनेट ऑफिसर प्रा. धनाजी चव्हाण, सचिव अजिंक्य झपके, सदस्य प्रा. शिवशंकर तटाळे, प्रा. प्रसाद खडतरे, प्रशांत रायचुरे, उमेश नष्टे, संपत्ती कोळेकर, बयाजी लवटे, आबा मोटे, अमीर आतार, सोमनाथ गोडसे, विठ्ठल जगधने, प्रा. गणेश घेरडीकर उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये १२५ रुग्णांची डोळे तपासणी झाली व यामधील १२ पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात ८ रुग्णांवर सांगली येथील लायन्स आय हॉस्पिटलमध्ये अल्पदरात व काही मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार आहेत.



# कासेगावात यल्लमा देवी यात्रेनिमित्त जय्यत तयारी

**▸ आ. समाधान आवताडे यांनी यात्रेच्या तयारीचा घेतला आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ डिसेंबर-**

तालुक्यातील कासेगाव येथील श्री यल्लामा देवीच्या यात्रेसाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब व आंध्र प्रदेश या राज्यातून लाखो भाविक भक्त येत असतात. या यात्रेसाठी प्रशासनाकडून विशेष तयारी सुरू असून काल पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे सदस्य आमदार समाधान आवताडे यांनी यात्रेतील तयारीचा आढावा घेत अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून आमदार समाधान आवताडे यांनी गुरुवारी श्री यल्लमा देवीच्या मंदिर परिसर व विविध ठिकाणी भेट देऊन त्या त्या ठिकाणाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यात्रा काळात कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये तसेच भाविकांची लूटमार होणार नाही याकडे लक्ष द्यावे अशा सूचना त्यांनी पोलीस प्रशासनास केल्या. तसेच महावितरण अधिकारी यांनीही यात्रा काळात वीज पुरवठा खंडित होऊ नये याची काळजी घेण्याचा सूचना त्यांनी केल्या. सोबतच आरोग्य विभागातील अधिकारी यांची ही बैठक घेत त्यांनी यात्रा काळात कोणत्या भाविकास काही त्रास झाल्यास अतिदक्षतेसाठी वैद्यकीय टीम तसेच रुग्णवाहिका राखीव ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिला. ज्यादा बसेस सोडण्यात याव्या, पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये, स्वच्छतेसाठी दक्षता घ्यावी, अशा सूचना दिल्या. यावेळी तहसीलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मेटकरी यांच्यासह अधिकारी, सरपंच शोभा भोसले, उपसरपंच संग्रामसिंह देशमुख, माजी उपसभापती प्रशांत देशमुख, विजयसिंह देशमुख, अनिकेत देशमुख, हनुमंत ताटे, भीमा भुसे, नौशाद शेख, भास्कर घायाळ, प्रकाश रुपनर, केतन देशमुख, सज्जन जाधव, चंदू जाधव, ग्रामविकास अधिकारी आर. पी. कोळी, मंडलाधिकारी पंकज राठोड व तलाठी भाऊसाहेब अनिल बागल उपस्थित होते.




# भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आयटक कामगार केंद्रातर्फे बार्शी शहरात निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संसदेमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अवमान केल्या विरोधात तसेच परभणी येथील संविधान शिल्पाची मोडतोड व सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याच्या विरोधात तीव्र निदर्शने आंदोलन भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आयटक कामगार केंद्र व दलित अधिकारांदोलन यांच्या संयुक्त व त्यांनी दि. २५ डिसेंबर रोजी जुना गांधी पुतळा चौकात निदर्शन केले.

यावेळी रस्त्यावर कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा हातात घेत निषेधाच्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. यावेळी कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे म्हणाले, मनुस्मृतीवर प्रेम करणारी भाजप सत्तेवर बसल्यापासून त्यांच्या मनातील खदखद अमित शहांनी ओकली आहे. दलित श्रमिक वर्गाच्या विरोधात काम करण्याची त्यांची धोरण व वृत्ती आहे. दलित कष्टकऱ्यांच्या विरोधात कायदे करुन संविधानावर मोडतोड सुरु आहे, दलित-श्रमिक वर्ग संविधानावरील व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील हल्ला कधीही खपवून घेणार नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी त्यांनी मागणी केली.


यावेळी कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे, कॉ. प्रविण मस्तुद, लहू आगलावे, भारत भोसले, आनंद गुरव, भारती मस्तुद, सुनील जावळी, बब्रुवान अय्यर, धनाजी पवार, अनिरुद्ध नखाते, लक्ष्मण घाडगे, बालाजी शितोळे, विनोद गायकवाड, भारत चव्हाण, प्रमोद मंडलिक आदी उपस्थित होते.

# चंद्रभागा वाळवंटात घाणीचे साम्राज्य

**● प्रशासनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ डिसेंबर-**

येथील चंद्रभागा वाळवंटात घाणीचे साम्राज्य पसरू नये म्हणून उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे चंद्रभागा कमालीची अस्वच्छ झाली असून भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणा बद्दल चक्क प्रशासनावरच गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी शहरातील विविध सामाजिक संघटना आणि वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी कडून होत आहे.



पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज पन्नास हजाराहून अधिक भाविक येथे येत असतात. येथे आलेले भाविक चंद्रभागा नदीमध्ये जाऊन पवित्र स्नान करतात मात्र चंद्रभागा वाळवंटात व नदीपात्रात घाणीचे साम्राज्य असल्यामुळे नदीतील पाणी सध्या दूषित झाले आहे. भाविक चंद्रभागेचे पाणी पवित्र तीर्थ म्हणून प्राशन करतात. यामुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. दरम्यान या पूर्वीच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून चंद्रभागा वाळवंटाकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी केली होती. याची दखल घेऊन उच्च न्यायालयाने देखील प्रशासनाला चंद्रभागा वाळवंटात घाणीचे साम्राज्य पसरू नये याकडे लक्ष देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र प्रशासनाचे चंद्रभागा वाळवंटाकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्यामुळे दिवसेंदिवस वाळवंटात घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे. यामुळे भाविकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. महर्षी वाल्मिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी प्रशासनाकडे अनेक वेळा चंद्रभागा वाळवंटाची स्वच्छता करण्यात यावी अशी मागणी केली आहे. मात्र याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. मंदिर समितीने वाळवंटाची स्वच्छता करण्यासाठी दहा लाख रुपयाचा ठेका दिला आहे तरीही ठेकेदार स्वच्छता करत नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान प्रशासनाने वेळीच या प्रकरणी लक्ष घालून चंद्रभागा वाळवंट तसेच निधीची कायम स्वरूपी स्वच्छता कशी राहील याकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी देखील महर्षी वाल्मीक संघाचे अध्यक्ष गणेश अंकुशराव अंकुशराव यांनी केले आहे.

> नववर्षाच्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीची स्वच्छता करून तिचे पवित्र अबाधित राहावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जावे नाहीतर येत्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चंद्रभागा नदीतील घाण कुरिअरद्वारा पाठविण्यात येणार आहे.
>
> **- गणेश अंकुशराव,**
> अध्यक्ष, महर्षी वाल्मिकी संघटना



## अय्यप्पा स्वामी मंदिरात आज महापडीपूजा व महाप्रसादाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

श्री. धर्मशास्ता, अय्यप्पा चॅरीटेबल ट्रस्ट, सोलापूर यांच्यावतीने श्री. अय्यप्पा स्वामी मंदिर सविता नगर, मुळेगाव रोड येथे दि. शुक्रवार, दि. २७ डिसेंबर रोजी पहाटे ६ वा. श्री.महागणपती होम, सकाळी ८.३० वा श्री. अयप्पा स्वामी मूळमूर्ती अभिषेक व म हाआरती तीर्थप्रसाद इ. कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

तसेच सायं. ५ वा. उत्सवमुर्ती पंचामृताअभिषेक, अलंकार, सांय. ६.३० वा. पालखी सेवा, झुला उत्सव, सांय. ७.३० वा. महापडी पूजा, संध्या. ८ वा पुष्पाअभिषेक व नक्षत्र आरतीनंतर पाच हजार भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित केलेला आहे.या कार्यक्रम ासाठी सर्व भक्तगण मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे ट्रस्टच्या वतीने आवाहन करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी देणगीदारांनी सढळ हाताने वस्तुस्वरुप व रोख रक्कमेच्या स्वरुपात श्री. धर्मशास्ता, अय्यप्पा चॅरीटेबल ट्रस्ट यांच्याकडेच जमा करुन पावती घ्यावी, असे श्री. धर्मशास्ता अय्यप्पा चॅरीटेबल ट्रस्टने कळविले आहेय0 अधिक माहितीसाठी राजू गोरट्याल (मो.नं.९०९६८०२९८१), मुरलीधर उपलंची (९९६००९७८७३), आनंद गुर्रम-पुरोहित (९७६७७१९०६१) यांच्याशी संपर्क साधावा.

# बार्शीत सलग चौथ्या दिवशीही वाघाचे दर्शन

**● ढेंबरेवाडी तलावात पाणी पिण्यासाठी आला असताना कॅमेऱ्यात कैद**

**काल चारे तर आज नारीत दर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ डिसेंबर-**

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातून मार्गक्रमण करत बार्शी तालुक्यात ठाण मांडून बसलेल्या वाघाचे सलग दुसऱ्या दिवशीही ढेंबरेवाडी तलावाजवळ दर्शन झाले आहे. या पार्श्वभूमीवर वनविभाग पूर्णपणे सतर्क मोडवर आलेला आहे. भागात दिवसाची आणि रात्रीची गस्त वाढवण्यात आली आहे. सोबतच वाघाच्या वाटचालीवर ही लक्ष ठेवले जात आहे, अशी माहिती बार्शीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अलका करे यांनी दिली. याच पार्श्वभूमीवर आमदार दिलीप सोपल यांनी देखील राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्याशी संपर्क साधत तालुक्यातील वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून बार्शी तालुक्यात बिबट्या अन् वाघ हा चर्चेचा विषय बनला आहे. आपल्या भागात कधीही आढळून न येणारा वाघ इकडे दिसून आल्याने सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे. मात्र वाघाची चर्चा असली तरीही ग्रामीण भागात नागरिकांमध्ये मात्र भीतीचे वातावरण तयार झाले आहे. तालुक्यातील पांगरी भागातील पांढरी, घोळवेवाडी, ढेंबरेवाडी, चिंचोली या परिसरात वनक्षेत्र जे मोठ्या प्रमाणात आहे. लागूनच येडशीच अभयारण्य देखील आहे. त्यामुळे वाघाने या भागातच आपला मुक्काम स्थिर केला आहे. मंगळवारी दुपारी तसेच बुधवारी तलावात पाणी पिण्यासाठी हा वाघ आला असल्याचे वनखात्याच्या ट्रॅक कॅमेऱ्यात दिसून आले आहे. तसेच रात्री तो तारे गावाच्या स्मशानभूमीजवळ दिसला. आज तो नारी येथे ज्वारीच्या पिकात दिसल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.







**वाघाला डिवचण्याचा प्रयत्न करु नका : वन अधिकारी करे**

वाघ पुढे गेल्यानंतर वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी निरीक्षण नोंदवत आहेत. वाघ पुढे कुठल्या मार्गाने गेला, त्याचे ठसे आढळून येतात का, तसेच कुठे त्याची विष्ठा दिसून येते का हे देखील तपासले जात आहे. नागरिकांनी दक्षता बाळगावी असे आवाहन वन अधिकारी अलका करे यांनी केले आहे. वाघ आढळून आल्यास त्याला अजिबात डिवचण्याचा प्रयत्न करु नये, असेही करे म्हणाल्या.

**बिबट्या, वाघाचा बंदोबस्त करा : आ. सोपल**

बार्शी तालुक्यातील मागील २२ ते २५ दिवसांपासून बिबट्या व वाघ यांचा वावर सुरु असून आतापर्यंत अनेक जनावरांना ठार व जखमी केलेले आहे. बार्शी तालुक्याच्या उत्तर भागात असलेल्या बालाघाट डोंगर रांगा व वनक्षेत्र यामध्ये वाघ दिसून आलेला आहे. वन विभागाच्या कॅमेऱ्यात तो कैद झालेला आहे. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून तात्काळ बिबट्याचा व वाघाचा बंदोबस्त करावा. तसा आदेश अधिकाऱ्यांना द्यावा, अशा मागणीचे पत्र आ. दिलीप सोपल यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे दिले आहे. फोन करुनही त्यांच्याशी चर्चा केली आहे.

# महापालिकेच्यावतीने शहरात प्लास्टिक विरोधी कारवाई

**▸ १७ दुकानांची तपासणी; ६ किलो प्लास्टिक जप्त**

**▸ ६ दुकानांकडून केला एकूण ३० हजाराचा दंड**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दिनांक २६ डिसेंबर-**

महापालिकेने प्लास्टिक विरोधी कारवाई अंतर्गत विविध ठिकाणी आस्थापना, दुकानांची तपासणीत सहा दुकानदारांकडून ३० हजार रुपयाचा दंड वसूल केला. ६ किलो प्लास्टिक जप्त केले.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम घनकचरा व्यवस्थापन विभागाने राबविली. मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य निरीक्षकांच्या माध्यमातून शहरातील विविध दुकानांची तपासणीत बंदी असलेले प्लास्टिक आढळून आलेल्या दुकानांना प्रत्येकी पाच हजार रुपये दंड आकारण्यात आला. झोन नंबर ७ कडील प्रभाग क्रमांक १४, २३, २५मध्ये १५ पैकी ३ आस्थापनाकडे बंदी असलेले प्लास्टिक आढळून आल्याने १५ हजार रुपये दंड करून अंदाजे ५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, आरोग्य निरीक्षक हमीद हिरोली, सोमनाथ सिद्धागणेश, विठोबा शिंदीबंदे व शिवाजी कांबळे उपस्थित होते.

झोन ८ कडील प्रभाग २२, ३६ पैकी २ दुकानात प्लास्टिक ग्लास आढळल्याने १० हजार दंड करण्यात आला. मुख्य आरोग्य निरीक्षक अनवर शेख, सुनील राठोड , सतीश व्हनमाने, सतीश क्षीरसागर, शाहरुख शेख यांचा या मोहिमेत सहभाग होता.

देगाव भागात एका दुकानात प्लास्टिक आढळल्याने पाच हजार रुपये दंड करण्यात आला. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक नागटिळक, आरोग्य निरीक्षक वनारोटे, शशिकांत शिरसट, कोंगे व धरणे यांचा सहभाग होता. एक किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.



## रंगोत्सव स्पर्धेमध्ये ‘सिद्धेश्वर’च्या विद्यार्थ्यांना ७३ पारितोषिके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेमध्ये यश संपादन केले. या स्पर्धेत ७३ विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळवली. यामध्ये इयत्ता ४ थी मधील स्वराज रामपुरे याने राष्ट्रीय स्तरावर दुसरा क्रम ांक मिळवत लॅम्पच्या स्वरुपात पारितोषिक मिळविले.

यावेळी ३१ विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदके, २० विद्यार्थ्यांनी रौप्य पदके, १५ विद्यार्थ्यांनी ब्रांझ पदके मिळवली. तसेच या स्पर्धेत ६ उत्तेजनार्थ पारितोषिके विद्यार्थ्यांनी मिळवली. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षिका तेजस्विनी भुर्के यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व कलाशिक्षिका यांचे अभिनंदन शालेय शिक्षण समि तीचे चेअरमन धर्मराज काडादी, सदस्य भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, डॉ. राजशेखर येळीकर, म ल्लिकार्जुन कळके, मुख्याध्यापिका उमा बागलकोटी, शैक्षणिक प्रमुख गीतांजली आलमेलकर यांनी केले.

# हरिभाई देवकरण प्रशाला : मनाचा तळ शोधण्याचं ठिकाण!

सोलापूरच्या शिक्षणक्षेत्रातील एक अभिमानास्पद मानबिंदू म्हणजे हरिभाई देवकरण प्रशाला ! हा ‘‘ब्रँड ‘‘ आता जगभर पसरलेला आहे. या शाळेच्या ओळखीमधील एक शिरपेच म्हणजे या प्रशालेचे माजी विद्यार्थी वारंवार आयोजित करीत असलेले स्नेहमेळावे. १९७५ साली जुन्या अकरावीची शेवटची बॅच म्हणजे आम्ही- सुमारे अडीचशे विद्यार्थ्यांची बॅच !

२००२ पासून सातत्याने आम्ही दर २-३ वर्षांनी भेटतोय. शक्यतो हा स्नेहमेळावा सोलापूरला शाळेच्या कुशीत आणि गड्डा यात्रेच्या आसपास. यानिमित्ताने यात्रा + हुरडा आणि शक्य झालं तर आसपासच्या देवस्थानांना भेट असे अनेकविध हेतू मनात बाळगून शंभराहून अधिक शालेय सवंगडी दरवेळी जानेवारी म हिन्यात एकत्र येतात. सोलापूरचे प्रसिद्ध व्यावसायिक आणि वर्गमित्र श्री राजेंद्र गांधी यांच्या मनात केव्हातरी ही कल्पना आली आणि बघता बघता ती सवयीची झाली. परिचय सत्र, शिक्षक सन्मान, भग्याची भेळ,




संगीत रजनी आणि मनसोक्त गप्पा हे उपक्रम रुळले. वर्गात जाणे, शिक्षकांशी चर्चा, फोटोसेशन आणि आठवणींची पुरचुंडी. काहीजणींचे माहेर सोलापूरला असल्याने ही धावती भेट अधिकच मायेची आणि उबदार. बऱ्याच मित्र-मैत्रिणींचे नातेवाईक सोलापूरला स्थायिक असल्याने यानिमित्ताने होणाऱ्या हक्काच्या गाठीभेटी हे म्हणजे आईसिंग ऑन द केक !

बघता बघता १९७५ साली सुटलेल्या शाळेचा कालावधी आता पन्नास वर्षांचा झालाय. यादरम्यान किती पाणी वाहून गेलंय याचा हिशेब गेले काही महिने सुरु आहे. सुमारे चाळीस मित्र-मैत्रिणी घाईत असल्यासारखे हे जग सोडून निघून गेलेत. दिवंगत झालेल्या शिक्षक-शिक्षकांची यादीही स्वाभाविकपणे मोठी आहे. साधारण या ‘‘ मित्रोत्सवाचे ‘‘ सूतोवाच गेल्या स्नेहमेळाव्यातच झाले असले तरीही एप्रिल २०२४ पासून संयोजनाची तयारी सुरु झालीए. समि त्यांची स्थापना, कार्यक्रमांची आखणी, स्नेह-संपर्क आणि प्रत्यक्ष बैठका तसेच कोरोनाची देणगी म्हणून अंगवळणी पडलेल्या ऑनलाईन बैठकी होताहेत. यावेळी एक सूर असा निघाला की कुठेतरी एखाद्या रिसॉर्टमध्ये भेटू या म्हणजे पूर्णवेळ एकत्र काढता येईल. त्यादृष्टीने पांचगणी येथील बेले व्हयू या रिसॉर्टमध्ये २५ आणि २६ जानेवारी रोजी भेटायचे ठरले. पन्नास वर्षांच्या सहक्षणांची स्मृती म्हणून या भेटीचे नामकरण ‘‘ मित्रोत्सव ‘‘ असे करण्यात आले आहे. नेहेमीच्या कार्यक्रमात यावेळी २६ जानेवारीचे ध्वजवंदन, कराओके, फिश पॉन्डस, कॅम्प फायर असे नवे उपक्रम समाविष्ट करण्यात आलेले आहेत. शिक्षकांचा सन्मान त्यांच्या घरी जाऊन करण्याचे योजिले आहे, ज्यायोगे त्यांना प्रवासाचा त्रास टाळता येईल. पांचगणीचा निसर्ग, रिसॉर्टवरील पोहोण्याचा तलाव, पुस्तकांचे गांव (भिलार), मित्रांबरोबर भटकंती आदी वाढीव आकर्षणे या स्मरणरंजनाचा सोहोळा संस्मरणीय करतील. बघता बघता १११ मित्र-मैत्रिणींनी मित्रोत्सवाची वर्गणी भरलेली आहे. काहीजण परदेशातून खास या समारंभासाठी येताहेत. अद्यापही काहीजणांचे नक्की नाहीए. त्यांच्या पर्यंत पोहोचण्याचा एक मार्ग- संयोजक नितीन शहा (९४२२० ६६९११) किंवा ज्योत्स्ना जोशी (८४५४९ ४८२५८). कृपया लवकर निर्णय घ्यावा आणि सामील व्हावे अशी सर्वांना विनंती. अशी संधी पुन्हा नक्कीच येणार नाही.

**-डॉ. एन. एच. देशपांडे**








## सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या दिनदर्शिकेचे अनावरण

**सोलापूर, दिनांक २६ डिसेंबर-**

सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वतीने पहिल्यांदाच काढण्यात आलेल्या २०२५ च्या दिनदर्शिकेचे अनावरण पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

यावेळी सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, सहसचिव अभिषेक तापडिया, कार्यकारी सदस्य कमलेश शहा, रामेश्वरी गायकवाड, तारासिंग राठोड आणि व्यवस्थापक विनायक दुदगी आदी उपस्थित होते.

## मधाच्या नोंदीसाठी ‘मधुक्रांती पोर्टल’

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

मध आणि मधमाशी संबंधित अन्य उत्पादनांच्या योग्य स्त्रोताचा शोध घेण्याच्या दृष्टीने व अद्ययावत नोंदी ठेवण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने ‘मधुक्रांती पोर्टल’ हे ऑनलाईन पोर्टल विकसित केलेले आहे. या पोर्टलवर मधुमक्षिका पालकांनी नोंदणी करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाचे संचालक किसन मुळे यांनी केले आहे. नोंदणी धारकांना १ लाखापर्यंत मोफत विमा उपलब्ध होतो. विना अडथळा मधुमक्षिका पेटयांचे स्थलांतर आदी लाभ मिळतात.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कक्कया ढोर समाजाचा रविवारी वधू-वर परिचय मेळावा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२६ डिसेंबर-
येथील सुशील विचारधारा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सोलापुरात कक्कया ढोर समाजाचा वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव संजय जोगदनकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.
अंत्रोळीकर नगर येथील पुष्पस्नेह लॉन येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत हा मेळावा होणार आहे. यात महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, तेलंगणा, गुजरात येथूनसुद्धा वधू,वर आणि त्यांचे पालक सहभागी होणार आहेत. वधू-वरांची माहिती




असलेली पुस्तिका यानिमित्ताने प्रकाशित करण्यात येणार आहे. इच्छुक वधू-वर पालकांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक सच्चिदानंद व्हटकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गंगाधर जोगधनकर, राजेश कटकधोंड, अशोक सदाफुले, शंकर इंगळे आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### बुरुड केतेश्वर महाराज पुतळ्याचे रविवारी अनावरण

सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
कर्नाटकातील बिदर येथे बाराव्या शतकातील संतश्रेष्ठ बुरुड केतेश्वर महाराजांच्या सम धीस्थळावर बसविण्यात येणाऱ्या पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण रविवार दि. २९ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे,अशी माहिती निमंत्रक दशरथ वडतिले यांनी दिली. त्यादिवशी सकाळी नऊ वाजता ओल्ड सिटी बुरुड गल्ली येथून संत बुरुड केतेश्वर महाराजांच्या पुतळ्यासह भव्य सवाद्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दुपारी बारा वाजता सम धीस्थळ असलेल्या चिट्टी येथे पूजाविधी व महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. दुपारी ३ वाजता सभागृहात मुख्य कार्यक्रम होईल. या कार्यक्रमास चित्रदुर्ग येथील मठाधिपती इम्मडी बसव केतेश्वर महाराज, भालकीच्या हिरेमठ संस्थानचे प्रमुख डॉ. बसव पट्टदेवरु, कर्नाटकचे मंत्री वनमंत्री ईश्वर खंड्रे, शिवसेनेचे नेते चंद्रकांतजी खैरे, आ.हरीशजी पिंपळे व आ.किशोरजी जोरगेवार आदी उपस्थित राहणार आहेत. चित्रदुर्ग मठाचे उपाध्यक्ष डॉ.संजीवकुमार नागेश्वर, इंजिनियर सुरेश मेदा व बिदर बुरुड समाजाचे अध्यक्ष राजकुमार नागेश्वर यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाची तयारी सुरु आहे. या कार्यक्रमास बुरुड समाज बांधव व केतेश्वर प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.



संत बुरुड केतेश्वर महाराज

### सोनी महाविद्यालयात टॅलेंट सर्च परीक्षेत ९२० विद्यार्थी सहभागी

सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
देशभक्त हरिनारायण बंकटलाल महाविद्यालयामार्फत सोनी टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत शहरी तसेच ग्रामीण मिळून ४० शाळांमधील ९२० विद्यार्थी सहभागी नोंदवला होता. परीक्षा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोमाणी, परीक्षेचे आयोजक सुनील माहेश्वरी, सचिव मधुसूदन करवा, सहसचिव डॉ. गिरीष हरकुट, संचालिका डॉ. वासंती अय्यर, प्राचार्या डॉ. आशा रोकडे, उपप्राचार्या हरदिप बोमरा, डॉ. सचिन खंडेलवाल यांनी परिश्रम घेतले.




### जैन गुरुकुल शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
श्री दिगंबर जैन गुरुकुल बालक मंदिर व प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी कादर शेख उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेंग पांगळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, ज्येष्ठ शिक्षक सचिन मेहता यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस गुरुकुल प्रणालीचे आद्यप्रणेते परमपूज्य गुरुदेव श्री १०८ समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन वैंव परिचारक यांनी केले. णमोकार महामंत्राचे पठन मनिषा मांडवगडे यांनी केले तर अतिथी परिचय राणी तोडकरी यांनी केले. आभार सचिन मेहता यांनी मानले.

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा

सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर येथे गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धरेप्पा हत्तुरे होते. यावेळी प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक मारुती माने, बसवराज कोरे, बाबुराव कलशेट्टी, अनिलकुमार गावडे यांच्या हस्ते रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी समृद्धी वारकड, साक्षी सगर, ऐश्वर्या विभुते, स्नेहा कोन्हाळी, श्रेया स्वामी, वीर कुलकर्णी, घनश्री येणगुरे, समृद्धी स्वामी, ऐश्वर्या डोंबाळे, आफिया फुलारी या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यावेळी मारुती माने, बसवराज कोरे, महादेव जगताप या शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अमरनाथ कदारे, सूत्रसंचालन पल्लवी करजगीकर यांनी तर आभार प्रिया पसारे यांनी मानले.




# बिल व वर्क ऑर्डरच्या मंजुरीसाठी मागितली १ लाख ९५ हजारांची लाच

### अकलूज नगरपरिषदेच्या स्वच्छता निरीक्षकांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ डिसेंबर -
कामगारांच्या मासिक वेतनाच्या बिलाच्या व वर्क ऑर्डर मंजुरीसाठी १ लाख ९५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या अकलूज नगरपरिषदेच्या स्वच्छता निरीक्षकांवर अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
नितीन सिद्राम पेठकर (वय ४०, रा. बासलेगाव रोड, पिरजादे प्लॉट, लोखंडे मंगल कार्यालयजवळ, अक्कलकोट) असे गुन्हा दाखल झालेल्या स्वच्छता निरीक्षकाचे नाव आहे.
नितीन पेठकर हे अकलूज नगरपरिषदेमध्ये स्वच्छता निरीक्षक म्हणून काम करतात. यातील तक्रारदार यांची श्री गणेश इंडस्ट्रियल सर्व्हिसेस, बारामती या नावाची कंपनी असून ही कंपनी विविध नगरपरिषदे, नगरपालिकेस साफ-सफाई व इतर कामाकाजाकरिता मनुष्यबळ पुरवठा करण्याचे काम करते. या कंपनीच्यावतीने विविध आस्थापनांशी






समन्वय साधून टेंडर भरणे, मनुष्यबळ पुरविणे, पत्रव्यवहार करणे, वेतनासाठी निधी प्राप्त करून घेणे इत्यादी शासकीय कामे करण्यात येतात. अकलूज नगरपरिषदेने शहरातील रस्ते, बाजारपेठा, वाणिज्य गाळे, शौचालय साफ सफाई करण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी प्रसिद्ध केलेले टेंडर हे श्री गणेश इंडस्ट्रियल सर्व्हिसेस, बारामती यांना मंजूर झाले असून या कंपनीने अकलूज नगरपालिकेस मनुष्यबळ पुरवठा केला होता. श्री गणेश इंडस्ट्रियल सर्व्हिसेस, बारामती या कंपनीस टेंडर मंजूर झाल्यानंतर निविदा दर मंजूर करून वर्क ऑर्डर देताना स्वच्छता निरीक्षक नितीन पेठकर याने तक्रारदाराकडे कामगारांच्या मासिक वेतनाच्या बिलाच्या तीन टक्के रक्कम व वर्क ऑर्डर मंजुरीचे दीड लाख रुपये असे एकूण १ लाख ९५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.
त्यामुळे तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने या तक्रारीची पडताळणी करून याबाबत अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपअधिक्षक गणेश कुंभार पुढील तपास करीत आहेत. ही कारवाई अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर अधिक्षक डॉ. शीतल जानवे-खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिक्षक गणेश कुंभार, पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले, सहायक फौजदार कोळी, पोलिस हवालदार राहुल गायकवाड, पोलिस नाईक संतोष नरोटे यांनी केली.

# राज्यस्तरीय करुणाशील पुरस्कार वितरण सोहळा उद्या

### सामाजिक, वैद्यकीयसह कला क्षेत्रातील मान्यवरांचा होणार गौरव

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२६ डिसेंबर-
करुणाशील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने २१ वा राज्यस्तरीय करुणाशील पुरस्कार वितरण सोहळा शनिवार २८ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता शिवस्मारक सभागृहात आयोजित केला आहे. राज्यातील समाज कार्य, वैद्यकीय आणि कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती निमंत्रक आशुतोष नाटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.
यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, वैद्यकीय शिक्षण व संशोधन केंद्र, मुंबई संचालक डॉ. अजय चंदनवाले, सुश्रुषा सेवा व प्रबंधक महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई अधिक्षिका अर्चना बढे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ नसीमा पठाण, जी.एम. मागासवर्गीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. नाटकर यांनी केले आहे



**विशेष सन्मान पुरस्काराचे मानकरी असे**
स्नेह गौरव पुरस्कार -डॉ. जितेंद्र संकपाळ, जीवन गौरव पुरस्कार-सुनिल गोडबोले, विशेष सन्मान- परिसेविका अंजली कुलथे, अधिसेविका लक्ष्मी आपटे, संजीवनी गायकवाड, मंदा संजय थोरात, सहाय्यक अधिसेविका भारती वीर, शांता पाटील, नजमा नूर महम्मद सय्यद, विभागीय परिसेविका यशोदा नाईक, नर्सिंग ऑफिसर शालिनी थुल, अलका गणेश मैड-टाक, नंदा कांबळे (खांडेकर), सुधा मंगरूळकर, महिमा अमृत, रुथ इंगळे, रंजिता डोंगरे, जागृती गायकर, सुधाकर गायकवाड.




# पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी मदत करणार

### मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची डिजिटल मिडिया संघटनेला ग्वाही

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या लाभां व्यतिरिक्त कला, क्रीडा, संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची क्षमता असलेला पत्रकारांच्या मुला-मुलींना त्या-त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मदत करण्याची ग्वाही भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात मंत्री म्हणून कार्य करण्याची तिसऱ्यांदा संधी मिळाल्यास बद्दल डिजिटल मिडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्यांनी मंत्री पाटील यांच्या कोथरुड येथील निवासस्थानी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कन्हेरी मठ कोल्हापूर येथे झालेल्या अधिवेशनात मंत्री पाटील यांनी राज्यातील पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअर व विकासावर भर देण्याचे आवाहन करून त्यासाठी विशेष प्रतिष्ठान स्थापन करण्याची सूचना केली होती. त्यानुसार राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानला आणि विशेषतः पत्रकारांच्या मुलींच्या करिअरसाठी भरीव मदत करण्याची ग्वाही चंद्रकांतदादांनी दिली. यावेळी त्यांना श्रीविठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती भेट देण्यात आली.
संघटनेचे उपाध्यक्ष सतीश सावंत, सचिव महेश कुगावकर, पदाधिकारी सूर्यकांत वायकर,तेजस राऊत, अमोल पाटील खास रे टीव्हीचे संचालक संजय कांबळे, अमोल साळुंखे, बालाजी राजपूत आदी उपस्थित होते.



## नरेंद्र मोदी विचार मंच
### कुंभ पर्व महोत्सवास भाविकांना घेऊन जाणार..!

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
प्रयागराज (उत्तरप्रदेश) येथे १६ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या कुंभ पर्व महोत्सवास येथील नरेंद्र मोदी विचार मंच भाविकांना घेऊन जाणार आहेत.
९ फेब्रुवारी सोलापूरातून भाविकरवाना होणार आहे.इच्छुक भाविकांनी ९३२५५९५९१९ अथवा ९५४५४२०२०३ या मोबाईलवर संपर्क साधावा, असे आवाहन नरेंद्र मोदी विचार मंच महाराष्ट्र प्रदेश प्रमुख संघटक विष्णू सकट, जिल्हाध्यक्ष प्रमोद राठोड, शहराध्यक्ष सुनील राठोड यांनी केले आहे.




# औद्योगिक वसाहतीस निधी उपलब्ध करुन देऊ : आ. सचिन कल्याणशेट्टी

### औद्योगिक वसाहतीच्या भेटीवेळी पदाधिकाऱ्यांना आश्वासन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
उद्योगमंत्री उदयजी सामंत यांच्याबरोबर लवकरच मिटींग घेण्यात येईल. सेवा व्यवसायाला परवानगी देणेयबाबत नविन परिपत्रक काढायला लावू तसेच औद्योगिक वसाहतील डी पी स्कीमअंतर्गत संस्थेच्या रस्ते व इतर सोयीसाठी संस्थेला निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.
आमदार कल्याणशेट्टी यांनी दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसायटी लिमिटेड येथे उद्योजकांशी संवाद साधताना हे आश्वासन दिले. संस्थेचे चेअरमन मकरंद गवळी यांनी आमदार कल्याणशेट्टी यांचे स्वागत केले. श्री गवळी यांनी संस्थेकडे प्राप्त झालेले महाराष्ट्र शासन उद्योग संचनालय यांचे बांधकाम परवानगीबाबत परिपत्रक दि.३ एप्रिल २०२४ व तसेच सेवा व्यवसायाला निर्बंधाबाबत दि.५ जून २०२४ परिपत्रक अशा या दोन्ही परिपत्रकाच्या अटी व निर्बंधाबाबत संस्थेला प्रामुख्याने येत असलेल्या अडी-अडचणी मांडल्या. तसेच महाराष्ट्र राज्य शासनाचे सुधारित परिपत्रकेनुसार संस्थेच्या सभासदाना बांधकाम परवानगी घेणेबाबत येत असलेल्या अडचणी सांगितल्या. तसेच उपस्थित असलेले संस्थेचे संचालक व उद्योजक यांनी सेवा व्यवसायासाठी भूखंड हस्तांतर होत नसल्यामुळे सभासदांना आपल्या अडचणी मांडल्या.
या कार्यक्रमास औद्योगिक वसाहतीचे संचालक प्रकाश जम्मा, श्रीनिवास सादूल, हर्षवर्धन केडारकर, अतुलसिंग राजपूत, निलकंठ यादवाड, तसेच उद्योजक नितिन बिज्जरगी, दिलिप पेठे, चेतन वनकुद्रे, गणेश सट्टे, आनंद जाधव, जयंत गोरटे, व्यवस्थापक बाळकृष्ण राजगिरी आदी उपस्थित होते.

# सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून जबरी चोरी, दुचाकी चोरीचे ५ गुन्हे उघडकीस

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ डिसेंबर -
सोलापूर आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पथकाने ६ सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून जबरी चोरी, दुचाकी चोरीचे ५ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी ३ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.
प्रदीप अशोक गुरव (वय ३६, रा. रेवणसिध्देश्वर नगर, बसवेश्वर मठाच्या शेजारी, जुना विजापूर नाका झोपडपट्टी, सोलापूर), उदयकुमार रामलु कामुर्ती, आनंद श्रीरामलु नक्का (रा. वल्याळ बगीच्याजवळ, सोलापूर), रतन सोमनाथ माटे (वय २७, रा. मड्डी वस्ती, बुध्द विहार, जुना तुळजापूर नाका, सोलापूर), विनायक विठ्ठल गायकवाड, लखन अशोक गायकवाड (रा. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर रोहित रमेश गायकवाड, राजकुमार उर्फ भोला आनंदया स्वामी (रा. सोलापूर) अशी पाहिजे असलेल्या आरोपींची नावे आहेत.
शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून कंबर तलाव



ते जगदीश मंगल कार्यालयाच्या रोडवर दुचाकीवरून भरधाव जाणाऱ्या प्रदीप गुरव यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीची बॅग जप्त करून त्यातून चोरलेली ४५ हजार २०० रुपयांची रोकड जप्त केली.
तसेच त्याच्याकडील दुचाकीदेखील चोरीची असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. ताना-बाना चौक ते वल्याळ बगिचा जाणाऱ्या रोडवर उदयकुमार कामुर्ती व आनंद नक्का या दोघांना विना नंबर प्लेटच्या दुचाकीवरून जाताना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीची दुचाकी जप्त केली. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मुस्लीम पाच्छा पेठेतील विणकर बागेमध्ये रतन माटे यास संशयावरून ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीचा मोबाईल जप्त केला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तसेच पोलिसांनी डोणगाव रोडवर विनायक गायकवाड, लखन गायकवाड यांना संशयास्पदरीत्या थांबलेल्या ठिकाणी ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर त्यांनी चोरीच्या गुन्ह्याची माहिती दिली. सुमारे दीड वर्षापूर्वी सोलापूर विद्यापीठाजवळ रोडवर एका टेम्पोतून टीव्ही चोरून नेले व ते टीव्ही डोणगाव रोडवरील मुस्लीम स्मशानभूमीच्या पुढे पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेले मिळून आले. या गुन्ह्यात रोहित गायकवाड व राजकुमार स्वामी या दोघांचा सहभाग असून ते दोघे अद्याप फरार आहेत. पोलिसांनी ६ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ५ गुन्हे उघडकीस आणले.
ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, पोलिस हवालदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, आनंद गड्डूरे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड यांनी केली.

# २९ जानेवारीपासून भारत विकास संगमतर्फे भारतीय संस्कृती उत्सव

### देशभरातून ३० लाख नागरिक सहभागी होणार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ डिसेंबर-
भारत विकास संगमतर्फे २९ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यातील सेडम येथे सातवा भारतीय संस्कृत उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भारत विकास संगमचे राष्ट्रीय सहनिमंत्रक अशोक टांगसाळे व काशिनाथ भतगुणकी यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.
नऊ दिवसीय या कार्यक्रमात देशभरातून सुमारे ३० लाख लोक सहभागी होणार आहेत. त्यात देशभरातून १० हजार संस्था व अनेक तज्ञ मान्यवर सहभागी होऊन सकारात्मक संदेश जगातील जनतेपर्यंत पोहचणार आहेत. या उत्सवात कृषी, ग्रामविकास, आहार, आरोग्य, उद्योग, सेवा, धर्म, संस्कृती व पर्यावरण या सर्व विषयातील तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.
सोलापूर शहर व जिल्ह्यातील युवक युवतींना यामध्ये सहभागी होण्याची सुवर्ण संधी असून अनेक उद्योजकांना आपल्या उद्योगाच्या प्रसार व विक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास इन्फोसिसच्या सुधामूर्ती, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, गोभक्त गोपाल सुतारीया, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, भारतरत्न सचिन तेंडूलकर, शेतीतज्ञ बी. बी. ठोंबरे, जलतज्ञ राजेंद्रसिंह, पद्मश्री लक्ष्मणसिंह लापोडिया, ग्लोबल विकास ट्रस्टचे मयंक गांधी, वैद्य हितेश जानी, पंचगव्य चिकित्सक डॉ. डी. पी. रमेश, शिक्षणतज्ञ डॉ. शोक ठाकूर, माधव रेड्डी, थोर राष्ट्रीय चिंतक व भारत विकास संगमचे संस्थापक के. एन. गोविंदाचार्य, संरक्षक बसवराज पाटील व अनेक तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. स्वदेशी उत्पादने व हात उद्योगाच्या प्रचार, प्रसार, आणि विक्रीसाठी अत्यल्प दरात ९०० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९८६

**तंव अर्जुन म्हणे हरि । माय आपुलेयाचा स्नेहो करी ।**
**एथ विस्मयो काय अवधारी । कृपानिधी ।।**

आपले लेकरु चुकत असेल किंवा एखादे योग्य काम करण्यास टाळत असेल तर त्याची आई त्याला वेगवेगळया पध्दतीने समजावून योग्यते कार्य करण्यासाठी प्रवृत करते. अगदी त्याप्रमाणेश्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला वेगवेगळया पध्दतीने, अनेक उदाहरणांच्या सहाय्याने समजावत आहेत. अर्जुनाला, श्रीकृष्णांनी कर्मयोग, सांख्ययोग सांगीतला. हे योग यापूर्वी कोणाला सांगीतले होते, त्याचा काय परिणाम झाला हे पण भगवंतानी सांगीतले. या योगाचे महत्व त्यालाच कळते ज्याला आत्मनिष्ठेची भावना असते. ज्याला आत्मनिष्ठाच नाही, त्याला हा योग सांगून उपयोग नाही. वस्त्रविरहित राहणा-या लोकांच्या गांवी किंमतीवान वस्त्रे काय कामाची. जन्मांध माणसाला सुर्याची महती कशी समजणार. बहि-या लोकांच्या सभेत गायनाला काय महत्व असणार, कोल्हयाच्या मनात चांदण्या विषयी प्रेम निर्माण होणार नाही. अगदी त्या प्रेमाने जे वैराग्याची सीमा जाणत नाहीत, आत्मानात्म विचाराची भाषाच ज्यांना समजत नाही ते लोक माझ्यापर्यन्त किंवा या योगापर्यन्त पोहचण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, असा हा महत्वपुर्ण कर्मयोग, सांख्ययोग मी तुला कथन केला आहे. म्हणून



तु आता पूर्ण संशय सोडून दे. अर्जुना तू केवळ प्रेमाचा अवतार, भक्तीचा ओलावा आणि सख्याची जीवनकला आहेस म्हणून मी तुला मन:पुर्वक सांगत राहिलो, तुझ्या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न करीत राहिलो, असे भवगंत म्हणाले. आई, वडिल, बंधू किंवा सहजासहजी कोणाला सांगीतला नाही असा योग अर्जुना तुला तुझ्या प्रेमापोटी सांगीतला, असे भगवान म्हणाले. तेव्हा अर्जुन म्हणाला,

**तंव अर्जुन म्हणे हरि । माय आपुलेयाचा स्नेहो करी ।**
**एथ विस्मयो काय अवधारी । कृपानिधी ।।**

हे कृपासागर हरी तू हे ध्यानात घे की, आई आपल्या बाळावर प्रेम करते यात नवल काय? आईचे कर्तव्य, जबाबदारीच आहे की, तिने तिच्या बाळावर प्रेम केलेच पाहिजे. अगदी तसे तु माझ्यावर प्रेम केलेच पाहिजे. त्याचबरोबर तु मला मार्गदर्शनही केले पाहिजे. कारण ही तुझी जबाबदारीच आहे. तसेच हे तुझे कर्तव्य सुध्दा आहे. अर्जुनाने भगवंतावर अधिकार गाजवितांना श्रीकृष्णा ही तुझी जबाबदारीच आहे असे स्पष्ट म्हटले. अर्जुन असे स्पष्ट बोलत असला तरीही, अर्जुनाने उत्तर देतांना, श्रीकृष्णाला आईची उपमा दिली व आपणाला लेकराची उपमा घेतली आहे. आपण एखादयाला मार्गदर्शन केले, एखादयावर उपकार केले व त्याच्याकडून किमान आभार माणण्याची अपेक्षा केली आणि तो जर आपणाला आपण माझे आई-बाप आहात असे म्हणाला तर आपण त्याचेकडून आभाराची अपेक्षा करीत नाही. कारण आई-बापाची उपमा देणे हे आभारापेक्षा कितीतरी पुढचे पाऊल आहे. आई-बापाला मुलांनी आभार मानावे हे अपेक्षित नसते. कारण आई-वडीलांचा स्वभावच तसा असतो. आईवडील आपल्या मुलांसाठी वाट्टेल ते नि:स्वार्थ भावनेने करतात. आई-वडीलांची भावनाच नि:स्वार्थी असल्याने तेथे स्वार्थला थाराच नसतो. अर्जुन हुशार आहे, तो श्रीकृष्णाचे मन बरोबर प्रेमाने, लडिवाळपणाने आईची उमपा देऊन जिंकतो आहे. माऊलींसुध्दा असेच आहेत. माऊली प्रेमाने श्रोत्यांचे मन जिंकतात, जसे त्यांनी आपले मन जिंकले आहे. आपण एकमेकांचे मन जिंकु या आणि या ओव्यांच्या सहवासात राहू या. यामुळे आपल्या जीवनातील आनंदलहरी निश्चितच वाढतील यांत संशय नसावा.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २७ डिसेंबर २०२४ | स्वामी स्वरुपानंद जयंती, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पावस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वादशी - (२६.२६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (२०.१७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - धृति (२२.३६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (१३.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नवीन योजना कार्यान्वित होऊन त्या यशस्वी होतील. कायदेशीर वाद विवादातून योग्य मार्ग निघेल. कार्यक्षेत्रात प्रगती राहील. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**वृषभ :** आगोदर केलेल्या कामाचा आज आपल्याला निश्चितच फायदा होणार असून आर्थिक आवक वाढणार आहे. मान सन्मानाचे योग संभवतात.

**मिथुन :** विचार पूर्वक कामे केली तर आजच दिवस चांगला जाईल. आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबध सुधारतील. दुसऱ्याची निंदा करण्याचे टाळावे.

**कर्क :** कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील.

**सिंह :** व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल.

**कन्या :** देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**तुळ :** व्यापार, व्यवसाय चांगला राहील. महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत. वाईट सवयींपासून दूर रहा. प्रवास यशस्वी होऊन आनंददायी राहील.

**वृश्चिक :** नवीन योजना आखल्यामुळे निश्चितच फायदा होणार आहे. मानसिक शांती मिळेल. सहचरणीची साथ लाभेल. मुलांच्या नौकरीची चिंता राहणार आहे.

**धनु :** आत्मविश्वासामध्ये वाढ झाल्याने कोणतेही काम सहजतेने करू शकाल. घरामध्ये लक्ष दिले असता घरातील समस्या सहजासहजी दूर होतील. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**मकर :** भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**कुंभ :** मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

**मीन :** कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे.

# सोलापुरात शनिवारपासून स्वकुळ साळी मराठी साहित्य संमेलन

## ग्रंथदिंडी, परिसंवाद कवी संमेलनासह मिळणार वैचारिक पर्वणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान पुणे आणि श्री जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंच सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे अखिल भारतीय स्वकुळ साळी (विणकर) मराठी साहित्य संमेलन सोलापुरात २८ व २९ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती मंचचे अध्यक्ष कृष्णा सुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता स्वकुळ साळी समाज ज्ञातीचे विठ्ठल मंदिर बेगम पेठ येथे संत साहित्याचे अभ्यासक पांडुरंग साखरे यांच्या हस्ते तर स्वकुळ साळी मारुती मंदिर येथे अंबर सरवदे यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे पूजन करण्यात येणार आहे. दुपारी १२.३० वाजता जुना वालचंद महाविद्यालय सोलापूर येथे आ. देवेंद्र कोठे यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक कै. वसंतराव एकबोटे साहित्य नगरी, सत्यविजय कन्वेंशन्स हॉल, जुना कुंभारी नाका, आकाशवाणी केंद्र जवळ, सोलापूर येथे दुपारी ३ वाजता या ग्रंथ दिंडीचे





आगमन होणार आहे.

दुपारी ४ वाजता स्व. चंद्रकांत पोरे व्यासपीठ येथे या संमेलनाचे उद्घाटन आणि ग्रंथ प्रकाशन होणार आहे. कुशाग्र फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सी. पी. साळी आणि सारिका साळी यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. साहित्यिका डॉ. संगीता बर्वे या संमेलनाच्या अध्यक्षा आहेत. तर या संमेलनाचे स्वागताध्यक्ष साहित्यिक शरदकुमार एकबोटे हे आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यावसायिक संजय गणेश, उद्योजक प्रताप साळी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी अखिल भारतीय स्वकुळ साळी

समाजाचे अध्यक्ष रमेश चिल्लाळ, मुंबई विभागाचे अध्यक्ष अशोक दांडेकर, महिला मंडळ अधक्ष अश्विनी मते, जागतिक साळी फाउंडेशनचे संस्थापक निशा वक्ते आणि विजय वक्ते, शांताबाई केंदोळे, नंदू सपार, अंबर सरवदे, शांताबाई गायकवाड व निवृत्ती गायकवाड, पत्रकार डॉ. चंद्रशेखर बारगजे, श्री जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण सरवदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सायंकाळी ६ वाजता निमंत्रिताचे कवी संमेलन आणि रात्री ९ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. रविवार दि. २९ डिसेंबर रोजी दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता योग साधना या विषयावर योग तज्ञ कृष्णा सुरे हे मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ९ वाजता भगवान श्री जिव्हेश्वर कथासार होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मीराबाई आढाव या उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० वाजता परिसंवाद होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ट्रस्ट अक्कलकोटचे चेअरमन महेश इंगळे हे उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ११.३० वाजता नवोदित कवींसाठी कवी कट्टा आयोजित केला आहे. दुपारी २ वाजता कथाकथन होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रतिक्षा बोर्डे हे उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता चर्चासत्र होणार असून उद्योजक शैलेश एकबोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दुपारी ४ वाजता या संमेलनाचा समारोप समारंभ होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. देवेंद्र कोठे, ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार पिसे, व्यवसायिक अभयकुमार एडके, शांताबाई गायकवाड निवृत्ती गायकवाड आदी उपस्थित राहणार आहेत, असे स्वागताध्यक्ष साहित्यिक शरदकुमार एकबोटे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस प्रा. डॉ. चंद्रशेखर टोम्पे दत्तात्रय गायकवाड, ज्ञानेश्वर सपकाळ आदी उपस्थित होते.



# नळदुर्गच्या युनिवंडर्स रिसॉर्टमध्ये 'सेवासदन'च्या मुलींनी अनुभवला धाडसी खेळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

येथील सेवासदन प्रशालेतील इयत्ता नववीच्या विदयार्थिनींची शैक्षणिक सहल नळदुर्ग येथील युनिवंडर्स पार्क या ऍडव्हेन्चर पार्क मध्ये गेली होती. सोलापूर ते हैद्राबाद महामार्गावरील नळदुर्ग हे ऐतिहासिक शहर आहे. नळदुर्ग शहराच्या उत्तरेस भुईकोट किल्ल्या शेजारी, बोरीनदी काठावर युनिटी कंपनीने युनिवंडर्स रिसॉर्ट अँन्ड थीम पार्क निर्माण केले आहे.

याठिकाणी सर्व सोयीनियुक्त रिसॉर्ट रायफल शुटिंग, क्रिकेट, बैलगाडी स्वारी, स्वीमिंग पूल, रेन डान्स, फिल्म शुटिंग, शॉर्ट फिल्म शुटिंग, लग्न समारंभासाठी उत्तम आणि सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत. स्विमींग पूल, आर्चरी, ह्यूमन गायरो, बॉडी झोरबिंग बॉल, ब्लॅक बुल, क्लायम्बिंग वॉल या सारख्या विविध धाडसी खेळांचा अनुभव विद्यार्थिनींनी घेतला. सहलीचे नियोजन ९ वीच्या वर्गशिक्षकांनी केले. उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई यांनीही सहलीचा आनंद घेतला.

सहशिक्षिका मीरा जमादार, अश्विनी मोरे, स्वप्ना केळकर, वैशाली काळे, लक्ष्मी कमळे, संतोषी सुरवसे, ज्ञानेश्वर काळे, रश्मी मोहोळकर आदी शिक्षक सहभागी झाले होते.



# देहविक्री करणाऱ्या महिला, तृतीयपंथींना कायद्याचे ज्ञान हवे : न्यायाधीश उमेश देवऋषी

## क्रांती, स्वाती संघातर्फे मार्गदर्शनाचा उपक्रम

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

देहविक्री करणाऱ्या महिला व तृतीयपंथी गटांना त्यांच्याविषयी असणाऱ्या कायद्याची माहिती व अधिकाराचे ज्ञान व्हावे. या बैठकीतून जिल्हा विधी प्राधिकरणाचे दिवाणी न्यायाधीश उमेश देवऋषी यांनी कायदेविषयक विस्तारित माहिती दिली.

क्रांती महिला संघ व स्वाती महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिस्ट्रीक लेवल ॲडव्होक्सी मिटींग' मध्ये हे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, वकील महाडकर, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या दिपाली शिवपुरे व सखी वन स्टॉप यांचे गाडेकर, प्रकल्पाचे कार्यक्रम अधिकारी नागेश गंजी, अहिरे क्रांती संघ महिला संघाच्या अध्यक्षा काशीबाई जाधव, सविता गायकवाड, अमीना शेख, तरंगफळच्या माजी सरपंच ज्ञानेश्वर कांबळे, महानंदा थिटे आदींची उपस्थिती होती. ठाकूर यांनी क्रांती संघटनेच्या व तृतीयपंथी यांच्या समस्या ऐकून घेतल्या. श्री. सरडे यांनी ज्यांना धान्य मिळत नाही त्यांना धान्य सुरळीतपणे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन रेणुका जाधव यांनी केले. दीपक गुंजे यांनी आभार मानले.

# भावसार व्हिजन सोलापूर क्लबचा कृतज्ञता व सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

भावसार व्हिजन सोलापूर क्लब या वतीने कृतज्ञता व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ रोटे. जयेश पटेल, समाज अध्यक्ष राजकुमार हंचाटे, क्लब अध्यक्ष प्रणिता महिंद्रकर व सचिव विशाल खमितकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना अध्यक्ष महिंद्रकर यांनी केले. सचिव खमितकर यांनी वर्षभर केलेल्या सामाजिक कार्याचा अहवाल सादर केला. २०२५ चा बजेट नूतन खजिनदार राजेंद्र बेळमकर यांनी सादर केला.

त्यानंतर प्रसार माध्यमाचे श्रीनिवास लहांडे, उत्कृष्ट फोटोग्राफी केल्याबद्दल प्रशांत महिंद्रकर, तायक्वंदा कराटे स्पर्धेत गोल्ड व सिल्वर मेडल मिळवल्याबद्दल सुयश पुकाळे याचे, उत्कृष्ट तबलावादनाचे पारितोषिक पटकावल्याबद्दल माजी अध्यक्ष मल्लिनाथ बासुतकर यांचे यावेळी सत्कार करण्यात आले.





यावेळी शिष्यवृत्ती उपक्रमासाठी सहकार्य केलेल्या ३७ देणगीदारांचा ही सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच इतर उपक्रमासाठी ही सहकार्य केलेले आशिष जवळकर, गिरीश पुकाळे, अरुण आकुडे, दत्तात्रय फुटाणे, सुहास राशिनकर, तुकाराम देवराज, पवन हंचाटे, शिवाजी उपरे, सुनील उपरे, रमेश माळवे, विशाल खमितकर, राजेंद्र बेळमकर, रेखा महिंद्रकर, रोहन शालगर यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. क्लबला या वर्षात विशेष सहकार्य केल्याबद्दल चार अवॉर्ड प्रदान करण्यात आले. बेस्ट क्लब मेंबर म्हणून तेजस्विनी माळवदकर, बेस्ट न्यू मेंबर म्हणून तुकाराम महिंद्रकर, बेस्ट डायरेक्टर म्हणून मनोज क्षीरसागर व बेस्ट ऍप्रिसिएशन म्हणून संतोष पुकाळे यांना हे अॅवॉर्ड प्रदान करण्यात आले. नुकत्याच पार पडलेल्या हिंगलाज प्रीमियर लीगच्या सामन्यांमध्ये विजेते ठरलेले, आपल्या क्लबचे सदस्य विशाल महिंद्रकर, मोहन हिबारे, दर्शन ढगे व त्यांच्या संपूर्ण टीमचे यावेळी सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे यांनी केले, तर आभार सचिव विशाल खमितकर यांनी मानले.

# मध्य रेल्वेला मानाचा गोविंद वल्लभ पंत करंडक प्रदान

## सोलापूर रेल्वे स्वच्छतेचे सर्वोत्कृष्ट स्थानक, वक्तशीरतेचे वैयक्तिक विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

रेल्वे मंत्रालयाच्यावतीने साजरा करण्यात आलेल्या ६९व्या रेल्वे सप्ताहामध्ये अति विशिष्ठ रेल्वे सेवा पुरस्कारांमध्ये मध्य रेल्वेला ६ बक्षिसे मिळाली. तर मध्य रेल्वेच्या विशेष रेल सेवा पुरस्कारामध्ये स्वच्छतेसाठीचा सर्वोत्कृष्ठ पुरस्कार हा सोलापूर रेल्वे स्थानकास मिळाला तसेच वक्तशीरपणासाठीचे वैयक्तिक बक्षिसदेखील सोलापूर विभागाला मिळाले. मध्य रेल्वेला मानाची गोविंद वल्लभ पंत शिल्ड प्रदान करण्यात आली.

६९ व्या रेल्वे सप्ताहामध्ये नवी दिल्ली येथील प्रगती मैदान येथे भारत मंडपम येथे झालेल्या कार्यक्रमामध्ये रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते मध्य रेल्वे विभागाला देशपातळीवरील सहा पारितोषिकांचे वितरण



### सोलापूरच्या ८ कर्मचाऱ्यांना वैयक्तिक बक्षिसे

वैयक्तिक पुरस्कार श्रेणीमध्ये मुंबई विभाग २४ कर्मचाऱ्यांना पुरस्कार मिळवून पुढे आहे, तर भुसावळ विभागाने १९ आणि मुख्यालयाने १८ वैयक्तिक पुरस्कार मिळवले. पुणे विभागातील १३, नागपूर विभागातील १२ आणि सोलापूर विभागातील ८ कर्मचाऱ्यांनाही विशिष्ट रेल्वे सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सिग्नल अँड टेलिकॉम वर्कशॉप, माटुंगा वर्कशॉप आणि परेल वर्कशॉपमधील प्रत्येकी १ कर्मचाऱ्यासह कार्यशाळांनाही गौरवण्यात आले.

करण्यात आले. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीना यांनी ही पारितोषिके स्विकारल्यानंतर त्यांचे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे जोरदार स्वागत करण्यात आले.

त्यानंतर महाव्यवस्थापक धरम वीर मीना यांनी विशेष रेल सेवा पुरस्कार सोहळ्यात विभाग/ कार्यशाळा/स्थानकांना २३ आंतर-विभागीय कार्यक्षमता शिल्ड व्यतिरिक्त भुसावळ विभागाला एकूण कार्यक्षमता (ओव्हर ऑल ईफीशीएंसी) शिल्ड प्रदान केली. तसेच ९७ रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी ''विशिष्ट रेल सेवा पुरस्कार'' ने सन्मानित केले.

यावेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक जगमोहन गर्ग, प्रधान कार्मिक अधिकारी सहर्ष बाजपेयी, सर्व विभाग प्रमुख, विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि मध्य रेल्वेचे इतर अधिकारी, मध्य रेल्वे महिला कल्याण संस्थेच्या अध्यक्षा आणि कार्यकारी समिती सदस्य आणि मान्यताप्राप्त युनियन प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.



# मोफत नेत्र तपासणी शिबिरात ११४ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

लायन्स मथुराबाई फतेहचंद दमाणी हॉस्पिटल, लायन्स ब्रिजमोहन फोफलिया नेत्रालय व जिल्हा अंधत्व निवारण समिती दमाणी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेच्या पुढाकाराने मोफत नेत्र तपासणी शिबीर आज सकाळी १० ते १ वाजेपर्यंत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय लष्कर सोलापूर येथे संपन्न झाले.

शिबिरात ११४ गरजूंच्या डोळ्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यापैकी १२ जनांना मोतीबिंदूचे निदान झाले आहे.

शिबिराचे उद्घाटनला. सोलापूर लायन्सचे अध्यक्ष दिनेश बिराजदार यांच्या हस्ते झाले. तसेच भिमराव दाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रफीक सय्यद, ला, धनराज कोरे पाटील, सुवर्ण काळे, महासिद्ध म्हमाणे, संयोजक सुरेश पाटोळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबिर यशस्वी होण्यासाठी ओंकार पाटोळे, अभिषेक हाटकर, आदित्य पारधे, समर्थ पाटोळे, रितेश पारधे यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### हभप पेटकर महाराजांच्या कीर्तनाला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**करकंब, दि.२६ डिसेंबर-**

श्री. विठ्ठल-रुक्मिणी व संत गाडगेबाबा मंदिर टेंभुर्णी येथे आयोजित श्रीसंत गाडगेबाबा महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त हभप पेटकर महाराज यांची किर्तनसेवा शुक्रवार झाली. यानिमित्त हभप श्री विष्णुपंत पेटकर महाराज यांनी श्रेष्ठसंत जगद्गुरु तुकाराम महाराजांचे भक्त कसे असतात? त्यांची लक्षणे कोणती? याविषयी सांगताना 'भक्त ऐसे जाणा...,जे देही उदास गेले अशा पाष निवारून' या अभंगावर समाजाला पटेल, समजेल अशा भाषेमध्ये वर्णन करून श्रीसंत गाडगेबाबा यांचेही चरित्र सांगितले.ही सेवा त्यांनी विनामूल्य केली. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सुदाम लोंढे, संजय लोंढे, सिद्धेश्वर, बबलू,किरण, आदित्य, विकास लोंढे यांनी सहकार्य केले. यावेळी अनेक भक्तगण उपस्थित होते.




### सांगोल्यात विविध उपक्रमांनी साने गुरुजींची जयंती साजरी

**सांगोला, दि.२६ डिसेंबर-**

सांगोला तालुका साने गुरुजी कथामाला यांच्या वतीने साने गुरुजी जयंती साजरी करण्यात आली. प.पू.साने गुरुजी यांच्या १२५ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून कथामालेचे सल्लागार डॉ. शिवराज भोसले यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी सांगोला तालुका साने गुरुजी कथा मालेचे अध्यक्ष भीमाशंकर पैलवान, माजी प्राचार्य बाळासाहेब वाघमारे, नीलकंठ लिंगे, सोमनाथ सपाटे उपस्थित होते. यावेळी खरा तो एकची धर्म ही प्रार्थना म्हणण्यात आली आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

### संग्रामनगर येथे पपू शंकर महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

**अकलूज, दि. २६ डिसेंबर-**



संग्राम नगर, अकलूज येथे परमपूज्य सद्गुरु श्री शंकर महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व दक्षिणमुखी मारुती मंदिराचा कलशारोहण समारंभ मोठ्या धार्मिक उत्साहात संपन्न झाला. संग्राम नगर येथे असलेल्या श्री शंकर महाराज व दक्षिण मुखी मारुती मंदिरास कलश नव्हते परिसरातील सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन दोन दिवस धार्मिक विधीसह शंकर महाराजांच्या नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कळासारोहण, दक्षिणमुखी मारुती मंदिराची कलश रोहण करण्यात आले. यावेळी ग्रामप्रदक्षिणा, पुण्याहून वाचन, देवता स्थापना, मूर्ती व कलशाला जलाधीवास, धान्य दिवास, शय्यादीवास, अग्निस्थापना, आदित्यादी नवग्रह स्थापना, आवहित देवांचे हवन, तत्वन्यास हवन आदी धार्मिक विधी परमपूज्य श्रीपाद तीर्थ स्वामीजी महाराज सज्जनगड यांच्या हस्ते करण्यात आले. पौरोहित वेदमूर्ती प्रवीण इनामदार गुरुजी व सहकारी श्रीक्षेत्र सज्जनगड यांनी केले. यासाठी संभाजी वरपे, किरण देवकते, प्रतीक चव्हाण, रोहित गोसावी, करण वाईकर, पंकज कारंडे, रणजीत बोके, हर्षवर्धन खटके, संजय गाडे, दिगंबर सावंत, यश खटके यांनी परिश्रम घेतले. या निमित्ताने ऋतुजा पोतदार यांनी शंकर महाराजांच्या चित्राची रांगोळी काढली होती. धार्मिक विधीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ज्या जागेत परमपूज्य सद्गुरु श्री शंकर महाराजांचे मंदिर उभारले आहे, या जागेत काही काळ शंकर महाराजांचे वास्तव्य होते.




### वक्तृत्व स्पर्धेने अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**बार्शी, दि. २६ डिसेंबर-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे नेहरु युवा केंद्र सोलापूर, क्रांती बहुद्देशीय संस्था बेलगाव (ता. बार्शी) यांच्यामार्फत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त 'सुशासन दिवस' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त अध्यापक विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे होते. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, धीरज शेळके उपस्थित होते. या स्पर्धेत अक्षता शिंदे, गौरी भाकरे, गाडेकर राजनंदिनी, स्नेहा गुंड, फोपले अश्विनी, श्रीऋ बगाडे, रितेश या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समारोप व बक्षीस वितरणासाठी बार्शीतील मंडल अधिकारी कोरके उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड यांनी केले.

# वटवृक्ष मंदिरात हर्षोल्हासात होणार नूतन वर्षाचे स्वागत


## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन; पाश्चिमात्य संस्कृतीला देणार फाटा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ डिसेंबर-**

नूतन वर्षाच्या स्वागताकरीता पाश्चिमात्य संस्कृतीच्या चालीरितींना फाटा देत कोल्हापूर, मुंबई व राज्यातील विविध भागातील स्वामी भक्तांच्या वतीने येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात विविध धार्मिक कार्यक्रमांनी हर्षोल्हासात नूतन वर्षाचे स्वागत होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

मंगळवारी ३१ डिसेंबर रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व बुधवारी १ जानेवारी २०२५ रोजी नूतन वर्षाचे स्वागत करण्यासाठी व नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेण्यासाठी कोल्हापूर, मुंबई, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, नागपूर, नाशिक, रत्नागिरी, सोलापूर, सांगली इत्यादी भागासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून व देशभराच्या अन्य ठिकाणांहून बरेच स्वामी भक्त येणार आहेत.

३१ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत ओम स्वामी चैतन्य भजनी मंडळाचे भजन, विविधरुपी सोंगी भारूड कार्यक्रम देवस्थान परिसरात होतील. रात्री ७.४५ वाजता महाराजांच्या शेजारतीस सुरुवात होईल. रात्री १० ते पहाटे ४ या वेळेत कोल्हापूर, मुंबई, पुणे येथील भजनी मंडळाचे नवीन वर्षाच्या स्वागताचे भजन व भावभक्तीगीतांचा कार्यक्रम, ३१ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजता कोल्हापूर व मुंबई येथील स्वामी भक्तांच्या वतीने गोड प्रसादाचे पदार्थ वाटप करुन व फटाक्यांची आतषबाजी करुन असंख्य स्वामी भक्तांच्या मुखाने 'अवधुत चिंतन श्री गुरुदेवदत्त सद्गुरु स्वामी समर्थ महाराज की जय' या जयघोषाने सन २०२५ या नवीन वर्षाचे स्वागत केले जाईल. याप्रसंगी उपस्थित सर्व स्वामी भक्त शुभेच्छा व्यक्त करतील व या शुभमुहूर्ताप्रसंगी स्वामींच्या चरणी नतमस्तक होऊन येणारे नवीन वर्ष सुख, समृध्दीने व भरभराटीने व्यतीत व्हावे याकरिता समर्थांच्या चरणी साकडे घालतील.




### मंदिर समितीतर्फे विशेष नियोजन

१ जानेवारी रोजी सकाळी ८ ते ११ यावेळेत भजन, भारूड होतील. याप्रसंगी सर्व स्वामी भक्तांच्या सुरक्षिततेकरीता व सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्याकरीता ३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजी मंदिरात स्वामी भक्तांच्या वतीने नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. स्वामी भक्तांच्या दर्शनाकरीता देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविकांनी ूतन वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे महेश इंगळे यांनी केले आहे.




## करकंब येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची पुण्यतिथी उत्सव उत्साहात

### अखंड सात दिवस नामस्मरण, संगीत मैफिल, शेकडो भाविकांना महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २६ डिसेंबर-**

करकंब येथे सद्गुरु श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या १११ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड सात दिवस श्रीराम जय राम जय जय राम या नाममंत्राचा अखंड जप, अन्नदान आणि संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी करण देवगावकर यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करून श्री. सद्गुरु गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी दिवशी पहाटे ४ वाजल्यापासून काकडा आरती, पूजा, अभिषेक करुन हभप वृषाली बोधे यांचे गुलालाचे प्रवचन झाले. त्यानंतर महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टीनंतर नगर प्रदक्षिणा मार्गावरून श्री. गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. रामनामाची दिवाळी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त करकंब येथील जपकार आलेकर बंधू यांच्या हस्ते आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा शेकडो रामभक्त, नाम प्रेमींनी आस्वाद घेतला. जपकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेथे माझे नाम तेथे माझे प्राण ही ओळखावी जाण या भावनेतून सर्व भाविक श्रद्धेने नामस्मरण करत असलेले दिसून आले. अखंड सप्ताह यशस्वी होण्यासाठी जपकार, नामप्रेमींनी अधिक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## करमाळा नगरपरिषद शाळा क्रीडा स्पर्धेत अव्वल




**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ डिसेंबर-**

आंतर शालेय क्रीडा स्पर्धेत करमाळा नगरपरिषद शाळा नंबर ४ ने सर्वाधिक बक्षीस मिळवून बाजी मारली आहे.

नगरपरिषद शिक्षण मंडळ करमाळा अंतर्गत शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. न. प. मुला-मुलींची शाळा नंबर ४ या शाळेला वैयक्तिक स्पर्धेमध्ये सर्वाधिक बक्षिसे मिळाली. सांघिक खेळ क्रीडा संचलन द्वितीय, मोठा गट कबड्डी मुले उपविजेता, वैयक्तिक खेळ लहान गट लिंबू चमचा मुले आरुष संजय वाघमारे द्वितीय, संगीत खुर्ची लहान गट मुली आलीना अजहर काझी प्रथम, १०० मीटर धावणे मोठा गट मुले रोहन चरण चव्हाण द्वितीय, १०० मीटर धावणे आदित्य अमोल दगडे तृतीय, लिंबू चमचा मोठा गट मुली ऋतुजा करेप्पा वाघमारे प्रथम, संगीत खुर्ची मोठा गट मुली आराध्या सुरेंद्र बोकन प्रथम, सृष्टी पांडुरंग शिंदे मुली मोठा गट चमच्या लिंबू तिसरा, तीन पायाची शर्यत मोठा गट मुले रोहन चरण चव्हाण व श्लोक संदीप क्षीरसागर तृतीय, तीन पायाची शर्यत आदित्य दगडे व राजवीर रजपूत उत्तेजनार्थ. यामध्ये मुलांना ट्रॉफी चषक, सर्टिफिकेट व बक्षिसे मिळाली.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका चंद्रकला सतीश टांगडे, संतोष माने, बाळू, मुकुंद मुसळे, आसराबाई भोसले यांनी मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांचे मुख्याधिकारी सचिन तपसे, प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल दगडे, उपाध्यक्ष सुरेखा बोरा, शिक्षण तज्ज्ञ अंजली श्रीवास्तव यांनी कौतुक केले.



## विद्यार्थ्यांसाना इंगळे पॉलिटेक्निकचा आधार

### डॉ. विजय कोल्हे यांनी स्वामी समर्थांच्या दर्शनानंतर व्यक्त केल्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ डिसेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कै. कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निक हे तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी मोठे आधार असल्याचे मनोगत पुणे विभागीय कार्यालयाचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे उपसचिव डॉ.विजय कोल्हे यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी डॉ.विजय कोल्हे यांचा श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी डॉ.कोल्हे बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, मंदार महाराज पुजारी, प्राचार्य नागनाथ जेऊरे, उपप्राचार्य विजय पवार, जनगोंडा, सर, रविंद्र नष्टे, उमेश सोनवणे, खिलारी, चित्तरंजन अगरथडे आदीसह महाविद्यालयाचे अन्य स्टाफ व देवस्थानचे सेवेकरी उपस्थित होते.

## सात लाखांसाठी एकाचे अपहरण

### अनगर पाटीजवळील घटना; सात ते आठ जणांनी केले कृत्य

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ डिसेंबर-**

गांजाच्या केससाठी झालेल्या खर्चाचे ७ लाख रुपये दिल्याशिवाय सोडणार नाही, असे म्हणत पैसे जर नाही दिले तर त्याला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन ७ ते ८ लोकांनी कोयत्याचा धाक दाखवून जबरदस्तीने एकाचे अपहरण केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान अनगर पाटीजवळ घडली. या प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात अपहरण झालेल्या व्यक्तीच्या पत्नीने गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील ७ ते ८ महिन्यांपूर्वी राजकुमार बाळासाहेब घोलप (रा. तेलंगवाडी, ता. मोहोळ), आकाश बारटक्के, ऋषिकेश शिंदे व माळशिरस तालुक्यातील संगम येथील मिलिंद मोरे अशा चौघांविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे गांजाचा गुन्हा दाखल झाला होता. त्यामध्ये फिर्यादीचे पती राजकुमार घोलप व इतर लोकांना अटक झाली होती. सध्या ते सर्वजण जामिनावर बाहेर आहेत. त्यापैकी मिलिंद मोरे (रा. संगम, ता. माळशिरस) हा मागील काही दिवसांपासून राजकुमार घोलप यांना फोन करून केस दाखल झाल्यानंतर माझा ७ लाख रुपये खर्च झाला आहे, तो मला दे असे म्हणत होता. त्यावेळी राजकुमार घोलप यांनी आपल्या सगळ्यांचाच खर्च झाला आहे. माझेही त्यात नुकसान झाले आहे. आपण चर्चा करुन बघू असे म्हणत होते. परंतु मिलिंद मोरे हा ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. तो घोलप यांना वारंवार फोन करून पैशासाठी शिवीगाळ व दमदाटी करत होता. दि. २४ डिसेंबर रोजी राजकुमार घोलप व त्यांच्यासोबत त्यांचे चुलते राजकुमार विठ्ठल घोलप हे मिळून कार मधून मोहोळला कामानिमित्त आले होते. काम संपवून दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोघेही गावाकडे जात असताना अनगरपाटीजवळ दोन




काळ्या रंगाच्या गाड्या त्यांच्या कारला आडव्या आल्या. ते पाहून राजकुमार घोलप यांनी त्यांची कार अनगररोड कडे वळवली. त्यावेळी त्या दोन्ही गाड्यांनी त्यांचा पाठलाग करत त्यांच्या गाडीला गाड्या आडव्या लावून मिलिंद मोरे (रा. संगम, ता. माळशिरस) व ऋषिकेश शिंदे (रा. तेलंगवाडी, ता. मोहोळ) यांच्यासह इतर पाच ते सहा लोकांनी राजकुमार घोलप यांना कोयत्याचा धाक दाखवून जबरदस्तीने त्यांचे अपहरण केल्याची फिर्याद त्यांच्या पत्नी विद्या राजकुमार घोलप यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक केसरकर करीत आहेत.

# अवैध वाळू उपसा बंद करा

## आ. नारायण पाटील : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यात गेली काही दिवसांपासून उजनी जलाशय व सीना नदीतून अवैधरित्या उपसा सुरू आहे. दिवसेंदिवस या वाळू उपशाचे प्रमाण वाढत चालले आहे. हा वाळू उपसा तात्काळ बंद करावा अशी मागणी करमाळ्याचे आ. नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली आहे.

याबाबत आमदार नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, करमाळा तालुक्यातील उजनी धरणाकाठावरील वांगी, चिखलठाण, खातगाव, येथे वाळू उपसा अवैधरित्या सुरु असल्याच्या तक्रारी महसूल विभाग व माझ्याकडे येत आहे. गेल्या वर्षापासून करमाळा तालुक्यातील



सीना नदी, भीमा नदी व उजनी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू आहे. यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून तालुक्यातील रस्ते खराब होऊ लागले आहेत. तसेच सदर वाळू उपसा हा शासनाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता दिवसरात्र सुरु आहे. उजनी धरणातील लाखो ब्रास वाळू माफिया उचलत असल्यामुळे शासनाचा महसूल (रॉयल्टी) बुडत आहे.

पोलिस व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका माफियांना प्रोत्साहन देणारी असल्याची चर्चा आहे. अशा तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. वाळू माफिया साम, दाम, दंडासह लोकांना धमकावून, आर्थिक तोड-पाणी करून गावागावात दहशतीचे वातावरण करत आहेत.

गावातील सलोखा बिघडत चालला आहे. तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन परिसरात वाळू माफियांचा उघड वावर असल्याचे लोक खासगीत बोलत आहेत. अवैधरित्या वाळू उपसा करण्यासाठी वाळू माफीयांना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवरदेखील कारवाई करण्यात यावी. अवैध वाळू वाहतुकीमुळे करमाळा तालुक्यातील रस्ते खराब होत असून अपघाताचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शासनाचे रस्ते दुरुस्तीचा खर्च वाढत आहे. एका बाजूला उजनी पर्यटनासाठी शासन प्रयत्नशील असताना दुसऱ्या बाजूला पर्यावरणाचा ऱ्हास हे वाळूमाफिया करत आहेत

आजूबाजूच्या शेतकऱ्यांना वाळू उपसा करत असताना दमदाटी करणे, धम कावणे, जीवे मारण्याची धमकी देणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. तसेच वाळू उपसण्यावरून मागील काही दिवसांपूर्वी करमाळा तालुक्यात जीव घेणे हल्ले झाले आहेत. मात्र याबाबत पोलिस व महसूल अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतल्याचे दिसून येत नाही.

### महसूल बुडत आहे... रस्ते होताहेत खराब

विधानसभा निवडणूक झाल्यापासून माझ्याकडे वाळू उपसा सुरू असल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. वाळू उपशातून अनेक तंटे निर्माण होत आहेत. शासनाचा महसूल बुडत आहे. रस्ते खराब होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. या वाळू उपशाला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर देखील कारवाई झाली पाहिजे आणि हा वाळू उपसा बंद झाला पाहिजे. तसेच वाळूमाफियांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कारवाई करून उपसा बंद झाला नाही तर याबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार आहे.

**- आ. नारायण पाटील, करमाळा**

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# बदलत्या वातावरणामुळे द्राक्ष बागायतदारांमध्ये भितीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २६ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात गेल्या तीन-चार दिवसांपासून ढगाळ वातावरण असून अवकाळी पाऊस तसेच गारपिठीची शक्यता सांगितली आहे. तसा वातावरणात प्रचंड बदल जाणवत आहे.

अवकाळी पाऊस किंवा गारपीठ होण्याची शक्यता जास्त आहे. यामुळे द्राक्ष बागायतदार तसेच आंबा बागायतदार व शेवगा बागायतदार शेतकऱ्यांमध्ये सध्या चांगलेच भितीचे वातावरण पसरले आहे.

सध्या द्राक्ष बागांचे द्राक्षांचे सेटिंग सुरु आहे तर आंब्याच्या बागांना सध्या मोहोर निघत आहेत. यामुळे जर अवकाळी पाऊस किंवा गारपीठ झालीच तर मोहोर गळून पडून आंब्याच्या बागांचे नुकसान होणार असून आंबे कमी लागणार आहेत. त्यातील शेवटपर्यंत किती राहणार हा प्रश्न आहे तर शेवग्याची फुले गळून गेल्यामुळे त्यांचा उत्पादनावर परिणाम होणार आहे. यामुळे अवकाळी पाऊस पडो अगर गारपीठ होवो याचा फायदा न होता नुकसानच होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी सध्या मोठी धास्ती घेतली असून अवकाळी पाऊस किंवा गारपीठ होऊ नये म्हणून शेतकरी अक्षरशः देव पाण्यात घालून बसले आहेत. यंदा एकतर पावसाळ्यात पाऊस अतिशय कमी पडला आहे. यामुळे पाणी कमी आहे. काटेकोरपणे नियोजन करुन बागा किंवा इतर पिके जगवली आहेत. ती अवकाळी पाऊस किंवा गारपीठ यामुळे नुकसान होऊन जाऊ नयेत म्हणून शेतकरी बदलत्या वातावरणाकडे शेतकरी लक्ष ठेवून आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### मोहोळमधील लोटस इंग्लिश मीडियम स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे

**मोहोळ, दि. २६ डिसेंबर-**

येथील लोटस इंग्लिश मिडीयम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अविष्कार उत्साहाने संपन्न झाले. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यात नर्सरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी मराठी साहित्याची ओळख, आपल्या देशाचे रक्षण करणारे सैनिक, थोर क्रांतिकारक, मोबाईलचे दुष्परिणाम, खेळाचे महत्व, लेझीम, भारतातील वेगवेगळ्या राज्यातील गाणी तसेच महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांची रणनीती अशा विविध विषयांवर आधारित गाणी आणि नाटिकांचे उत्तम सादरीकरण केले. तसेच बालकलाकारांनी मनोरंजक गाण्यांचे नृत्यासह अत्यंत उत्साहाने सादरीकरण केले. दीपप्रज्वलन मोहोळच्या सहदिवाणी न्यायाधीश पी. एस. गोवेकर, तहसीलदार सचिन मुळीक, मुळीक, बीडीओ विशाल जमदाडे, पोलिस उपनिरीक्षक किरणकुमार पाटील यांनी दीप्रज्वलन केले. सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थिनी शिवांजली देशमुख, श्रीशा आदलिंगे आणि श्रुती देशपांडे यांनी केले. यावेळी नम्रता कुलकर्णी स्मिता गुमते, संस्थाध्यक्ष प्रा. नंदकिशोर देशपांडे, उपाध्यक्ष व्यंकटेश तथा दीपक देशपांडे, सचिव ॲड. अमोल देशपांडे, सहसचिव ॲड. अमित कुलकर्णी, संचालक दिलीप वाघमोडे, मुख्याध्यापिका केतकी देशपांडे उपस्थित होते.



### आदमापूरचे कृष्णा महाराज ढोणे यांनी घेतले श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि.२६ डिसेंबर-**

कृष्णा महाराज ढोणे, आदमापूर यांनी गुरवारी २६ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. ढोणे महाराज हे प्रसिध्द भाकणूककार असून, श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत.



### परिसरात स्वच्छता ठेवा, आजार टाळा : शिफा जमादार

**विजयपूर, दि. २६ डिसेंबर-**

स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध आहे, तुम्ही स्वच्छ असाल तर तुम्ही अनेक संसर्गजन्य आजारांशी लढा देऊ शकता आणि टाळू शकता, असे प्रतिपादन लाडली फाउंडेशन ट्रस्टच्या प्रभारी कुमारी शिफा जमादार यांनी केले. तिकोटा येथील सरकारी मुलांच्या शाळेत लाडली फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने तिकोटा, बबलेश्वर, ताजपूरच्या सरकारी शाळांच्या एसडीएमसी अध्यक्ष आणि सदस्यांसाठी स्वच्छता प्रशिक्षण आणि स्वच्छता किट वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. स्वच्छता तुमचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुधारते. स्वच्छ राहण्याचे अगणित फायदे आहेत. पिण्याच्या पाण्याची अपुरी स्वच्छता यामुळे अनेक आजार बळावतात आणि मृत्यू होतो. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वच्छ पाणी वापरण्याची सवय लावली पाहिजे. लाडली फाउंडेशन ट्रस्ट विजयपूर जिल्ह्यातील २१ सरकारी शाळांमध्ये नवीन अत्याधुनिक शौचालय बांधत आहे. याशिवाय विद्यार्थिनींना एक वर्षाच्या कालावधीसाठी सॅनिटरी पॅड मोफत दिले जात आहेत. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात २१ शाळकरी मुलांना ४००० स्कूल बॅगचे मोफत वाटप करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी एसडीएमसी अध्यक्ष तिप्पण्णा कोन्नूर होते. तिकोटा तालुका पंचायतीचे माजी अध्यक्ष विजुगौडा पाटील, पीकेपीएस तिकोटा उपाध्यक्ष हाजीभाई कोट्टलगी, लाडली फाउंडेशन ट्रस्टचे जिल्हा व्यवस्थापक युसूफ कोट्टाल, प्राचार्य वाय. बी. वालिकार, एस. एस. सालीमठ, हुसेनबाशा मुल्ला, बी. वाय. मेंडेगार, प्रीती पत्तार, सरिता चक्रसाली उपस्थित होत्या.

# तहसीलदारांची दांडी... शेतकऱ्यांची कोंडी

## मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयातील प्रकार; शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी वालीच नाही

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २६ डिसेंबर-**

येथील अप्पर तहसील कार्यालय शेतकऱ्यांसाठी असून अडचण नसून खोळंबा आहे. या कार्यालयात शेतीविषयक काम होत नसल्यामुळे नागरिकांना इतर कामासाठी दक्षिण तहसील कार्यालयाला हेलपाटे मारावे लागत आहेत. मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयात शेती रस्ते व इतर विषयासंदर्भात तक्रार केल्यानंतर त्याची वेळेवर दखल घेण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना हेलपाटे मारून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तहसीलदारांच्या गैरहजेरीमुळे शेतकऱ्यांना वारंवार शेतीम धील काम सोडून कार्यालयात ताटकळत बसावे लागत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.




मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयात ३८ गावांतील शेती नोंद, रस्ते, सातबारा दुरूस्ती, विविध दाखले, अवैध मुरूम उपशावर दंडात्मक कारवाई आदी कामे करण्यात येते. शेतीच्या रस्त्यांसाठी तक्रार केल्यानंतर लवकर निकाल मिळत नसल्यामुळे अनेक गावात भांडण तंटे वाढत आहेत. मंद्रुप तहसील कार्यालयाकडून सुनावणीसाठी बोलावले जाते. मात्र तहसीलदार नसल्यामुळे अनेकवेळा शेतकऱ्यांना हेलपाटे मारून परत जावे लागते. कार्यालयाला हेलपाटे मारूनही कामे होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. महसूल विभागाच्या निष्काळजीपणामुळे सातबारावर चुकीची नोंद झाल्याने दुरूस्तीसाठी कार्यालयात गेल्यानंतर उडवाउडवीची उतरे देण्यात येते. अवैध मुरूम उपशाबद्दल तक्रार केल्यानंतर दंडात्मक कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येते. सुनावणी लवकर घेण्यासाठी व पुढे ढकलण्यासाठी 'अर्थ'पूर्ण कामकाज होत असल्याचे सांगण्यात येते.

याबाबत तहसीलदारांकडे तक्रार केल्यानंतर पुराव्यासह इतर गोष्टी सांगून चालढकल करण्यात येत आहे. अनेकवेळा तहसीलदार कार्यालयात गैरहजर असल्याम ुळे वारंवार शेतकऱ्यांना कार्यालयाला चकरा माराव्या लागत आहेत. येथे कामकाज पाहणारी खासगी व्यक्ती असल्याने योग्य माहिती मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांची कामे खोळंबली आहेत. सुनावणी, निकाल व इतर दाखले मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांसह विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### तहसीलदारांनी दररोज कार्यालयात यावे

निवडणूक व अन्य कारणामुळे तहसीलदार मंद्रुप कार्यालयात येत नाहीत. शेतकऱ्यांना रस्ता व इतर सुनावणीसाठी बोलविल्यानंतर तहसीलदार नसल्याने शेतकऱ्यांना परत जावे लागते. तहसीलदारांच्या गैरहजेरीमुळे शेतकरी व विद्यार्थ्यांची अनेक महत्त्वाची कामे प्रलंबित असल्याने तहसीलदारांनी दररोज कार्यालयात उपस्थित राहणे गरजेचे आहे.

- **महादेव जकुणे,** तालुकाअध्यक्ष, संत सावता सेना

# समाज एकसंघ ठेऊन बौद्ध धम्माचे काम वाढवू

## आ. राजू खरे : टाकळी सिकंदर येथे बौद्ध धम्म परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ डिसेंबर-**

समाज एक संघ ठेवून बौद्ध धम्माचे काम वाढवायचे आहे. धम्म वाढला तर समाज एक संघ राहील, असे प्रतिपादन आ. राजू खरे यांनी केले.

टाकळी सिकंदर (ता. मोहोळ) येथे आयोजित केलेल्या बौद्ध धम्म परिषदेमध्ये आ. खरे बोलत होते. सरसाबाई भागवत सोनटक्के यांनी बौद्ध विहारासाठी २ एकर जमीन दान दिली आहे. त्या ठिकाणी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेचे उद्घाटन तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भंन्ते सुमेधजी नागसेन व इतर भंन्ते आणि आमदार राजू खरे यांच्या हस्ते करून बौद्ध धम्म परिषदला सुरुवात करण्यात आली. यावेळी अशोक स्तंभ लोकार्पण सोहळाही संपन्न करण्यात आला. खरे यांच्या पत्नी तृप्ती खरे यांनी भंन्ते यांना चीवर परिधान केले. राजू खरे पुढे बोलताना म्हणाले की, प्रस्थापित लोकांनी या तालुक्यामध्ये या समाजाला एकत्र येऊ दिले नाही. येणारा काळ खूप कठीण आहे म्हणून समाजाने निळा झेंडा खाली एकत्र येऊन या तालुक्यांमध्ये इथून पुढे २५ वर्ष आपल्या समाजाचा आमदार राहिला पाहिजे. मी बंडखोर वृत्तीचा म ाणूस आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी भीम शाहीर साहेबराव येरेकर यांच्या बुद्ध भीम गीताचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष टाकळीचे सरपंच नाना शाहू सोनटक्के होते. धम्म परिषदला मोठ्या संख्येने उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जागा अन् निधी देणार

२५ लाख रुपयांचा निधी या जागेवर वास्तू उभा करण्यासाठी देणार आहे तर या जागेचं सुशोभीकरण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून ५० लाख रुपयांचा निधी देणार आहे. या जागेवर २५ कोटींचे बुद्ध विहार उभा करू. तसेच भिख्खू संघाने मागणी केल्याप्रमाणे या जिल्ह्यामध्ये भिख्खू संघाला राहण्यासाठी ५ एकर जमीन देणार आहे.





# फक्त हौशी कलाकारांतर्फे मोहम्मद रफी यांना जयंतीनिमित्त आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ डिसेंबर-**

दि. २४ डिसेंबर २४ रोजी महान गायक स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त फक्त हौशी कलाकार यांनी गीतामधून आदरांजली देण्यात आली.

सदर कार्यक्रम हा हौशी कलाकार सदस्य गोविंद तापडिया यांच्या घोडे गल्ली, बार्शी या दुकानी पार पडला. यावेळी मेजर हिंगमिरे, सीए बालकिसन जाजू, अजय खंडेलवाल, रवींद्र मैंदर्गीकर, राहुल झोंबाडे, गोविंद तापडिया आणि सुनील फल्ले यांनी गीते सादर करुन कार्यक्रम भारदस्तपणे सादर केला. यामध्ये बालकीसन जाजू यांनी पत्थर के सनम, दोनो ने किया प्यार मगर आणि तारीफ करु क्या उसकी अशी गीते सादर केली. तसेच हिंगमिरे मेजर यांनी गुजरे है इश्क मे हम, तू मेरे सपनो की राणी बनेगी, गीते सादर केली. रवींद्र मैंदर्गीकर यांनी मुझे इश्क है तुम्ही से कहा चल दिये अशी गीते सादर केली. राहुल झोंबाडे यांनी छू लेने दो नाजूक होठो को आणि पत्ता पत्ता बुटा बुटा अशी गीते सादर केली.

अजय खंडेलवाल यांनी मै कही कवी न बन जाऊ, पुकारता हू, आपके हसीन अशी गीते सादर केली. गोविंद तापडिया यांनी आज मौसम बडा, बडी मस्तानी है अशी गीते सादर केली. सुनील फल्ले यांनी जॉन जानी जनार्दन, ओ मेरी मेहबूबा आणि नाम अब्दुल्ला है मेरा अशी गीते सादर केली. कार्यक्रमासाठी गोविंद तापडिया यांनी हॉल उपलब्ध करुन दिल्याबद्दल मेजर हिंगमिरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल झोंबाडे आणि सुनील फल्ले यांनी नियोजन केले होते.

# 'त्या' सुरक्षा रक्षकाचा मंदिर समितीतर्फे सत्कार, रोख बक्षीस

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ डिसेंबर-**

सुजित शेळवणे, मंडळाधिकारी टेंभुर्णी (ता.माढा) हे आपल्या कुटुंबासह रविवार दि.२२ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आल्यानंतर संबंधित महिला भाविकाच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाले होते. सदर दागिने दर्शनरांगेतील रक्षक ग्रुपचे सुरक्षा रक्षक आदित्य बाबर, यास आढळून आले व त्यांनी तात्काळ नियंत्रण कक्षात दागिने जमा केले त्यानंतर खात्री करून संबंधित भाविकास ते परत करण्यात आले होते. सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणाबद्दल मंदिर समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

आदित्य बाबर या सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणाबद्दल मंदिर समितीचे सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख-जळगांवकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मंदिर समितीच्या सदस्या ड. माधवी निगडे यांनी अभिनंदन करून १००० रुपये इतके रोख स्वरूपात बक्षिस दिले. सुरक्षा रक्षकाच्या प्रामाणिकपणा बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. याशिवाय, ड निगडे यांनी आज सकाळी मंदिर परिसराची पाहणी करून मंदिर परिसरातील अतिक्रमणाबाबत प्रशासनास सुचना करून, भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा करून देणेबाबत सुचित केले. त्यावर मंदिर सुरक्षा शाखा व नगरपरिषद पंढरपूर यांचेशी संपर्क करून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर परिसरात व मंदिराच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणात छोटे-मोठे व्यापारी यांनी अतिक्रमण केले होते. तसेच मोटारसायकली देखील लावण्यात येत असल्याने भाविकांना अडथळा निर्माण झाला होता. त्यावर प्रशासनाने मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमण दुर करून भाविकांचा मंदिर प्रदक्षिणा मार्ग सुलभ व जलद होण्यास मदत केल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.



# पंढरपूर येथे रविवारपासून दोन दिवसीय संगीत महोत्सव

## पं. विकास कशाळकर फाऊंडेशनतर्फे आयोजन; विदुषी गौरी पाठारे, पं. मुकुल कुलकर्णी, पं. संजय, पं. राजेंद्र कुलकर्णी यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ डिसेंबर-**

पं. विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूर यांचे वतीने शनिवार आणि रविवार दिनांक २८-२९ डिसेंबर रोजी आरती प्रांगण भक्ती मार्ग येथे सायंकाळी ६ वा. दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे अध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी, सचिव ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले.

गेल्या १३ वर्षांपासून अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी आणि नवोदित आणि ख्यातनाम गायक गायिका यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या फाऊंडेशनची स्थापना होत असताना या आधीही स्वरयज्ञा बरोबर ख्यातनाम गायक गायिका यांचे गायन आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या असतानाच कोरोना नंतर प्रथमच आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ख्यातनाम गायक गायिका आणि वादकांच्या उपस्थितीत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवात शनिवार (दि.२८ डिसेंबर) सायंकाळी ५:३० वाजता ख्यातनाम बासरीवादक पं. राजेंद्र कुलकर्णी यांचे बासरी वादन तबला साथ ऋषिकेश सुरवसे आणि पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे करणार असून दुसऱ्या सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम गायक संजय गरूड पुणे यांचे शास्त्रीय गायन होणार असून त्यांना तबला रोहन पंढरपूरकर आणि हार्मोनियम तुषार केळकर पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे करणार असून दुसऱ्या दिवशी रविवारी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे गायक पं. मुकुल कुलकर्णी यांचे गायन होणार आहे.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रसाद कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाणे, माधूरी जोशी, उदय उत्पात, एस. पी. कुलकर्णी, आण्णासाहेब सुरवसे, राजेश खिस्ते, स्वानंदी काणे, धनंजय मनमाडकर, प्रज्ञा कुलकर्णी तसेच विशेष सहकार्य सिध्देय पुरवत आणि तुकाराम कोळी यांचे मिळत आहे. संगीत प्रेमी अधिक परिश्रम घेत आहेत.

### यांची राहणार साथसंगत

तबला ऋषिकेश सुरवसे, हार्मोनियम श्रीरंग जाकी करणार आहेत तर दुसऱ्या सत्रात ख्यातनाम गायिका गौरी पाठारे यांचे गायन होणार आहे. त्यांना तबला साथ पुष्कराज जोशी तर हार्मोनियम साथ सुप्रिया जोशी करणार आहेत. पठारे यांच्या गायनाने या महोत्सवाची सांगता होणार असून दोन्ही दिवसांचे कार्यक्रम विनामूल्य आहेत.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अक्षरवेल मंडळाच्या अंकुर दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

धाराशिव येथे गेल्या २० वर्षां पासुन साहित्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या अक्षरवेल महिला साहित्य मंडळाने अनेक साहित्यिक उपक्रम राबविले असून अक्षरवेल साहित्य मंडळाची दिनदर्शिका हा सुद्धा एक चर्चेचा विषय आहे.

दरवर्षी विविध नात्यावर आधारित कवितांचा सहभाग असलेली दिनदर्शिका यावेळी बहीण या विषयावर आधारित असून यंदा सलग सातव्या (७)अंकुर दिनदर्शिकेचे प्रकाशन मुक्तांगण शाळा, समता नगर येथे नुकतेच उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण युवा कवयित्री पुरस्कार मिळालेल्या प्रसिद्ध कवयित्री पूजा भडांगे

उपस्थित होत्या. कवयित्री पूजा भडांगे यांनी मी मुळची बेळगावची असले तरी धाराशिवची सुन आहे व इथे अक्षरवेल मंडळ साहित्य विषयक जे विविध उपक्रम राबवत आहे, ते काम खूप प्रशंसनीय आहे, असे मत व्यक्त केले.

तसेच आपल्या अतिशय दर्जेदार कवितांचे सादरीकरण करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

डॉ. अनार साळुंके, कार्याध्यक्ष कमल नलावडे, उपाध्यक्ष स्नेहलता झरकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष डॉ. रेखा ढगे यांनी केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**परंडा, दि.२६ डिसेंबर -**

भारतीय राजकारणातील शिखर पुरुष, लोकनायक, विलक्षण नेतृत्व, दूरदर्शी, अमोघ वक्ते, अजातशत्रू, माजी पंतप्रधान, प्रेरणास्त्रोत, भारतरत्न, श्रद्धेय स्व. अटल बिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे अभिवादन केले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, उमाकांत गोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते, ॲड. भालचंद्र औसरे, रामकृष्ण घोडके, धनाजी गायकवाड, बाबासाहेब जाधव, साहेबराव पाडुळे, शिवाजी पाटील, परसराम कोळी, अजित काकडे, गजानन तिवारी, अमर ठाकूर, गौरव पाटील, सिध्दीक हन्नूरे, धनंजय काळे, तुषार कोळेकर, शुभम भातलवंडे तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यशराज हुंडेकरीस टेनिस स्पर्धेत कास्यंपदक

**जळकोट, दि.२६ डिसेंबर -**

देवास (मध्यप्रदेश) येथे पार पडलेल्या ६८ व्या राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील



जळकोट येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू यशराज हुंडेकरी यांने कांस्यपदक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. यशराज हुंडेकरी या खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेमध्ये कांस्यपदक मिळवल्याबद्दल खेळाडू विद्यार्थी व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे सहाय्यक संचालक अरवत, भोसले, राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष चव्हाण, आलियाबादचे सरपंच सूर्यकांत चव्हाण, प्रकाश चव्हाण, मुख्याध्यापिका आशा पवार, गुरव एन.एम., कारले के.बी. आदींनी अभिनंदन केले आहे. क्रीडा शिक्षक कोकाटे एस.एम., राठोड बी.बी. व हक्के बी.जी. यांचे मार्गदर्शन लाभले.



### नवोदय विद्यालयात वीर बाल दिवस साजरा

**तुळजापूर, दि.२६ डिसेंबर -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात गुरुवार दि.२६ डिसेंबर रोजी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या द्वारा मुघल साम्राज्याच्या अत्याचाराच्या विरोधात शहादत पत्करलेल्या साहेबजादा जोरावर सिंह व साहेबजादा फतेहसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावरती एस.डी. खोब्रागडे, सी.एस. गोमारे, व्ही.एस. राऊत, एच.जी. जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. अंकिता कदम या विद्यार्थिनीने आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी हरी जाधव यांनी केले. तसेच दिल्लीवरून आज प्रसारित झालेल्या बाल वीर पुरस्काराचे मानकरी यांचेही लाईव्ह कार्यक्रम विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

### पोलिस हक्क संरक्षण संघटनेच्या संपर्कप्रमुखपदी कल्पना गायकवाड

**नळदुर्ग, दि.२६ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड यांची अखिल भारतीय पोलिस हक्क संरक्षक



संघटनेच्या धाराशिव जिल्ह्याच्या महिला संपर्क प्रमुख म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे सर्वस्तरातुन स्वागत होत आहे. नळदुर्ग येथील कल्पना गायकवाड या राजकीय, सामाजिक क्षेत्रासह विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य मोठे आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय पोलिस हक्क संरक्षक संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे संघटक प्रविणभैय्या जाधव यांनी कल्पना गायकवाड यांची संघटनेच्या धाराशिव जिल्हा महिला संपर्क प्रमुख म्हणुन नियुक्ती केली आहे. कल्पना गायकवाड यांची अखिल भारतीय पोलिस हक्क संरक्षक संघटनेच्या धाराशिव जिल्ह्याच्या महिला संपर्क प्रमुख म्हणुन नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# नागपुर 'आयआयएम'कडून जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा

## ▶▶ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा पुढाकार : रोजगार, शाश्वत पाणी, उद्योग आणि पर्यटनला प्राधान्य...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

व्यवस्थापन शास्त्र विषयात जगभरात सर्वमान्य, देशातील चौथ्या आणि राज्यातील पहिल्या क्रमांकाची नावाजलेली संस्था अशी ख्याती असलेल्या नागपूर 'आयआयएम'कडून जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा तयार केला जाणार आहे. जिल्ह्याचा सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी निश्चित केलेल्या महत्वपूर्ण प्रकल्पात सुसूत्रता येऊन मोठी गती मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती, शाश्वत सिंचन व्यवस्था, उद्योगनिर्मिती आणि पर्यटन व्यवसायाला प्राधान्य दिले जाणार आहे. जगभरातील अनेक विद्यापीठांनी सर्वोत्कृष्ट अशी मान्यतेची मोहर उमटविलेल्या नागपूर आयआयएमची जिल्ह्याला मोठी मदत होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

आकांक्षीत जिल्ह्याचा विकास ज्याप्रमाणे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिप्रेत आहे. अगदी त्याचप्रमाणे तो साकारण्यासाठी जिल्ह्याचा एक व्यापक एकात्मिक विकास आराखडा अत्यावश्यक आहे. एकात्मिक विकास आराखड्यामुळे राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून भरीव निधीची उपलब्धता सहज शक्य होणार आहे.

जिल्ह्याचा आर्थिक आणि सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी यापूर्वीच आपण अनेक महत्वपूर्ण प्रकल्प आणि योजना निश्चित केल्या आहेत. त्या सर्व प्रकल्पाचे एकात्मिक पद्धतीने सुनियोजन करणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्याची भौगोलिक आणि नैसर्गिक वैशिष्ट्ये, बलस्थाने आणि उपलब्ध मनुष्यबळ या सगळ्या बाबींचा शास्त्रीय पद्धतीने विचार करून हा आराखडा तयार केला जाणार आहे. देशातच नव्हे तर अन्य देशातही व्यवस्थापन सल्लागार म्हणून कार्यरत असलेल्या नागपूर आयआयएम या विख्यात संस्थेने आपल्या जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यास अनुकूलता दर्शविली असून आपल्या सर्वांसाठी ही आनंदाची बाब आहे. तयार करण्यात आलेला हा एकात्मिक विकास आराखडा जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निती आयोग आणि केंद्र शासनाकडे सादर केला जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

आपल्या धाराशिव जिल्ह्याची भौगोलिक आणि नैसर्गिक बलस्थाने लक्षात घेऊन जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून प्राधान्यक्रमासह हा आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्यानुसार तातडीच्या, मध्यम व दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांसह जिल्ह्याच्या आर्थिक विकासाकरिता अत्यावश्यक असलेल्या महत्वपूर्ण बाबींचाही या आराखड्यामध्ये समावेश केला जाणार आहे.

रोजगार निर्मितीसाठी कौडगाव येथील औद्योगिक क्षेत्रात तांत्रिक कापड निर्मिती प्रकल्प व सोलार पार्कची निर्मिती, उस्मानाबादी शेळीचे संवर्धन व अनुषंगिक मूल्य वृद्धी, आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्ह्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील पाणी, मराठवाडा वॉटर ग्रीड, बंधारे दुरुस्ती, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्ग जलद गतीने पूर्ण करणे, जिल्ह्यात जागतिक दर्जाचे शैक्षणिक संकुल उभारणे, श्री क्षेत्र तुळजापूरसह जिल्ह्यातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा लक्षवेधी विकास या आणि यासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा या आराखड्यात समावेश करण्याचा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना एकत्रित करून जिल्ह्याचे मूलभूत वैशिष्ट्य केंद्रबिंदू मानून नागरिकांच्या आकांक्षा लक्षात घेऊन व्यापक सर्वांगीण विकास साध्य करणे हा यामागचा मुख्य हेतु आहे. आत्मनिर्भर भारत सारख्या व्यापक योजनेच्या माध्यमातून उस्मानाबादी शेळीचे संवर्धन व आनुषंगिक मूल्यवृद्धी असा प्रकल्प हाती घेवून त्यातूनही जिल्ह्याचा आर्थिक दृष्ट्या कायापालट होवू शकतो.

जिल्ह्याला लाभलेली वर्षभर स्वच्छ सूर्य प्रकाशाची नैसर्गिक देण योग्य पद्धतीने वापरुन मोठ्या प्रमाणात सौर उर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभारणे सहज शक्य होणार आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह विविध विभागांच्या प्रमुखांनी एकत्रित येऊन या आराखड्याचे प्रारूप तयार करणे अपेक्षित आहे.

त्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ अभ्यासकांसह नागपूरच्या आयआयएमचे मोठे सहकार्य होणार आहे. डॉ. पद्मसिंह पाटील साहेबांनी जिल्ह्याला सिंचन, वीज, रस्ते अश्या मूलभूत सोयीसुविधांच्या बाबतीत एक महत्वाच्या टप्प्यावर आणून ठेवले आहे.

त्याला अधिक समृद्ध करण्याची जबाबदारी आता आपली असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

आयआयएम नागपूर येथे २० हायटेक क्लासरुम आणि २४ प्रशिक्षण केंद्रे आहेत. शिवाय ४०० आसन क्षमतेचे कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात आले आहे. इंग्लंड, अमेरीका, कॅनडा, जपान, डेन्मार्क, फ्रान्स या देशातील जागतिक दर्जाच्या अनेक विद्यापीठांसोबत आयआयएमचे सहभागीत्व आहे. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट युनिर्व्हसिटी ऑफ लिले फ्रान्स, वेस्ट मिनिस्टर बिझनेस स्कूल, युनिर्व्हसिटी ऑफ वेस्ट मिनिस्टर इग्लंड, युनिर्व्हसिटी ऑफ मेमफीस, अमेरिका, इन्स्टिट्यूट मांइन्स टेलिकॉम, फ्रॉन्स, कोफेनहेगन बिझनेस स्कुल डेनमार्क, स्कूल ऑफ स्टॅटेजिक मॅनेजमेंट जपान आदी विद्यापींठासोबत आयआयएमचा सामंजस्य करार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन आणि व्यवस्थापनाचे काम इथे सातत्याने सुरू असते. आता आपपया धाराशिव जिल्ह्याचा एकात्मिक विकास आराखडा याच जागतिक दर्जाच्या संस्थेच्या माध्यमातून तयार केला जाणार आहे.

## 'रूपामाता' देवसिंगा (तुळ) युनिट क्र. ३ च्या ५१ हजार व्या गुळपावडर पोत्याचे पूजन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील उस उत्पादक शेतकऱ्याचा आपला उस पाठवण्याची चिंता या कारखान्यामुळे मिटली असून, वेळ व पैशाची बचत होत आहे. या शिवाय रूपामाता उद्योग समूहाने धाराशिव व बीड जिल्ह्यातील आपले दोन गूळपावडर कारखाने यशस्वीपणे सुरू केले आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव जिल्ह्यातील प्रसिद्ध उद्योजक अशोक जगदाळे यांची उपस्थिती होती, तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष रूपामाता उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.व्यंकटराव गुंड पाडोळीकर होते. या भागातील शेतकऱ्यांची अडचण व होत असलेली पिळवणूक लक्षात घेऊन आपण हा कारखाना सुरू केला असून, उसाला रु. २७०० भाव देण्यात येईल असे त्यांनी संगितले. यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपला उस रूपामाताला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन ॲड. गुंड यांनी यावेळी बोलताना केले.

कारखाना तालुक्याची कामधेनू करण्याचा मानस असुन नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेऊन यशस्वी वाटचाल चालु असुन ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतुकदारांसह कारखान्याच्या कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी कारखाना व्यवस्थापन कटिबद्ध असल्याचेही ॲड. गुंड यांनी सांगितले.

यावेळी परिसरातील मान्यवरांसह शेतकरी, अधिकारी, ऊस वाहतूक ठेकेदार, कर्मचारी, कामगार, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## वर्षभराची पगार दिली गावच्या विकासासाठी

### ▶▶ वागदरीच्या सरपंच तेजाबाई मिटकर यांचा आदर्शवत उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ डिसेंबर -**

नळदुर्ग (विलास येडगे) वागदरी ता.तुळजापुर येथील लोकनियुक्त सरपंच तेजाबाई शिवाजीराव मिटकर यांनी शासनाकडुन मिळालेला वर्षभराचा पुर्ण पगार गावच्या विकासासाठी दिला आहे. त्यांच्या या स्तुत्य निर्णयाचे सर्वच स्तरातुन कौतुक होत आहे.



साधारण वर्षभरापुर्वी वागदरी येथील ग्रामपंचायतची निवडणुक झाली होती. त्यावेळी मिटकर यांना सरपंच पदी व त्यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला ग्रामस्थांनी एक हाती विजयी केले होते. या विश्वासाला कुठेही तडा जाऊ न देता वर्षभरात कोट्यावधींची विकास कामे केली. ज्या कामाचे भुमिपुजन झाले तेच काम काही महिन्यातच उत्तम गुणवत्ते सह करून लोकार्पणही केले गेले. यामध्ये गावातील मुख्य सिमेंट रस्ता, स्मशानभुमीमध्ये पेव्हर-ब्लॉक, बंद पडलेल्या सहा हातपंपांची दुरुस्ती, दलित वस्तीतील व्यायाम शाळा, संपुर्ण गावातील भुमिगत नाली, मुस्लिम स्मशानभुमी रस्ता, ग्रामपंचायत, जि.प.शाळा येथील रंगरंगोटी, वृक्ष लागवड, संगणक कक्ष उभारणी, व्यासपीठ, वॉल कंपाऊंड, सिमेंट बंधारे, सौर ऊर्जा लॅम्प, गावातील सर्व सार्वजनिक टाक्यांना व घरातील नळांना मुबलक पाणी उपलब्ध करून देणे ही कामे पुर्ण केली गेली.


त्याचबरोबर ४४ लाखांच्या विहिरी, भीम नगर येथील १० लाखांचे सभागृह, ४७ लाखांची जलजीवन मिशन योजना ही कामे सुरू आहेत तर ग्रामदैवत भवानसिंग महाराज मंदिरासाठी पर्यटन विभागाकडुन १० लाखांचा निधी, प्रधानमंत्री-मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ते मंजूर झाले आहेत. विशेष म्हणजे पुणे येथील धरती डेव्हलपर्स च्या माध्यमातुन ६०० एकर जमिनीवरती सोलार प्लँट उभा राहत आहे.३०० एकर जमिनीचे संपादन झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती येईल.


याशिवाय मिटकर व त्यांच्या कुटुंबीयातर्फे तरुणींसाठी रांगोळी स्पर्धा, महिलांसाठी होम मिनिस्टर, गरजवंत शंभर भगिनींना साडी, दिवाळीतील शिधा- धान्य इत्यादी उपक्रम राबवले गेले. मिटकर यांचे सुपुत्र पोलीस प्राधिकरणाचे उमाकांत मिटकर यांनी चारधाम यात्रेसाठी दिलेले २५ हजार रुपये त्यांनी जिल्हा परिषद शाळेच्या सुशोभीकरणासाठी दिले.

### आठ महिन्यानंतर आली महावितरण कंपनीला जाग...

## 'तरुण भारत' ने आवाज उठवताच बलसुरच्या स्मशानभूमीचा काळोख दूर







**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२६ डिसेंबर -**

सार्वजनिक स्मशानभूमीच नव्हती तब्बल ३१ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर या पुनर्वसन गावासाठी स्मशानभूमी तयार करण्यात आली. परंतु या स्मशानभूमीला गेल्या सात-आठ महिन्याखाली वीज देण्यासाठी महावितरणकडून पोल रवण्यात आले होते. परंतु त्याला ताराच ओढण्यात आल्या नसल्याने दैनिक तरुण भारतच्या प्रतिनिधींनी महावितरण कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ दखल घेऊन तारा ओढण्याचे काम पूर्णत्वास नेले. तब्बल आठ महिन्यानंतर स्मशानभूमीतील काळोख दूर झाला आहे.

१९९३ मध्ये लातूर जिल्ह्यातील किल्लारीमध्ये झालेला भूकंप हा आजही संपूर्ण महाराष्ट्राच्या लक्षात आहे. या भूकंपात बलसुर गावात मोठी पडझड झाली होती. या किल्लारीच्या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या अनेकांना एकाच चितेवर अग्नी देण्यात आली होती. त्यानंतर या गावचे शासनाने पुनर्वसन केले. परंतु गावातील एखादी व्यक्ती मृत्युमुखी पडली तर त्याच्या चितेला अग्नी देण्यासाठी यापुढे स्मशानभूमीस अद्याप कंपाउंड वॉल घेण्यात आलेले नाही. पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली नाही, तात्पुरता का होईना आसरा ही करण्यात आलेला नाही. या सगळ्या बाबीकडे नागरिकांची प्रतिक्षा कायम आहे.

भूकंपानंतर या उभ्या देशाने कोरोना सारख्या महामारीचा सामना केला. त्यावेळेसही बऱ्याच ठिकाणी स्मशानभूमी नसल्याने किंवा जागा अपुरी पडल्याने सोयीप्रमाणे अंत्यसंस्कार करण्याची वेळ उद्भवली होती. त्याची पुनरावृत्ती होण्याची वाट न पाहता व नागरिकांची गैरसोय दूर करण्याकरिता प्रशासनाने व संबंधित कार्यालयाने अशा योजना प्रभावीपणे राबवून व पूर्णत्वास नेऊन मरणाऱ्याला तर सुखाने मरू द्यावे ही म्हण सार्थ ठरवावी.

तरुण भारत वृत्तपत्रामुळे महावितरणला तात्काळ जाग आली व स्मशानभूमीत गेल्या आठ महिन्यापूर्वी उभा केलेल्या पोलचा डोलाऱ्यास तारा बसवून स्मशानभूमीतील अंधार दूर झाल्याचे समाधान वाटते. तरुण भारतने अशाच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडावी. तरूण भारतने केलेल्या सहकार्यामुळे ग्रामस्थांच्या मी मनापासून आभार व्यक्त करते.

**- सरपंच अश्विनी भोसले**

## एसटी फेऱ्या पुर्ववत सुरु ठेवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर आगारातून सुटणाऱ्या व नळदुर्ग-अक्कलकोट फेऱ्या मारणाऱ्या एसटी बस तुळजापूर आगारातून वेळेत व नियमित सोडून शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान टाळावे व अबालवृद्ध, महिला, ग्रामस्थ यांना होणारा आर्थिक आणि मानसिक त्रासही कमी करावा, अशी मागणी भाजपा मेडीया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ, ग्रामस्थ व प्रवासी यांनी लेखी निवेदनाद्वारे राज्य परिवहन महामंडळाचे तुळजापूर आगार प्रमुख यांच्याकडे केली आहे.

याबाबत आगार प्रमुखांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, इ.१० वी, १२ वी, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे दिवस जवळ येत आहेत. इ. १० वी व १२ वीचे वेळापत्रक आले आहे. मात्र तुळजापूर अगाराच्या नळदुर्ग ते अक्कलकोट बससेवेचे वेळापत्रक बिघडल्याने एसटी बस सेवा ही विस्कळीत झाल्याने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, अबालवृद्ध, प्रवाशांना व महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वेळेत एसटी बस न आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

# निरपेक्ष भावनेने केलेले कार्य समाजासाठी आदर्श ठरते : ॲड. मिलिंद पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

कोणत्याही मान सन्मानाची अपेक्षा न ठेवता सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था या समाजासाठीचे खरेखुरे आदर्श आहेत, असे प्रतिपादन लोकसेवा समिती धाराशिव संस्थेचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील यांनी केले. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्रध्देय कै. अटलबिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीच्या निमित्ताने लोकसेवा समिती धाराशिव या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या लोकसेवा पुरस्कार २०२४ वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. याप्रसंगी लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, सचिव कमलाकर पाटील समितीचे सदस्य शेषाद्री डांगे, समितीच्या सदस्या सुषमा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमा पुजनाने व दीप प्रज्वलनाने झाली.

समाजात निरपेक्ष वृत्तीने कार्य करणाऱ्या परंतु प्रसिध्दी पासून दूर राहत समाजसेवेचे व्रत अविरतपणे सुरु ठेवणाऱ्या व्यक्तींचा व त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव म्हणून लोकसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्काराचे हे १५ वे वर्ष आहे. यंदाचे लोकसेवा पुरस्कार उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन व्यक्तींना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम अकरा हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, साडी, श्रीफळ, बुके असे आहे.

सन २०१४ साली स्थापन केलेल्या पसायदान या सेवा प्रकल्पाच्या माध्यमातून ढेकणमोहा (ता.जि. बीड) येथे अनाथ, भटके, वंचित, आत्महत्याग्रस्त शेतकरी व कैद्यांच्या मुलांसाठी शिक्षण व संस्कार देण्याचे महत्वपूर्ण कार्य गोवर्धन निवृत्ती दराडे गेल्या दहा वर्षांपासून अविरतपणे करत आहेत. एकूण ७५ गरजू मुलांच्या आयुष्याला आकार देण्याचे कार्य या प्रकल्पात केले जात आहेत. दराडे यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन लोकसेवा समितीच्या वतीने अत्यंत मानाचा असा लोकसेवा पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

श्री. तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संत तुकाराम गुरुकुलाच्या माध्यमातून लिखित पिंपरी (ता. परतूर जि. जालना) येथील रामकिसन काशिनाथ सोळंके हे मराठवाड्यातील दुर्गम भागातील गरीब, गरजू होतकरु मुलांसाठी वसतीगृहात शिक्षण व संस्कार देण्याचे काम करत आहेत.

विविध प्रकारच्या व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षण मुलांना देऊन कृतीशील शिक्षणाद्वारे मुलांमध्ये राष्ट्रभक्ती, स्वावलंबन व संस्कार देण्याचे कार्य सन १९९५ पासून सातत्याने केले जाते. सोळंके यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेत लोकसेवा समितीच्या वतीने त्यांना यंदाचा प्रतिष्ठेचा लोकसेवा पुरस्कार २०२४ देण्यात आला. नळदुर्ग (ता. तुळजापूर जि. धाराशिव) येथील मीराताई दत्तात्रय मोटे या सन २०१० पासून भटके विमुक्त समाजातील मसनजोगी, बेडा जंगम, वैदू, नाथपंथी, डवरी गोसावी, पाथरवट अशा वेगवेगळ्या १८ प्रकारच्या वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी पालावरची शाळा चालवितात. प्रेरणादायी कार्यामुळे दरवर्षी या पालावरच्या शाळेत १५० वंचित मुले शिक्षणाच्या प्रवाहात येतात. श्रीमती मोटे यांच्या या महत्वपूर्ण कार्याचा यथोचित सन्मान म्हणून यंदाचा मानाचा लोकसेवा पुरस्कार-२०२४ त्यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी सत्कारमूर्ती गोवर्धन दराडे, रामकिसन सोळंके व श्रीमती मीराताई मोटे यांनी आपले मनोगते व्यक्त करुन त्यांचे प्रेरणादायी कार्य समाजासमोर मांडले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेच्या छाननी समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ॲड. मुकुंद पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, समितीचे सदस्य शेषाद्री डांगे, समितीच्या सदस्या सुषमा पाटील यांचीही समयोचित भाषणे झाली. याप्रसंगी प्रास्ताविकात बोलताना लोकसेवा समितीचे सचिव कमलाकर पाटील यांनी लोकसेवा पुरस्कार देण्यामागची संस्थेची भूमिका विशद केली. लोकसेवा पुरस्कारासाठी विनय जकाती (गुलबर्गा), डॉ. अभय शहापूरकर (धाराशिव), माणिकराव टेंगरे (येवती), शंकर साठे (येवती), दयानंद राठोड (बावी) डॉ. मनिष देशपांडे (धाराशिव) या दात्यांनी आर्थिक सहकार्य केले.

प्रा. शशिकांत देशमुख यांनी 'जहाँ दिव्यता ही जीवन है' वैयक्तिक गीत सादर केले.

प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आज नारायणगाव येथे भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती उत्सव निमित्त भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा व डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार सोहळा भारतीय कृषक समाज, नवी दिल्ली संलग्न भारतीय कृषक समाज, महाराष्ट्र राज्य आयोजित आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान असलेले भारताचे पहिले कृषी राज्यमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती उत्सव सोहळा दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव, पुणे-नाशिक हायवे, ता. जुन्नर, जि. पुणे येथे आयोजन केले आहे.



डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्त भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा तसेच कृषी व उद्योगक्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कारांसाठी भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्य कमिटीने पुढील मान्यवरांची निवड केलेली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जलरत्न पुरस्कार डॉ. चंद्रकांत भोयर (नागपूर), कृषीरत्न पुरस्कार आकाशचंद्र मोतीसिंग गौरठाकुर (छ. संभाजीनगर), केशवराव गोपाळराव देशमुख (अकोला), मनिषा सुनिल पोटे (नाशिक), यज्ञेश वसंत सावे (पालघर) तसेच कृषीभूषण पुरस्कार बाळासाहेब बाबासाहेब पाटील (सांगली), दत्तात्रय बाबुराव घाडगे (सोलापूर), प्रा. रंगनाथ बाजीराव भापकर (अहिल्यानगर), मनोज जानरावजी जवजाळ (नागपूर), विजय भानुदास मुळे (ता. खटाव, जि. सातारा) तसेच उद्योगभूषण पुरस्कार सपना पंकज तायडे (अमरावती), राधिका रुपेश घाटगे (शिरूर, घोडनदी), अनुराधा राहुल काशिद (भोर, पुणे), रुपाली शेषराव गायकवाड (बुलढाणा), संतोष देवराव गादे (नेवासा, जि. शिर्डी) या निवड झालेल्या मान्यवरांना कार्यक्रमात पुरस्कार देण्यात येणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जयंती सोहळ्यासाठी भारतीय कृषक समाज राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्णबीर चौधरी, नवी दिल्ली व प्रभारी ज्योती सुरसे, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. सुभाष नलांगे, महिलाध्यक्षा स्वाती बोरीकर यांच्या उपस्थितीत हा जयंती, शेतकरी मेळावा व पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहेत. या कार्यक्रमात मनोज मंत्री, संचालक गिन्नी ॲग्रो प्रो.लि. नागपुर, लिंगराज पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष, भा.कृ. स. बेळगांव, अनिल मेहेर कृषीरत्न व कार्याध्यक्ष ग्रामोन्नती मंडळ नारायणगांव तसेच डॉ. प्रकाशसिंह रघुवंशी प्रगतशिल शेतकरी, वाराणसी या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे. तसेच भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्य यांनी ७ विभागांमध्ये जैविक ग्राम संकल्पना राबविण्याची ठरविली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रात प्रथम पुणे विभागाची निवड झाली असून पुणे विभागातील अहिल्यानगर जिल्ह्यातील जैविक ग्राम कासारे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर या गावाची निवड केली आहे. या जयंती सोहळा व मेळाव्यासाठी महाराष्ट्र राज्यातून एफ.पी.ओ., डॉ. पंजाराव देशमुख सेंद्रीय शेती गट, शेतकरी, महिला बचत गट, उद्योजक, युवा व युवती शेतकरी समुहगट मोठ्या संख्येने येणार आहेत.

तरी या कार्यक्रमासाठी उपस्थितीत राहण्याचे आवाहन भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. सुभाष नलागे व प्रभारी ज्योती सुरसे व महिला अध्यक्ष स्वाती बोरीकर यांनी केले आहे.

## व्यापारी महासंघाच्या नवीन सभासद नोंदणीस सुरुवात

### जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

धाराशिव शहरामध्ये गेल्या ५० वर्षापासून व्यापार्यांच्या प्रश्नांसाठी झगडणारी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाने धाराशिव शहरात नवीन सभासद नोंदणीस सुरुवात केली आहे. सदर सभासद नोंदणीस व्यापारी बांधवांचा प्रतिसाद मिळत आहे. धाराशिव शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी सभासद नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी केले आहे.

जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव म्हणाले की, धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघ हा राज्य पातळीवर व देशपातळीवर काम करणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड ॲग्रीकल्चर व देशातील सर्वोच्च व्यापारी संघटना कॉफिडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स अर्थात कॅट या संघटनांशी संलग्नित आहे. जिल्हा व्यापारी महासंघ धाराशिव शहरासह जिल्ह्यातील परंडा, भूम, वाशी, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग, लोहारा, मुरुम, उमरगा तालुक्यामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून कार्यरत आहे.

सध्या धाराशिव शहरामध्ये सन २०२५-२६ या दोन वर्षासाठी सभासद नोंदणी सुरु करण्यात आलेली आहे. दोन वर्षासाठी नाममात्र सभासद शुल्क पाचशे रुपये ठेवण्यात आलेले आहे.

यासोबत व्यापारी महासंघाचा बोर्ड देखील देण्यात येणार आहे. सध्या देशपातळीवर कॅटच्या माध्यमातून ७ कोटी व्यापारी सभासद झालेले आहेत.

तरी व्यापारी बांधवांनी नवीन सभासद नोंदणी करुन घ्यावी, असेही जिल्हाध्यक्ष जाधव यांनी कळविले आहे.

## ग्रंथपालन वर्गास एक जानेवारीपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ डिसेंबर -**

ग्रंथालय संचालनालय मुंबई संचलित ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या सन २०२५ च्या तुळजापूर येथील केंद्रात प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून बारावी उत्तीर्ण असलेल्या इच्छुकांनी आपले अर्ज सादर करावेत. सदरील अभ्यासक्रम सहा महिन्याचा असून आठवड्यातून शनिवार व रविवार अशा दोन दिवस तासिका होणार आहेत.

ग्रंथपालन वर्ग १ जानेवारी २०२५ पासून नियमितपणे सुरू होतील. वर्गाचा कालावधी १ जानेवारी ते ३० जुन २०२५ असा आहे. सदर वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी ग्रंथपालन वर्ग व्यवस्थापक यांच्याजवळ ३० डिसेंबर पर्यंत

विहित नमुन्यात अर्ज भरून सोबत बारावी उत्तीर्ण गुणपट, टीसी, आधार कार्ड सत्यप्रत व तीन

पासपोर्ट फोटो तसेच जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असलेल्या अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

प्रवेशासाठी संपर्क ग्रंथमित्र व.ग. सुर्यवंशी पर्णकुटी शुक्रवार पेठ,

ग्रंथपाल सुरेश जोशी विजय वाचनालय, हनुमंत भुजबळ य.च.

महाविद्यालय, विनायक मस्के तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर,

ग्रंथपाल सुयश जोशी नगर वाचनालय धाराशिव यांच्याशी संपर्क करावा असे आव्हान जिल्हा ग्रंथालय संघाच्यावतीने ज्ञानेश्वर पाटील यांनी केले आहे.

## शहापूर शाळेची शैक्षणिक सहल संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ डिसेंबर -**

तालुक्यातील शहापूर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची शैक्षणिक सहल समृद्ध कोकण पर्यटनासह पश्चिम महाराष्ट्रात विविध तीर्थक्षेत्र आणि निसर्ग सौंदर्य पाहत १९ ते २३ डिसेंबर दरम्यान संपन्न झाली.

शालेय विद्यार्थ्यांना महाराष्ट्र भूमीतील भौगोलिक विविधता अभ्यास शिकत असताना प्रत्यक्ष पाहता यावा याउद्देशाने विद्यालयाचे मुख्याध्यापक अमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहलीचे आयोजित केली होती. स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्यासह मुरुड जंजिरा किल्ला, महाड येथील चवदार तळे,श्रीवर्धन बीच, शिखर शिंगणापूर, गोंदवले मठ, वाईचा गणपती, महाबळेश्वर, पाली येथील बल्लाळेश्वर गणपती, केतकावळी येथील प्रतिरूप बालाजी, जेजुरी खंडेराया, मोरगाव येथील गणपती दर्शन घेऊन पंढरपूर, सोलापूर मार्गे शहापूर येथे सुखरूप विद्यार्थी पोहोचले.

या सहलीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक अमीर शेख, विकास जोत, पठाण युनुस शेरखाँ, स्वाती गायकवाड, प्रल्हाद काळे, कविता मानकरे, वैशाली सुरवसे, एसटीचे चालक मस्के, आकाश गोरे आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## हातलादेवी मंदिर परिसरात बांधलेल्या कठड्याची नासधूस करणाऱ्या समाजकंटकांवर गुन्हा दाखल करा




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

धाराशिव शहराच्या पश्चिमेस असलेल्या हातलादेवी मंदिर परिसरात नागरिकांना बसण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कठड्यांची अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड करुन नासधूस केली आहे. त्यामुळे मंदिर परिसराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण झाले असून भाविकांसह धाराशिवकरांमधून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. बुधवार, दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना हा प्रकार निदर्शनास आला आहे. याबाबत धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात समाजकंटकाविरोधात तक्रार देण्यात आली आहे.

हातलादेवी मंदिराच्या डोंगरावर भाविकांसह पर्यटक देखील मोठ्या संख्येने दररोज येतात. स्थानिकांच्या पुढाकारातून नागरिकांना बसण्यासाठी हातलादेवी मंदिर परिसरात ठिकठिकाणी कठडे बांधण्यात आलेले आहेत. परंतु अज्ञात समाजकंटकांनी या कठड्यांची तोडफोड केली आहे. त्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्या आहेत. असे समाजविघातक कृत्य करणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी. तसेच अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरुन यापुढे असे कृत्य करण्याचे धाडस कोणी करणार नाही, अशी मागणी सुधीर रामेश्वर पवार यांनी केली आहे.

यावेळी आकाश नरोटे, सलीम पठाण, जफर शेख, कुंदन शिंदे उपस्थित होते.

## धाराशिव शहरातील अंबिका वडा पाव सेंटरवर धाड

### दोन बालकामगारांची सुटका, मालकावर गुन्हा दाखल...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

जिल्ह्यातील बालकामगार प्रतिबंध आणि नियमन अधिनियम १९८६ अंतर्गत जिल्हा कृतीदल बालकामगार समितीच्या वतीने दि.२४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.४५ वाजता येडशी रोडवरील अंबिका वडा पाव सेंटर येथे धाडसत्र राबविण्यात आले.

सदर कारवाईत वयस्कर मालक शंकर ढेकळे यांच्या आस्थापनेवर दोन बालकामगार काम करत असल्याचे आढळून आले.

त्वरित उपाययोजना करत, या बालकामगारांना जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी यांच्या समन्वयाने जिल्हा बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले.

सदर प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात शंकर ढेकळे यांच्या विरोधात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे. या धाडसत्रात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, चाईल्ड लाईन धाराशिव, धाराशिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पोलीस अधिकारी, आणि युवा ग्राम विकास मंडळ धाराशिव यांच्या अस्सेस टू जस्टीस प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. आरोग्य विभागाचे प्रतिनिधी देखील या कारवाईत उपस्थित होते.

सदर कारवाईत सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांनी पुढाकार घेतला.

## महेंद्र धुरगुडे यांच्या वतीने अजित पवार यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

धाराशिव जिल्हा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांनी (दि.२४) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेतली.

महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच महायुती घवघवीत यश मिळाल्याबद्दल व अजितदादा यांची पुन्हा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्यावतीने भेट घेऊन सत्कार व अभिनंदन करण्यात आला.

## वाढदिवसाच्या बॅनरवर फोटो का टाकला नाही म्हणून मारहाण करून केला पाय फ्रॅक्चर

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कल्याणनगर येथे एकाच गल्लीतील राहणारे मित्र यांनी दुसऱ्या मित्राच्या वाढदिवसाच्या बॅनरवर माझा फोटो का टाकला नाही म्हणून एका जनाला जबर मारहाण केली.फिर्यादि विकास संजय शिंदे (वय २२) व्यवसाय मजुरी रा. कल्याणनगर बिडकीन याला सचिन संजय जाधव व विजय जगधने या दोघांनी सकाळी सात वाजेच्या सुमारास घरून सचिन याच्या दुचाकीवर बसून नेले व आपल्याला सुभाषभाऊ जाधव यांचे वाढदिवसाचे बॅनर लावायचे आहे असे म्हणून डीएमआयसी मधील शिवनाई रोडवर घेऊन जाऊन तिथे चिंचेच्या झाडाजवळ रोडच्या खाली नेऊन तू माझा फोटो सुभाषभाऊच्या बॅनर वर का टाकला नाही. असे म्हणून विकासच्या दोन्ही पायांवर लाकडी दांड्याने बेदम मारहाण करून गंभीर दुखापत करून उजवा पाय फ्रॅक्चर केला . व चापट बुक्यांनी मारहाण केली म्हणून बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोहेका संदीप धनेधर करीत आहे.

## एस.टी.बस चालकाला चारचाकी वाहनचालकाने केली मारहाण ! हतनुर टोल प्लाझा येथील घटना

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ डिसेंबर - हतनुर टोल प्लाझा येथे एस.टी बस चालकाला चारचाकी चालकाने मारहाण केल्याची घटना घडली आहे, तुळजापूर धुळे एस.टी. महामंडळाची बस क्र.एम. एच.१३ सी.यु.७३८० छत्रपती संभाजीनगर वरून प्रवाशांना घेऊन धुळेच्या दिशेने जात होती तर पाठीमागून येणारी चारचाकी क्र. एम.एच.१५ एफ.टी.०४३० च्या चालकाने हतनुर टोल प्लाझा येथे बस येताच अचानकपणे चालक जगन्नाथ गुळवे वय ४० वर्षे व वाहक राजेश चाटे वय ३८ वर्षे यांना मारहाण केली अचानक घडलेल्या या घटनेमुळे काही काळ प्रवाशांसह चालक वाहक गोंधळात पडले, ऐनवेळी प्रवाशांनी सोडवासोड केल्याने वाद टळला,वाद होण्याचं नेमकं कारण काय आहे हे मात्र कळू शकले नाही.

## वीरबाल दिवस जि. प. शाळेत उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी शहरातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून वीरबाल दिवस साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यां चांगला अभ्यास करावा प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे गुण असतात कोणी कलेमध्ये प्राविण्य मिळू शकतो कोणी खेळामध्ये प्राविण्य मिळू शकतो कोणी चांगल्या स्पर्धे परीक्षा देऊन चांगल्या पदावर ऑफिसर होऊ शकतो यावेळी विद्यार्थ्यांना चांगला अभ्यास करण्यासाठी वही व पेन भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने वाटप करण्यात आले. यावेळी, भारतीय जनता पार्टी खुलताबाद तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, विर बाल दिवस जिल्हा सहसंयोजक सतिश दांडेकर, शहराध्यक्ष परसराम बारगळ, ,, माजी नगरसेवक योगेश बारगळ. सोनु भावसार, विजय चंडवाडे, अनिल करपे, बबन वर्दे, शंकर अंभोरे, गणेश सावजी, गणेश झुरावत , निलेश गायकवाड, काकासाहेब गायकवाड,मुख्याध्यापक शेख, गायकवाड मॅडम, तसेच पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## बिडकीन भगवती विद्यालय मध्ये बाल वीर दिवस मोठ्या उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ डिसेंबर : पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, येथे मोठ्या उत्साहात बालवीर दिवस साजरा करण्यात आला. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासंकल्पनेतून किशोरवयेन मुळामध्ये मनोसांवर्धन करणे, श्रजनशीलता वाढवणे या हेतूने भारताच्या भवितव्याचा पाया असलेल्या बालकाला सन्मानित करण्यासाठी राष्ट्रीय वीर बालदीन साजरा करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ राशीनकर यांनी बालवीर जोरावर सिह व फतेहसिह यांच्या प्रतिमेस पुस्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात केली. या प्रसंगी प्रशालेत निबंध, चित्रकला, कथाकथन व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. मु अ नीं या वीर योध्याच्या जीवनावर सर्वांना मार्गदर्शन केले. कार्क्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे सर यांनी केले तर आभार श्रीधर जऱ्हाड यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुशाल चव्हाण, रावभान रकते, सुनील पवार, आप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, बंडू दुबे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले.

## जिजाऊ जयंतीच्या अध्यक्षपदी राजू पाटील बोंबले



तभा वृत्तसेवा

पैठण दि २६:राजमाता जिजाऊ जयंती उत्सव समिती पैठणच्या अध्यक्षपदी राजू बोंबले यांची निवड करण्यात आली.१२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने मंगळवारी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर या ठिकाणी सकल मराठा समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ही एकमताने निवड बोंबले यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीला सकल मराठा समाजाचे पवन शिसोदे,अनिल राऊत,किशोर सदावर्ते,साईनाथ कर्डिले, गणेश पवार, महेश पवार, हरीभाऊ शेळके सुभाष नवथर अंकुश काळे सचिन

## अ. भा. किसान सभेच्या शेतकरी महिला परिषदेत महिलांच्या हक्कासह १७ मागण्यांची सनद पारित

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने नाशिक येथे गुरुवारी, २६ रोजी महाराष्ट्र राज्य शेतकरी महिला परिषद घेण्यात आली.

कॉ. गोदावरी परुळेकर सभागृहात पार पडलेल्या या परिषदेत महिलांच्या हक्क आणि मागण्यांची सनद सर्वानुमते पारित करण्यात आली.





१. शेतकरी महिला व शेतकरी कुटुंबाला त्यांच्या कष्टाचे रास्त दाम मिळावे, यासाठी भयावह देशव्यापी कृषी अरिष्टाला पायबंद घाला. याकरीता हे कृषी अरिष्ट निर्माण करणारी धोरणे राबविणे तातडीने बंद करा. कृषी अरिष्ट दूर करण्यासाठी कॉर्पोरेट लुटीला लगाम लावा. विविध उपाय करून शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी करा. शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के भावाची कायदेशीर हमी द्या. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतीमालाला रास्त भरपाई द्या. २. शेतजमीन, मालमत्ता व घरांच्या मालकी हक्कात महिलांना समान वाटा द्या. मालकी जमीन, राहते घर, घरांच्या तळ जमिनी व नावे नसणाऱ्या, पण ताब्यात असलेल्या जमिनींच्या मालकी उताऱ्यावर पुरुषांसह महिलांच्याही हक्कांची समान प्राधान्याने नोंद करा. त्यासाठी आवश्यक ते कायदेशीर बदल करा. ३. शेतीत श्रम करणाऱ्या महिलांना उत्पन्नात व मजुरीत पुरुषांइतकाच समान वाटा व हक्क द्या. रोजगार हमीसह सर्व प्रकारच्या मजुरींमध्ये समान कामाला समान वेतन द्या. दुय्यम वेतन दर्जा व मोफत श्रमसक्तीद्वारे होणारी महिलांच्या श्रमाची लूट थांबवा. ४. महिलांना आरोग्य अधिकार, योग्य पोषण, शिक्षण, रोजगार, घरपोहोच पाणी, स्वस्त इंधन व घरोघरी स्वच्छता गृह असण्याचा हक्क द्या. ५. महिलांचे शेती व शेती संलग्न व्यवसायातील श्रम कमी व सुसह्य व्हावेत यासाठी औजारे व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विशेष धोरण, संशोधन, प्रशिक्षण व प्रयत्नांना चालना द्या. ६. मायक्रो फायनान्स, बचत गट इत्यादी कर्जांच्या जाळ्यातून महिलांची शासकीय उपायांद्वारे सुटका करा. ७. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांना उत्पन्नाची हमी देणारे सहाय्य, विविध कल्याणकारी योजनांचे लाभ व तत्काळ किमान ५ लाख रुपये अर्थसहाय्य द्या. ८. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करा. महिलांसाठी सर्वत्र सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी ठोस उपाय अमलात आणा. ९. एकल महिलांचे हक्क, सहाय्यता व सबलीकरणासाठी राज्यात स्वतंत्र विभागाची स्थापना करा. १०. दारू व व्यसन मुक्तीचे मूलगामी धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करा. ११. हुंडा, भृणहत्या, अंधश्रद्धा, बालविवाह, धर्मांधता व जातीयवाद यासारख्या समस्या व कुप्रथा दूर करण्यासाठी ठोस उपाय करा. समाजात स्त्री–पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकी विचार रुजविण्यासाठी विशेष धोरण घ्या. १२. अन्नसुरक्षेला प्राधान्य देणारी पर्यावरणकेंद्री पीक रचना, कृषी धोरण व व्यापार धोरणाचा अवलंब करून सर्व प्रकारचे कुपोषण संपुष्टात आणण्यासाठी उपाय करा. १३. महिला शेतकरी व महिला शेतमजुरांना प्रतिमाह किमान ५०००/- रुपये वृद्धापकाळ पेंशन द्या. १४. विधवा, परित्यक्त्या, वृद्ध, अपंग, निराधारांना सामाजिक अर्थसहाय्य विशेष योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करून ते किमान प्रतिमाह ५०००/- रुपये करा. सामाजिक अर्थसहाय्य विशेष (निराधार) योजनेच्या लाभार्थींना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याची अट रद्द करा. १५. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी वर्गाला आरोग्य, पोषण व शिक्षणविषयक मूलभूत सेवा देणाऱ्या योजना कायम करा व त्यामध्ये काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कामगार आदींना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, वेतनश्रेणी व सामाजिक सुरक्षा लागू करा. १६. महिलांचे शेतीसंबंधी पारंपारिक ज्ञान, कौशल्य व नैसर्गिक संसाधनांवरील मालकीचे कॉर्पोरेट लुटमारी पासून रक्षण करा. १७. महिलांच्या संविधानिक अधिकारांचे रक्षण करा.

## अल्पवयीन मुलीला आणले कर्नाटकातुन कन्नड शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.२६ डिसेंबर – शहरातील चौदा वर्षीय अल्पवयीन पीडितेचे अपहरण करणाऱ्या आरोपी व पीडितेला कर्नाटक राज्यातून कन्नड शहर पोलिसांनी परत आणले आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील बडा बंगला परिसरातील पीडितेला आरोपी किरण कडुबा मोरे वय २९ वर्षे रा.दाभाडी याने दि.१४ रोजी पीडितेचे अपहरण करून कर्नाटक राज्यातील गोगी तालुका शहापूर, जिल्हा यादगीर येथे घेऊन गेला,अल्पवयीन







पीडिता बाजारात खरेदीसाठी गेली असता परत आलीच नसल्याने कुटुंबातील सदस्यांनी तिची शोधा शोध सुरू केली पण अल्पवयीन पीडिता कुठेच मिळून आली नसल्याने पीडितेच्या आईने नातेवाईकांसह कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये धाव घेतली दि.१४ रोजी कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून सहायक फौजदार बी.एम.पवार यांनी अपहरणाच्या गुन्हांची नोंद घेतली,

सदर घटनेचा तपास पोलिस निरीक्षक आर.वी.सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके यांच्याकडे देण्यात आला तपास हाती येताच पोलिस उपनिरीक्षक चांद मेंडके,पोलीस अंमलदार विजय चौधरी यांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवत अखेर दि.२४ रोजी खबऱ्या मार्फत तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध लावला दि.२५ रोजी गोगी येथून आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

या पथकात पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके,पोलिस अंमलदार विजय चौधरी, महिला पोलिस अंमलदार सुनीता गोरे यांनी सदर कामगिरी बजावली आहे, आरोपीविरोधात कन्नड शहर पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळांना पटसंख्येची लागली घरघर !

तभा वृत्तसेवा-सहयोग प्र.जावळे

कन्नड दि.२६ डिसेंबर : तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना विद्यार्थी संख्येअभावी घरघर लागली असून गेल्या तीन वर्षात तालुक्यातील १७ प्राथमिक शाळा बंद झाल्या आहेत. तसेच सद्यस्थितीत ३० प्राथमिक शाळांमधील पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा कमी असून यातील १२ प्राथमिक शाळांमधील पटसंख्या १० आणि त्यापेक्षा कमी असल्याने या शाळा रेड झोनमध्ये आल्या आहेत.

तालुक्यातील काही जिल्हा परिषद शाळांची स्थिती चांगली असली तरी काही शाळा संकटात असल्याचे दिसून येत आहे. कन्नड तालुक्यात तर अशीच काहीशी स्थिती दिसुन येत आहे.

'विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी झालेल्या शाळा या बहुतांशी वस्तीशाळा आहेत. या वस्त्यांवरील विद्यार्थी संख्या घटल्याने विद्यार्थी नाहीत. तर मोठ्या गावाजवळील शाळेमधील विद्यार्थ्यांना एकतर संस्थेच्या अथवा इंग्रजी शाळेत शिकविण्याची पालकांची मानसिकता कारणीभूत आहे.

गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार कन्नड तालुक्यातील १७ जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थी नसल्याने गेल्या ३ वर्षात बंद पडल्या आहेत,

या शाळांमधील विद्यार्थी संख्या घटल्याने नाइलाजाने या शाळांना कुलूप लावून येथील कार्यरत शिक्षकांना इतर शाळांमध्ये समायोजित करावे लागले. शिवाय आता आणखी १२ शाळांमधील पटसंख्या १० पेक्षा कमी आहे. परिणामी या शाळा आपसुकच बंद पडण्याच्या मार्गावर आहेत .याकडे शिक्षण विभागाने गांभीर्याने लक्ष नाही दिले तर जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती फारच वाईट होणार आहे असे चित्र दिसत आहे

.

गतवर्षीच्या तुलनेत पुन्हा विद्यार्थी घटले

जि.प.च्या शाळांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी काही शाळांमधील विद्यार्थी संख्या घटली आहे. प्रत्येक वर्षी विद्यार्थी संख्या कमी का होत आहे? याचे शिक्षण विभागाने आत्मचिंतन करायला हवे आहे.

शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी आहे. परिणामी या शाळांकडेही वर्षभरात लक्ष दिले नाही तर या शाळाही रेड झोनमध्ये येऊन बंद पडू शकतात.

**या बारा शाळा दहा पेक्षा कमी पटसंख्या असल्याने रेड झोन मध्ये आल्या आहेत.**

(औराळा) जी प निकम आहेर वस्ती ८, (चिकलठाण) महात्मा फुले ५, (देभेगाव) अंतापूर ९, (करंजखेड) शिपघाट ५ , हिवरावाडी ६, (नाचनवेल ) मोहरावाडी २, धनगरवाडी शाहू टाकळी ४, कोपरवेल ५, माळोबाई आडगाव ५, (नागापूर) आंबेगाव ४, (पिशोर) कन्या शाळा शेफेपुर ५, (शेलगाव) भिलवाडी ५

**२० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची यादी केंद्रसात केंद्र**

(औराळा) जी प कविटखेडा ११, (बहिरगाव) म्हस्के वस्ती १३, भाट्या मारुती १६, (चापानेर) रामनगर २०, (चिकलठाण) गोकुळवाडी १४, घुसूर तांडा १८, साळेगाव २०, (चिंचोली ली) तरल वस्ती १२, (देभेगाव) लव्हाळी १५, (कन्नड) ब्राम्हणी १२, (नाचनवेल) बौद्ध वाडी १२, मोहाडी १९, राजपूतवाडी सारोळा २०, (नागापूर) आदिवासी खोरा ११, पुरणवाडी १४, (शेलगाव) दिगाववाडी १५ , वाल्मिकनगर १७ , (विटा) भोजने वस्ती १४ या १८ शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० किंवा त्यापेक्षा कमी आहे. परिणामी या शाळांकडेही वर्षभरात लक्ष दिले नाही तर या शाळाही रेड झोनमध्ये येऊ शकतात.

## बँकेच्या फिल्ड ऑफिसरने महिला बचत गटाच्या दीड लाख रुपयांचा केला अपहार

छत्रपती संभाजीनगर : महिला बचत गटाच्या महिलांनी दिलेले कर्जाचे हप्ते स्वतःच्या बँक खात्यात वळवून फील्ड ऑफिसरने १ लाख ५५ हजार रुपयांचा अपहार केला. हा प्रकार जय बालाजी अर्बन को-ऑप. सोसायटीत घडला. याप्रकरणी आरोपीवर सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रदीप शाल्मोन साठे (वय ३४) रा. प्लॉट नंबर ४/१६ / ११० मिल कॉर्नर, कोतवालपुरा संभाजीनगर असे आरोपीचे याप्रकरणी बँकेचे मॅनेजर छत्रपती नाव आहे. सुधाकर बाबुराव अन्नदाते रा. पवननगर सिडको यांनी फिर्याद दिली.

फिर्यादीनुसार, आरोपी प्रदीप साठे हा बालाजी अर्बन को-ऑप सोसायटीच्या टि.व्ही. सेंटर येथील शाखेत जानेवारीपासून फिल्ड ऑफिसर म्हणून काम करत होता. त्याच्याकडे मुकुंदवाडी, करमाड, शेंद्रा, कुंभेफळ, चिकलठाणा, रामनगर, संजयनगर, अंबिकानगर या भागातील महिला बचतगटाना कर्ज वाटप करणे व वसुली करणे अशी कामे होती. ५ नोव्हेंबर रोजी बचतगट खातेदार व कर्जदारांच्या तक्रारी आल्या. रामनगर येथील महीला बचतगट केएमबीजी २७१, एमबीजी २६०, एमबीजी २४६, एमबीजी २६४ यांनी वेळोवेळी आपल्याकडील कर्ज हप्ता शाखेत नियमीत पणे भरण्यासाठी फिल्ड ऑफीसर प्रदिप शाल्मोन साठे यांच्याकडे दिले, असे सांगितले.

मात्र आमच्या बँकेच्या खात्यावर पैसे आले नसल्याचे टीव्ही सेंटर बँक शाखेचे मॅनेजर गणेश भालेराव यांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांनी चौकशी करुन प्रदीप साठे यास बोलवून घेतले. त्याने ५५ हजार रुपये माझ्याकडे जमा असल्याचे सांगितले. व ते शाखेमध्ये भरणार आहे,

## शेतातील, बांधावरील पऱ्हाट्या विनाविलंब जाळून नष्ट करा

### कृषी विभागाचे परिपत्रक जारी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

शेतात गंजी घालून ठेवलेल्या, शेतात उभ्या असलेल्या तसेच बांधावर रचून ठेवलेल्या कापसाच्या पऱ्हाट्या विनाविलंब जाळून नष्ट कराव्यात, असा सल्ला कृषी विभागाच्या वतीने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने या संदर्भात एक परिपत्रकच काढले आहे. अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाअंतर्गत सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, नुकत्याच झालेल्या जिल्हा मासिक चर्चासत्र अंतर्गत क्षेत्रीय भेटीचे आयोजन केले होते. या पाहणीतून शेतकऱ्यांच्या शेतावर कापूस हंगाम समाप्तीनंतर देखील अनेक शेतात कापसाच्या पऱ्हाट्या उभ्या असल्याचे नजरेत आले आहे. राज्यात छत्रपती संभाजीनगर हा आपला जिल्हा कापूस उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. यासाठी पुढील खरीप हंगाम २०२५ साठी कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याचे कारण असे की, जोपर्यंत शेतात.पऱ्हाटी उभी राहील तो पर्यंत प्रत्यक्षात या किडीस खाद्य मिळेल. त्यामुळे तिचे जगणे सोपे होईल. शिवाय यामुळे किडीचे वेगवेगळ्या अवस्था नष्ट करणे अवघड जाईल. हे पुढील अरिष्ट टाळण्यासाठी येथून पुढे पंधरा दिवस कापूस पऱ्हाटीमुक्त शेत शिवार करावे लागेल. प्रादुर्भावग्रस्त उपटलेल्या पऱ्हाट्या या बांधावर न ठेवता जाळून नष्ट करणेच योग्य राहील असा संदेश सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांना समजून सांगणे अनिवार्य राहील. असे या परिपत्रकाद्वारे तालुका कृषी अधिकाऱ्यांसह सर्वसंबंधितांना सूचित करण्यात आले आहे. विभागीय कृषी सहसंचालक डॉ. टी. एस. मोटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पी. आर. देशमुख, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे डॉ. एस. बी. पवार यांचा परिपत्रकावर स्वाक्षऱ्या आहेत.

## 'दिशा स्वराज्याची' माहितीपटास मिळाला इटली येथे पुरस्कार


छत्रपती संभाजीनगर, दि.२६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या लिओनार्दो द विंची स्कूल ऑफ डिझाईनचे प्राध्यापक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शन केलेल्या 'दिशा स्वराज्याची' ( ड्रेीवी इशश्र रीीशीरपलश ) माहितीपटास इटली येथे आयोजित करण्यात आलेल्या रिव्हर टू रिव्हर फ्लॉरेन्स इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'ऑडियन्स अवॉर्ड' (डॉक्युमेंटरी) हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. फेस्टिव्हलच्या दिग्दर्शिका सेल्वाजिया वेलो यांनी प्रेक्षक पुरस्काराची घोषणा केली.



अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

'दिशा स्वराज्याची' ही डॉक्युमेंटरी स्क्रीन केली गेली. हा फेस्टिव्हल दरवर्षी आयोजित केला जातो आणि यामध्ये भारतीय चित्रपट दाखवले जातात. यावर्षी हे

**पर्यावरण आणि त्याच्याशी जडलेल्या माणसाच्या भावभावना या गोष्टी जगभरात एकसारख्या आहेत. कदाचित म्हणूनच इटलीतल्या प्रेक्षकांनाही 'दिशा स्वराज्याची' हा माहितीपट भावला असेल. पर्यावरणाचे प्रश्न, जंगल वाचवण्याचा मुद्दा या गोष्टींवर संवेदनशीलपणे विचार आणि कार्य होणे आवश्यक आहे. फिल्म सोसायटी सर्कलच्या माध्यमातून हा माहितीपट विविध ठिकाणी पोहोचवणार आहे.**



**प्रा.वीरेंद्र वळसंगकर**
**दिग्दर्शक, 'दिशा स्वराज्याची'**

मराठी भाषेत असून ती राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शित केली आहे आणि विदर्भ भूदान ग्रामदान सहयोग समिती यांनी निर्मिती केली आहे. गावाने एकत्र येऊन आपल्या गाव भोवतालच्या जल, जंगल जमीन वरील अधिकार मिळवला आहे. अशा रीतीने वनाधिकार मिळवणारे ते भारतातील पहिले गाव ठरले आहे. एका छोट्याशा गावाने उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले आहे. 'दिशा स्वराज्याची' हा माहितीपट या गावाच्या संघर्षाची कथा सांगते. सध्याच्या जागतिक परिस्थितीत मेंढा-लेखाची कथा अत्यंत अर्थपूर्ण आहे. जिथे लोक जागृत होऊन स्वतःचे निर्णय घेतात तिथे खऱ्या अर्थाने लोकशाही चालते. विकेंद्रित कारभारामुळे प्रजासत्ताकाचे स्वप्न साकार होते.

त्याचप्रमाणे दिनांक १७ जानेवारी २०२५ ते दिनांक २१ जानेवारी २०२५ दरम्यान होणाऱ्या जयपूर आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी 'दिशा स्वराज्याची'

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुर्गादेवी तांडा (शिरोळ) येथे पशुआरोग्य शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२६ डिसेंबर -**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर च्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर मार्फत उन्नत भारत अभियान अंतर्गत शिरोळ गावातील दुर्गादेवी तांडा येथे पशुआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे सहयोगी



अधिष्ठाता प्रा.डॉ. नंदकुमार गायकवाड यांच्या हस्ते गोपूजन करून करण्यात आले. उद्घाटन समयी शिरोळ ग्रा.पं. उपसरपंच सुशीला सुनिल जाधव, शैक्षणिक पशुचिकित्सा संकुल प्रमुख डॉ. संजीव पिटलावार, औषधीशास्त्र विभागाचे तज्ञ डॉ. सुरेश घोके, डॉ. प्रशांत मसारे व डॉ. रविंद्र जाधव, सुनिल जाधव, भाऊराव आडे, प्रल्हाद नारायण आडे, संजू मनोहर आडे, देविदास राठोड व तांड्यावरील नागरिक उपस्थित होते. शिबिरामध्ये आजारी पशुधनावर उपचार करण्यात आले.

शिबिरात एकूण २०६ जनावरांमध्ये बाह्यपरजीवी निर्मुलनासाठी फवारणी करण्यात आली.



## संक्षिप्त वृत्त...



**उदगीर : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना लातूर जिल्ह्य दक्षता समिती अशासकीय सदस्य अभिजीत औटे. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.**



### नुतन विस्तार अधिकारी संभाळे व मुळे यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.२६ डिसेंबर -**


शिरूर अनंतपाळचे जिल्हा परिषद शाळचे मुख्याध्यापक विजकुमार संभाळे यांची शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल तसेच दैठना नगरीचे सुपुत्र, आदर्श शिक्षक रमेश मुळे मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल शिरूर अनंतपाळ शहरातील प्रसिद्ध किसान गणेश मंडळांच्या गणपती मंदिर येथे मंडळाचे अध्यक्ष महादेव आवाळे यांच्या वतीने सत्कार कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. अरविंद भातांब्रे, संतोष शिवणे, गुंडेराव आवाळे यांच्या हस्ते विजयकुमार संभाळे व रमेश मुळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गुरूनाथ शिंदाळकर, चक्रधर शेळके, देविदास सांगवे, अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, सतीश शिवणे, उमाकांत सलगरे, संजय डिगोळे, संजय पटणे, यशवंतराव आवाळे, व्यंकटराव आवाळे, मन्मथप्पा आवाळे, नंदकुमार शिवणे, संजय सलगरे, महादेव संभाळे, धोंडिराम लासुणे, विरभद्र बेंबळगे, महादेव पटणे, विश्वनाथ हांद्राळे, वैजनाथ नाब्दे, संभाजी पारशट्टे, संभाजीराव हात्तरगे उपस्थित होते.



### उदयगिरीत साने गुरुजी यांना अभिवादन

**उदगीर, दि.२६ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात दिनविशेष समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पांडुरंग सदाशिवराव साने उर्फ साने गुरुजी यांच्या १२५ व्या जयंती निमित्त प्राणीशास्त्र विभागातील डॉ. प्रवीण शेटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्राध्यापक सचिव डॉ. भालचंद्र करंडे, दिनविशेष समिती प्रमुख डॉ. गौरव जेवळीकर, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. बालाजी होकरणे, डॉ. दीपक चिद्दरवार, डॉ. मुकेश कुलकर्णी, प्रा. प्रशांत वाघमारे, कार्यालय प्रमुख दयानंद स्वामी यासह अनेक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



### विस्तार अधिकारी म्हणून संजय सुर्यवंशी यांची पदोन्नती

**निलंगा, दि.२६ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील मदनसुरी गटात जिल्हा परिषद विभागातील पंचायत समिती गटात संजय सुर्यवंशी यांची शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. या निवडीचे पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड, शिक्षण समितीचे अरूण साळुंके, डी.एस. धुमाळ, गणेश गायकवाड, मुख्याद्यापक लिंबराज मलिले, एस.बी. जाधव, पी.एस. जाधव, अतुल देशमुख आणि माधव पिटले यानी या निवडीबद्दल विस्तार अधिकारी संजय सुर्यवंशी यांचे अभिनंदन केले आहे.

### निलंगा येथे लातूर जिल्हास्तरीय 'इज्तेमा'ची जय्यत तयारी

**निलंगा, दि.२६ डिसेंबर -**

३० व ३१ डिसेंबर रोजी निलंगा शहरातील ईदगाह मैदान शेजारी लातूर रोड परिसरात होत असलेल्या जिल्हास्तरीय 'इज्तेमा'ची जय्यत तयारी करण्यात आली असून, ५० एकरांवर इज्तेमा होत आहे. गेल्या एक महिन्यापासून इज्तेमाची दोनशे स्वयंसेवकांकडून रात्रं-दिवस मेहनत करण्यात येत आहे. सोमवार व मंगळवार असे दोन दिवस होणाऱ्या इज्तेमात धर्मगुरुंकडून मार्गदर्शन होणार आहे. निलंगा-लातूर रस्त्यावर नया ईदगाह परिसरात असलेल्या ५० एकरांवर इज्तेमा होणार आहे. भव्य शामियाना उभारण्यात आला आहे. ध्वनीक्षेपक, लाईट, जनरेटर, पिण्याच्या पाण्याचे १२०० नळ, वजूखाने, ५०० स्वच्छतागृहे, स्नानगृहांची उभारणी, पाण्यासाठी टँक उभारण्यात आले आहेत. शिवाय, १८ टँकरची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# औशात पुन्हा मोकाट कुत्र्यांचा १२ वर्षीय मुलावर हल्ला

## शासकीय रुग्णालयात औषध मिळेना... नगरपालिकेकडून बंदोबस्त होईना... जनतेत दहशत ...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२६ डिसेंबर -**

औसा शहरात दिवसेंदिवस मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असून नागरिकांना चावा घेण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. शहरातील बिलाल नगरातील १२ वर्षीय जिशान पटेल या तरुणावर घरासमोरच मोकाट कुत्र्याने हल्ला करीत उजव्या पायाची पिंडरी फोडून काढून गंभीर जखमी केले आहे. या महिन्यात तीन वर्षाच्या चिमकलीसह वृध्द व तरुणाला गंभीर जखमी करण्याच्या घटना घडल्याने मोकाट कुत्र्यांची दहशत शहरात वाढली आहे. जखमीवर उपचार करण्यासाठी शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील यंत्रणा हतबल होऊन अपुरी पडत आहे. तर नगरपालिका प्रशासनाचे बंदोबस्तासाठी होणारे प्रयत्न अपुरे पडत आहेत. यामुळे मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा व रुग्णांना रेबीज लसपुरवठा करावा, अन्यथा एमआयएमने तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

मोकाट कुत्र्यांच्या हल्यात ३, १२ वर्षीय लहान मुलासह ६५ वर्षाचे वृध्द गंभीर जखमी झाले आहेत. या तिन्ही घटना डिसेंबर महिन्यात घडल्या आहेत. शासकीय रुग्णालयात रेबीज लसीचा तुटवडा सतत होत असल्याने नागरिकांना आर्थिक झळ सोसून खाजगी रुग्णालयातून उपचार करुन घ्यावे लागत आहेत. मात्र मोकाट कुत्र्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करुन नागरिकांना दहशतीतून बाहेर काढण्यात नगरपालिकेचे तकलादू प्रयत्न आणि कागदोपत्री नियोजन अपुरे पडत आहेत. औसा शहरात मोकाट कुत्र्यांचा धुमाकुळ सुरु असून गेल्या चार वर्षापासून बंदोबस्त करण्याची मागणी सुरु आहे. या काळात बंदोबस्त करण्याचे कायदे बदलले.पण बंदोबस्त झाला नाही. परिणामी शहरात मोकाट कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.

**एमआयएम आक्रमक...**

ग्रामिण रुग्णालयात रेबीज औषधाचा सतत तुटवडा होत आहे. तर अनेक वेळा मागणी करुनही नगरपालिका मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करीत नाही.उपचारासाठी लातूर येथे पाठविण्यापेक्षा औसा येथील रुग्णालयातच रुग्णावर उपचार व्हावा. यासाठी औषधाचा साठा मुबलक ठेवावा. याचबरोबर पालिकेने तात्काळ मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. अन्यथा एमआयएमच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा वैद्यकीय अधिक्षक औसा व मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



यामध्ये अनेक कुत्रे पिसाळलेले आहेत.

या मोकाट कुत्र्यांनी चावा घेतलेल्या नागरिकांवर औषध उपचार करण्यासाठी शासकीय औषधाचा साठा अपुरा पडत आहे. नागरिकांची बंदोबस्ताची मागणी, वैद्यकीय विभाग हतबल होत असताना नागरिकांनी बंदोबस्ताची मागणी करुनही नगरपालिका प्रशासनाने आजपर्यंत याची गांभीर्याने दखल घेतली नाही. यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.

तीन वर्षीय चिमुकल्या मुलीला चावून गंभीर जखमी केल्यानंतर नगरपालिकेने एकाच दिवसात ४०-५० कुत्रे पकडले. तेच कुत्रे पुन्हा शहरात आले असल्याने दहशत पसरली आहे. यामुळे नगरपालिकेने पकडलेले कुत्रे नेमके सोडले कुठे आणि परत आले कसे? हा संशोधनाचा विषय असल्याचे मत एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी व्यक्त केले.

# सोन्याचे दागिने लुटीचा बनाव करणाऱ्या सराफा व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल

## डोळ्यात मिरची पूड टाकून २६ तोळे दागिने लुटल्याचा केला बनाव...

### आर्थिक विवंचनेतून बाहेर पडण्याचा प्लॅन फसला...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२६ डिसेंबर -**

डोळ्यात मिरची पूड टाकून २६ तोळे सोन्याचे दागिने लुटीचा बनाव करणाऱ्या सराफा व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व ग्रामीण पोलिसांनी ही कारवाई केली.

तीन दिवसापूर्वी सायंकाळच्या सुमारास येथील सराफा व्यापारी अमर अंबादास साळुंके (वय ३१, रा. पोचम्मा गल्ली, लातूर) यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात येथे तक्रार केली. २३ डिसेंबर रोजी सायंकाळी सराफ लाईन, लातूर येथील एका दुकानातून २० लाख ४६ हजार रुपये किंमतीचे २६ तोळे सोन्याचे दागिने स्कुटी गाडीच्या डिक्कीमध्ये घेऊन नेहमीप्रमाणे गिर्हाईकांना दाखविण्यासाठी रेणापुर येथे गेलो होतो.

तेथून परत येत असताना सायंकाळी कातळेनगरजवळ मोटर सायकल वरून आलेल्या दोन अज्ञान व्यक्तीने डोळ्यात मिरची पूड टाकून माझ्या गाडीतील २६ तोळे सोन्याचे दागिने चोरून घेऊन पळून गेले आहेत, असे साळुंके





यांनी तक्रारीत नमूद केले. सदर तक्रारीचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे सूचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर ग्रामीण बि. चंद्रकांत रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे लातूर ग्रामीणचे अधिकारी अमलदारांचे पथके तयार करून मार्गदर्शन करून तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आले.

सदर पथकांनी तक्रारदार साळुंके यांच्याकडे कुशलतेने विचारपूस केली. घडलेली घटना व अमर साळुंके सांगत असलेल्या हकीकतमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती दिसून येत होत्या. त्यावरून पथकाने अमर साळुंके यास विश्वासात घेऊन विचारपूस केली तेव्हा त्याने सांगितले की, मला लोकांचे पैसे देणे झाल्याने सदरचे दागिने चोरी गेल्याचा बनाव केला. करून त्यामधून माझा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी चोरीचा बनाव केल्याचे कबूल केले. तसेच त्याने लपवून ठेवलेले दागिने काढून दिले.

रेणापूर ते लातूरकडे येणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका शेतामध्ये खड्डा करून लपवून ठेवलेले २० लाख ४६ हजार रुपयांचे २६ तोळ्याचे दागिने काढून दिल्याने ते पोलिसांनी हस्तगत केले आहे. त्यामुळे साळुंकेविरुद्ध पोलीस ठाणे अंमलदार लक्ष्मण कुंभरे त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# सर्वसामान्यांच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील : आ. संजय बनसोडे



### महायुती सरकार हे आपला विकास करण्यासाठी कटीबध्द

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२६ डिसेंबर -**

मागील ५ वर्षात उदगीर मतदार संघाचा कायापालट केला असुन त्यासाठीच या भागातील माय-बाप जनतेने मला दुसऱ्यांदा आमदार होण्याची संधी देवून मोठ्या मताधिक्याने निवडून दिले. आपल्या विश्वासाला तडा न जावु देता मी अविरतपणे काम करणार असून सर्वसामान्यांच्या विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील असल्याचे मत माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केले. ते उदगीर तालुक्यातील तोंडार येथील गुरु लिंगप्पा यांचा पुण्यस्मरण कार्यक्रम व सभामंडप कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, उध्दव महाराज हैबतपुरे, शिवराज नावंदे गुरुजी, रामचंद्र तिरुके, बालाजी भोसले, राजेंद्र पाटील, श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, सरपंच भरत कोचडवाड, कुशाल खिंडे, मल्लिकार्जुन बिरादार, प्रभाकर दाजी, रामलिंग कोरे, निलप्पा बिरादार, नीळकंठ बिरादार, ब्रम्हानंद पांडे, दादा पांडे, गुणवंतराव पटवारी, माधव पाटील, सुभाष रेगुडे, दशरथ पांडे, प्रल्हाद पाटील, मनमत सांगवे, आनंदराव मालोदे, राजकुमार लिंबाळे, शिला मालोदे, शिला बिरादार, भारतबाई दाजी आदी उपस्थित होते. यावेळी तोंडार येथील गुरु लिंगप्पा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आ.संजय बनसोडे यांनी अभिवादन करुन सभामंडप कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना महायुती सरकारने राबवून महाराष्ट्रातील करोडो माता-भगिनींना या योजनेचा लाभ दिला. आता लवकरच लाडक्या बहिणींना मागील महिन्यांचे पैसे मिळणार आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी मोफत वीज देणार असुन या विधानसभेत महायुती सरकारला मिळालेले यश हे सर्वसामान्यांचे यश असुन महायुती सरकार हे आपला विकास करण्यासाठी कटीबध्द असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी तोंडार व परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळेगाव येथील शेतकऱ्यांशी मंत्री बाबासाहेब पाटील, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांचा संवाद

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२६ डिसेंबर -**

एका व्यक्तीने वक्फ ट्रिब्यूनलमध्ये दावा दाखल करून अहमदपूर तालुक्यातील तळेगाव येथील जवळपास १०० शेतकऱ्यांना जमिनीच्या ताब्याविषयी नोटीस बजावली आहे. या प्रकरणामुळे चिंतीत असलेल्या शेतकऱ्यांशी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आ. अभिमन्यू पवार यांनी तळेगाव येथे जावून संवाद साधला. या प्रकरणातील जमिनी वक्फ बोर्डाच्या मालकीच्या नसल्याने बोर्डाने या जमिनींवर कोणताही हक्क सांगितलेला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी निश्चिंत राहावे, असे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष झी यांनी सांगितले. तसेच या प्रकरणात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे ना. पाटील व आ. पवार यांनी सांगितले.



नोटीसा बजावलेल्या जमिनीची नोंद गॅझेटनुसार वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनींच्या नोंदीमध्ये नसल्याने वक्फ बोर्डाने दावा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तरीही शेतकऱ्यांमध्ये वक्फ बोर्डाबाबत गैरसमज निर्माण झाल्याने गावामध्ये शेतकऱ्यांसमोर भूमिका मांडण्यासाठी आलो असल्याचे काझी यावेळी म्हणाले. तसेच या प्रकरणात शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. या प्रकरणात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

औसा तालुक्यातील बुधोडा येथील शेतकऱ्यांनाही अशाच नोटीसा आल्या आहेत. तळेगाव आणि बुधोडा येथील शेतकऱ्यांना या प्रकरणात सर्व सहकार्य करण्यात येणार असून त्यांच्या जमिनी त्यांच्याच मालकीच्या राहतील, असा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिला.

# 'सहकारातून समृद्धी' अंतर्गत गाव पातळीवरील सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२६ डिसेंबर -**

केंद्र शासनाच्या सहकार विभागाने सुरू केलेल्या 'सहकारातून समृद्धी' अभियानांतर्गत देशात दहा हजार बहुद्देशीय प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, दुग्ध संस्था, मत्स्य व्यवसाय संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्थांचा केंद्रीय सहकार मंत्री अमीत शाह यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून शुभारंभ होत आहे.

या अभियानांतर्गत राज्यातही गाव पातळीवर सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करून, त्या संस्थांच्या माध्यमातून पतपुरवठ्यासह नागरिकांना अधिकाधिक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. तसेच या नागरिकांना सहकार चळवळीशी जोडून घेतले जाणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज येथे सांगितले.

'सहकारातून समृध्दी' अंतर्गत देशपातळीवर आयोजित दहा हजार नवनिर्मित बहुद्देशीय प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, दुग्ध संस्था, मत्स्य संस्थांच्या शुभारंभ कार्यक्रमानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विशेष राज्यस्तरीय कार्यक्रमात ना. पाटील बोलत होते. नवी दिल्ली येथून केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रसारण यावेळी दाखविण्यात आले.

सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नाबार्डच्या मुख्य महाव्यवस्थापक रश्मी दराद, लातूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, लातूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अशोक गोविंदपूरकर, मजूर सहकारी संस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप नागराळकर, अपर निबंधक राजेश सुरवसे, नाबार्डचे प्रदीप पराते, विभागीय सहनिबंधक सहकरी संस्था सुनील शिरापूरकर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्वर बदनाळे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रमोद पाटील, जिल्हा विशेष लेखा परीक्षक उमाकांत पवार यावेळी उपस्थित होते.

सहकार चळवळीमुळे आपल्या राज्याची प्रगती झाली असून सहकारी साखर कारखाने, सहकारी पतपुरवठा संस्था यामुळे राज्यातील अर्थकारणाला गती मिळाली. सहकार चळवळ अधिक बळकट करून गाव पातळीवर सहकारी संस्थांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाने सहकारातून समृद्धी अभियान हाती घेतले आहे.

गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सोसायटीने पतपुरवठा करण्यासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना विविध सेवा



पुरविण्यासाठी पुढाकार घ्यावा. यामुळे जास्तीत जास्त लोकांना सहकार चळवळीशी जोडून घेता येईल. तसेच सहकारी संस्थांच्या उत्पन्नात भर पडून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल, असे ना. पाटील यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय सहनिबंधक सुनील शिरापुरकर यांनी केले. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात राज्यातील १५ विविध नवनिर्मित संस्थांना यावेळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

केंद्र सरकारच्या सहकार विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीविषयी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संगमेश्वर बदनाळे यांनी माहिती दिली.